ही ,, २ ,, ,, ८८
अखेर ,, ० ,, ,, १८८
कोळ कैफास ...................८२

नोटिशीबद्दल.
१० ओळींचें आंत रु. १
पुढें दर ओळीस ८१८६
दुसरे खेपेस .... ८१

Perannum in arrears 7 ,, 3 ans
Six monthly ........ 3 ,, 8as
Single copy .............................. 4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines...... 2Rs
Per line over 10 ... 4as
Repetition per line 8as

THE BERAR SAMACHAR.

VOL XIX AKOLA MONDAY JUNE 1 1885 NO 21
पुस्तक १९ अकोला सोमवार तारीख १ माहे जून सन १८८५ इ० अंक २१


## पक्षकार लोकांस फार उपयोगी माहिती.

रा० रा० रामचंद्र दाजी नगरकर बी.ए. एल. एल. बी. मुंबइ हायकोडताचे वकील, हे सध्यां वऱ्हाडांत आले आहेत हे मोठ्या घराण्यांतील असुन हुषार, व अनुभवशीर आहेत. यांचे हातीत वऱ्हाडसमाचार छापखान्याशेजारी काळे मारोती जवळ आहे. वऱ्हांडातील लोकांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें अशी आमची यांस सूचना आहे.
तीराख ९ माहे दिसेंबर सन १८८४ } पत्रकर्ते

## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असे समजूं नये.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते

विनंती विशेष सांप्रत काळीं प्रत्येक सुशिक्षित मनुष्य आपापल्या बुद्धिसामर्थ्यानें या देशाची कांहींना कांहीं सुधारणा करण्या विषयीं उपाय सुचवीत आहे. ते उपाय सुचविणारे जसे उच्च किंवा मध्यम स्थितींतले असतील, त्या प्रमाणें त्यांच्या सुचनांचा विचार व चर्चा होऊं लागते; म्हणजे एकादा मोठ्या वजनदार मनुष्यानें अमुक केलें असतां देशाची अमकया बाबतींत सुधारणा होईल असें सुचविलें कीं लागलीच त्या विषयीं वर्तमान पत्रांतून चर्चा होऊं लागते; आणि लवकरच दोन चार नाहीं नाहीं प्रकरणें अनुकूल झालीं म्हणजे ती सूचना अमलांत आणण्याचा प्रयत्न होतो. परंतु एकाद्या साधारण मनुष्यानें जर कांहीं उपाय लिहून एखाद्या वर्तमान पत्रकारास कळविले, तर ‘ जागा नाहीं,’ ‘ अक्षर लागत नाहीं,’ ‘ लांबच लांब चऱ्हाट,’ इत्यादि अनेक कारणांनीं अर्धचंद्रप्रयोगाची देणगी प्रथम मिळते. कदाचित् एखाद्या कोना कोंपऱ्यांतल्या पत्रकारानें त्यास जागा दिली च तरी तो लिहिणार आणि पत्रकार दोघे अर्धवट रानटी स्थितींतले म्हणून त्या विषयीं कोणीच विचार करीत नाहीं. पवां नुकतेंच मि० मलबारी यांनीं बालविवाहनिषेधाविषयीं सरकारानें कायदा करावा अशी सूचना केली नाहीं, तोंच चोहों कडून मोठीं मोठीं धेंडें बाहेर पडून कोणी पूर्व कोणी उत्तरपक्ष धरून वाद सुरू झाला. हीच सूचना एखाद्या लुंग्या सुंग्या पत्रकारानें किंवा दुसऱ्या कोणी केली असती, तर काय निष्पन्न होतें कांहीं झालें नसतें. आणि एरवीं तरी आमच्या आज हजारों वर्षांपासून धर्माशीं सांगड घालून दिलेल्या ज्या वहिवाटी त्यांत कोणी हात घालीन म्हणेल, तर त्याची अशीच फजिती उडावयाची हें तर शिलालिखित आहे. मलबारी यांनी उत्पन्न केलेल्या वादानें किती कागद, शाई, आणि चांगलीं चांगलीं डोकीं खराब झालीं बरें! ! परंतु फायदा कांहीं इतका झाला नाहीं.- असो.

मी आज सहज रिकामा बसलों असतां आपली सुधारणा करण्याचा उपाय मला सुचला. तो कोणातरी वर्तमानपत्र द्वारानें जगासमोर ठेविण्याचा विचार करितों इतक्यांत वरील विचार मनांत येऊन हातची लेखणी गळाली. कांकीं एकतर अर्धचंद्राची धास्ती, आणि दुसरें तो न मिळाला तरी नांवापुढें बीए, एम ए इत्यादि किंवा मागें रावसाहेब, रावबहादूर वगैरे फाजील जोडण्या सारखें कांहींच नाहीं; म्हणून माझें पत्र वर्तमानपत्रांतून सगळ्यां समोर आलें, तरी वाचतो कोण? आणि चर्चा होते कशची! असो. इतकें झालें तरी मला मि. मलबारी सारखी फजितीची धास्ती नाहीं म्हणून पुन्हां लेखणी हातीं घेतली. आतां पत्रकर्तेराव तुमच्या हातून तरी मला सुखरूप बाहेर काढाल काय? उपोदघातानेंच पत्र वाढलें म्हणून थोडी शंका आहे.

आधीं प्रथम आमच्या देशांत कोणकोणत्या गोष्टीं विषयीं सुधारणा होणें अवश्य आहे, त्या सांगतों— १ लोक दरिद्री झाले आहेत, ते सधन झाले पाहिजेत. २ दिवसोंदिवस प्रजा निर्बळ होत चालली आहे, ती सुदृढ झाली पाहिजे. ३ बालविवाह बंद झाला पाहिजे. ४ लग्नांदिसमारभांत अतोनात पैसा खर्च होतो, तो न झाला पाहिजे. ५ देशांतील कारागिरीचा ऱ्हास होत चालला आहे, तिला उत्तेजन दिलें पाहिजे. ६ आळस जाऊन उद्योगाची संवय लागली पाहिजे. ७ प्रजा वाढत जाऊन निर्वाहाचीं साधनें त्या मानानें कमी आहेत. म्हणून प्रजा वाढूं न देणें किंवा निर्वाहाचीं साधनें वाढणें इत्यादि अनेक बाबी आहेत, त्यांत सुधारणा होणें अवश्य आहे. आजपर्यंत शेंकडों विद्वान व वजनदार लोकांनीं कारागिरीस उत्तेजन यावें म्हणून प्रदर्शनें काढलीं, बालविवाहनिषेधक मंडळ्या स्थापित केल्या, लग्नांत फारसा पैसा खर्चूं नये म्हणून व्याख्यानें झोडलीं, ग्राज्युएट मंडळींत प्रत्येक कान्व्होकेशनच्या वेळीं उद्योग करा म्हणून उपदेश होत आहेत; ह्या व अशा दुसऱ्या शेंकडों गोष्टी झाल्या व होत आहेत. तथापि, बुट पाटलून घालून पाणी व अन्न यांचें सेवनकरणें, गंध न लावणें, बोलतांना कांहीं इंग्रजी व कांहीं मराठी असें धेडगुजरी बोलणें, तोंडांत चुटा धरून व एका हातांत काठी घेऊन, व छातीवर घड्याळाची सांखळी लोंबत ठेवून मोठ्या ऐटीनें चालणें, मद्यपान करून डुलत डुलत चालून शेवटीं एखाद्या गटारांत पडणें, गाणें, नाच, नाटकें, तमाशे इकडे अतोनात पैसा खर्चीं घालणें, बायकोस माहेरीं पाठवून किंवा भाड्यानें देऊन आपण रांडेच्या घरीं तिच्या लाथा खात मौज मारीत बसणें, स्वदेशांत गांवांची गांवें महामारीनें दुष्काळानें किंवा अग्नीनें ओस पडलीं तरी कवडी न देणें, परंतु आयर्लंडांत दुष्काळ पडला म्हणजे शेंकडों रुपये देणें, एखादा गरीब ब्राह्मण किंवा काळा भिकारी पाहिल्या बरोबर त्याजवर कुत्र्या सारखें गुरगुरणें, परंतु गोरा भिकारी किंवा एखाद्या गोऱ्याचा बुटलर किंवा त्याचा शिपाई यांस बक्षिस देणें, साहेबांस वांकून सलाम करणें, व इतरांस काठी वर उचलणें इत्यादि या पेक्षां कांहीं जास्त सुधारणा झाली असें वाटत नाहीं.

बाहत्तर रोगावर जशा हालोबेच्या गोळ्या तत्काळ गुण करितात, तसा मला एक अत्यंत साधारण उपाय वरील सर्व रोगांवर सारखा गुणाकारी असा आढळला आहे ह्याचा अनुभव घेतलेले शेंकडोंशें लोक त्याच्या गुणाविषयीं साक्षी देण्यास तयार आहेत. तो कोणता म्हणाल तर हल्लीं आपल्या देशांत असलेली दायाद विभागाची रीत मोडून बालबोध चौथ्या पुस्तकांत इंग्लंड वर्णनांत इंग्लंडांत असलेली दायाद विभागाची रीत सांगितली आहे, तशी आपल्या देशांत चालू करण्याविषयीं सरकारास अर्ज करून हल्लींच्या कायद्यांत फेरफार करविणें. आपल्या इकडच्या दायाद विभागानें आमचें किती नुकसान होतें याची कल्पना फक्त इंग्रजलोकांसच करितां येईल. कांकीं त्यांच्या दायादविभागाच्या रितीनें जे फायदे होतात त्यांचा ते आज शेंकडों वर्षांपासून अनुभव घेत आले आहेत.

वडिलोपार्जित मत्ता फक्त एका पुत्राकडे गेली, आणि इतरांस तिच्या पैकीं कांहीं एक मिळेनासें झालें म्हणजे, एखाद्या गारुड्याच्या कांडी प्रमाणें एकदम विलक्षण तऱ्हेचा उत्तम फेरफार घडून येईल. कसा तो पहा. समजा अ जवळ २ लाखांची मत्ता आहे, आणि त्याला पांच पुत्र आहेत. वडील मुलगा ब इस्टेटीचा वारस म्हणून जो तो आपली कन्या त्याला द्यावयास पाहील. म्हणून इतक्या सांगून आलेल्या मुलींतून कोणती पसंत करावी या विषयीं विचार पडून निकाल होण्यास बराच वेळ लागेल; शिवाय आपल्या मुलास इस्टेट मोठी असल्यामुळें पाहिजे तेव्हां उत्तम कुळांतील मुलगी मिळेल अशा भरंवशानें ब च्या लग्नाविषयीं उतावेळ होणार नाहीं. आतां अचे दुसरे चार पुत्र यांस इस्टेटी पैकीं कांहींच मिळणार नाहीं व त्याचा वडील भाऊ ब याजवर त्याचा कोणतेही प्रकारचा हक्क नाहीं; यामुळें अ त्याच्या लग्नाविषयीं किती ही उत्सुक असला, तरी इतर लोक आपल्यां मुली त्यास देण्यास धजणार नाहींत. यदाकदाचित् अ नें जंगम मिळकतींतून आपल्या इतर पुत्रांस त्यांचें लग्न व्हावें म्हणून द्रव्य दिलें तरी, त्या मुलांच्या आंगीं शाहणपण नसल्यास ते द्रव्य केव्हांच उधळून टाकितील अशा भयानें लोक त्यास आपल्या मुली देण्यास मागें पुढें पाहतील. व अशानें मुलें व मुली यांचे विवाह पोक्त दशेस येईपर्यंत होणार नाहींत. अर्थात बालविवाह बंद पडेल व पुनः बालविवाह करण्यास फारच थोडीं कारणें शिल्लक राहतील. मोठेपणीं लग्न झाल्यानें प्रजा सुदृढ निपजेल हें ही सांगणें नको. आपणांस बापाच्या इस्टेटी पैकीं कांहींच मिळणार नाहीं असें समजूं लागल्यावर मुलें ही आपला पुढला मार्ग चोखाळण्याच्या कामीं लागतील अशानें उद्योग करण्याविषयीं प्रत्येकाची सहजच प्रवृत्ति होईल. अनेक पुत्रांतून एकालाच सर्व मत्ता मिळाल्यानें, व आस देखील स्थावर इस्टेटीची पाहिजे तशी व्यवस्था करण्याची मनाई असल्यानें पिढ्यानपिढी घराण्याची श्रीमंती कायम राहील. हल्लीं सारखें जो आज राव तो उद्यां रंक अशी स्थिति कदापि होणार नाहीं. वडिलोपार्जित इस्टेटीचे आपले इकडील संप्रदाया प्रमाणें विभाग होतां होतां शेवटीं दीन दशेस आलेलीं कुटुंबें थोडीं का आहेत. असें ह्या स्थितींत मुळींच होणार नाहीं. अशा रीतीनें श्रीमंत लोकांची मंडळी कायम राहिल्यानें देशांतील कारागिरी लयास जाण्याची शंकाच नको. असे दायाद विभागापासून अनेक फायदे आहेत, ते सर्व येथें सांगत बसण्या पेक्षां इंग्लंड देशाची स्थिति आणि चौथ्या पुस्तकांतील इंग्लंड वर्णनापैकीं दायादविभागप्रकरणीं यांकडे वाचकांनीं थोडेंसें लक्ष पुरवावें, अशी शिफारस करून हा बराच लांबलेला लेख आटोपतों. कळावें.

आपला एक वेडा

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि. वि. खालीं लिहिलेल्या चार ओळी येत्या अंकीं छापाल अशी आशा आहे.

गेले रविवारी मी नेहमीच्या रिवाजाप्रमाणें बाजार करण्याकरितां आलों होतों. मराठीभाषेंत डा. नारायण चिंतामण यांचें "मनुष्य पिंडरचना" ह्या विषयावर व्याख्यान अशा ठोबळ अक्षरांनीं लिहिलेली नोटीस सहज माझ्या दृष्टीस पडली. मला थोडी वैद्यकीची माहिती असून ती ज्यास्त मिळाविण्याचा नाद असल्यामुळें मी आपले खेडे गांवीं परत न जातां व्याख्यान ऐकण्यास मुद्दाम राहिलों. व्याख्यानकाराच्या मागें "डा०" हें अक्षर असल्यामुळें हे कोणी तरी मोठे कालेजांतून पास झालेले डाक्तर असावेत असें ही मला वाटलें कारण "डा." हें अक्षर त्या शिवाय नांवाच्या आगोदर लावतां येत नाहीं असा माझा समज आहे. जेवणें वगैरे आटोपून नोटीशींत लिहिले वेळेचे पूर्वींच म्हणजे आठ वाजण्यापूर्वींच मी लायब्ररीच्या भव्य इमारतींत जाऊन बसलों. तेथील एकंदर व्यवस्थेवरून तर आज बरीच मंडळी जमेल

असें वाटलें. परंतु दाहा वाजण्याच्या सुमारास तर पाव शेकडा मंडळीची गर्दी जमली. व्याख्यानकार टेबलाजवळ येऊन उभे राहतांच माझ्या आशेचा अगदींच भंग होऊन गेला, कारण ह्याच गृहस्थाचें भाषण याच विषयावर पूर्वीं बाळापूरास ऐकिलें होतें, व त्यावेळेस जसा काथ्या कुटला त्या सारखाच कांहीं तरी येथें ही वटवट करणार असा भास झाला परंतु त्यांनीं लिहून आणलेलें" टिपण पाहून व "माझी अगदीं रेट तयारी आहे असें त्यांनीं एका गृहस्थाजवळ केलेलें भाषण ऐकून ह्यांची आज बाळापूरपेक्षां जास्त उत्तम तयारी आहे असें दिसलें. प्रथमारंभीं हा मनुष्यपिंड स्त्रियांचे गर्भाशयांत नऊ महिने पर्यंत कसकसा वाढत जातो हें कलेंबसें सांगून नंतर तो बाहेर आल्यावर त्याचें पोषण कसें व कशानें करावें हें सांगितलें. ह्यांचें बोलण्यांत मज्जा, मेंदू, धमन्या, स्नायू, शिरा, अस्थी, पंजर वगैरे शद्बाचा चांगला भरणा होता. वर लिहिलेल्या दोन गोष्टी सांगून ह्यांनीं आपलें भाषण पाव तासाच्या आंत आटोपून श्रोते मंडळीस अगदीं थक्क करून सोडलें. ह्या गृहस्थांनीं जी पहिली माहिती सांगितली त्या पेक्षां ही उत्तम एखाद्या चांगल्या नाटकांतील "ध्रुवाचे अगर नारदाचे सोंग घेणार पोराचे भाषणांत ही असते व बाकीची माहिती "आरोग्या संरक्षण" ह्या पुस्तकांत असून आमच्या रोजच्या मुलास देणाऱ्या उपदेशांत ही असते नाटकांतील पोर तरी आपलें भाषण पाठ करून सरळ व न अडखळतां बोलतें परंतु भाषणकारांनीं तर बोलण्याचे कामांत कमाल करून सोडली व अखेरीस लिहिलेलें टिपणच वाचूं लागले. अशा व्याख्यानापासून कधीं हीं चांगला उपयोग व्हावयाचा नाहीं. आपला अमोलीक वेळ खर्चून लोकांनीं कांहीं तरी ऐकायाला जाणे यांत कांहीं अर्थ नाहीं असें मला वाटतें. अशा मोठ्या ठिकाणीं येऊन तुटपुंजीचें भाषण करण्या पेक्षां उत्तम तयारी करून पुस्तकातून वगैरे माहिती मिळवून नंतर भाषण करण्यास पुढें यावें नाहींतर एखाद्या चांगल्या विषयावर निबंध लिहून तो वाचून दाखवावा. उगाच गरीब बिचाऱ्या सेक्रेटरीस नोटीस फिरविण्याच्या व दिवेबत्ती करण्याच्या वगैरे खटपटींत कां पाडावें तें कळत नाहीं. असें व्याख्यानकारांचें व्याख्यान आटपल्यानंतर दुसरे एक गृहस्थ, अंगात फक्त लांब सदरा व डोकीत मोगली टोपी घातलेले, टेबलाजवळ उभे राहून तंबाखू ह्या शद्बावर मनरंजनार्थ (आपले किंवा लोकांचे) थोडेसे बोलले. यांस बोलण्याचा बराच सराव आहे असें ह्यांच्या अस्खलित भाषणा वरून दिसलें विषय चांगला घेऊन बोलतील तर बरें.

पत्र विस्तार फार झाला म्हणून पुरें करितो. एडिटरराव पत्र छापा हो नाहींतर आहे एका गांवढळ मास्तराचें पत्र असें समजून दाखवा याला केराची टोपली. कळावें लोभ असावा ही विनंती.

"गांवढळ मास्तर"

---

**वऱ्हाडसमाचार**

मिती अधिक ज्येष्ठ वद्य ४ शके १८०७

## वऱ्हाडांतील शेतकऱ्यांची नागवणूक.

आमचा वऱ्हाड प्रांत बराच सुपिक आहे हें जगजाहीर आहे परंतु याचा उपयोग आमच्या वऱ्हाडांतील शेतकऱ्यांस जसा व्हावा तसा होत नाहीं. याचें कारण काय असावें याबद्दल आजकाल बरीच चर्चा वर्तमान पत्रांतून सुरू आहे. वऱ्हाड प्रांत इंग्रज सरकाराचे अमलांत आल्यास आज पुष्कळ वर्षे झालीं परंतु आरंभा पासून आजकाल पर्यंत राज्यव्यवस्थेंत जो फेरफार होत गेला त्यांत कोणा ही मुख्याधिकाऱ्याचें लक्ष जसें पोंचावें तसें पोचलें नाहीं. कसा तरी जमिनीचा वसूल करून घ्यावा आणि हवा तसा न्याय दिवाणी फौजदारी कामांत दिला जावा अशी व्यवस्था आज तागायत चालत आली परंतु हल्लींच्या मन्वन्तरास चालत आलेली नबाबी कारवाई पुढें चालूं ठेवणें प्रशस्त दिसत नाहीं.

सावकार लोकांनीं आणि विशेषें करून "घी नो पैसा और पैसो नो घी" या मंडळींनीं सर्वत्र रयतेस त्रस्त करून सोडलें आहे आमचीं हल्लींचीं कोर्टें सावकार लोकांचीं कुऱ्हाकडून पैसा काढण्याचीं साधनें बनलीं आहेत. शेतकरी लोक अविचारी, व अक्षरशून्य असतात यांत कांहीं संशय नाहीं परंतु त्यांच्या अशा स्थिती पासून सावकार लोकांनीं मनास वाटेल तसा आपला फायदा करून घ्यावा व आमच्या वऱ्हाडांतील कोर्टांनीं तो करूं द्यावा हें उचित नाहीं. ऋणकोनें कितीही व्याज कबूल केलें असलें व तें देणें परंपरागत जरी चालत असलें तरी आमचीं नबाबी कोर्टें त्याकडे कांहीं लक्ष न देतां एका पाठीमागून एक ठासून हुकूमनामे देत जातात. बरें, हेही हुकूमनामे पक्षकारांस पुन्हपुन्हा हेलपाटे देऊन व त्यांच्या जिवाचीं त्रेधा करून दिले जातात. चौकशी तहकूब करणें म्हणजे आमच्या वऱ्हाडी कोर्टाच्या परसांतील भाजी आंजराचा होतो खेळ पण उंदीराचा जातो जीव! बिचारे पक्षकार साहेब बहादुरांच्या दरवाजांतून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं हरएक प्रकारचीं दुःखें सोसून त्रस्त होतात. कित्येक प्रसंगीं तर आमच्या असें नजरेस आलें आहे कीं बिचारा ऋणको या असह्य दुःखामुळें दीन वचनें करून आपल्या सावकारांस सर्व देण्यास तयार ही होतो कारण त्याची पूरी खात्री असते कीं अखेर तरी कोर्ट आपल्या विरुद्ध भरपूर हुकूमनामा देणारच.

ही वरील शेतकऱ्यांची स्थिती अधिक घोटाळ्याची होण्यास वकील लोक अनेक प्रसंगीं कारणीभूत होतात. पाहिजे तशी दमपट्टी देऊन शेतकऱ्या कडील पैसा कमी करित नाहींत. कित्येक प्रसंगीं क्षुल्लक कामाकरितां शेकडों रुपयांनीं वकिलांची तुंबडी शेतकऱ्यांना भरावी लागते कारण तसें न केलें तर आमच्या नबाबी कोर्टांत त्यांची दाद लागत नाहीं.

इतर सर्व कामासंबंधानें आमचा वऱ्हाड प्रांत अमानी हैदराबाद आहे खरा परंतु खालसा अमलांतील कायदेकानू सक्तीनें अमलांत आणण्यांत काडीमात्र ही हयगय होत नाहीं. आमचे रेसिडेंट साहेब स्थानिक सरकार आहेत हें खरें परंतु बिचाऱ्या रयतेस त्याचा काय उपयोग! रेसिडेंट साहेब आपल्या मेजवान्या, दरबारें व इतर खेळ सोडून वऱ्हाडास अनुकूळ असें कायदे करण्याच्या खटपटींत कशाला पडतात. असो, कोर्ट फी, स्टांप वगैरे पैसा काढू कायद्यांनीं आमच्या वऱ्हाडांतील शेतकऱ्यांत त्राण ठेविला नाहीं, इतकेंच नव्हे परंतु सावकारांचीं दारें पुसतां पुसतां त्यांच्या नाकी दम येत चालला आहे. अखेर कोणत्या थरावर जाईल कोण जाणें! पोलिटिकल खात्यांत कसाही हुशार व मेहनती अधिकारी गेला तरी नबाब बनतो यांत संशय नाहीं. परंतु ही गोष्ट आमच्या अलिशान रेसिडेंट साहेबांस लागूं न पडेल व त्यांचें या गोष्टीकडे लक्ष पोंचेल अशी आम्हांस उमेद आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY, June, 1, 1885

It is an open secret that appointments in Berars in higher grades are made on the principle of favouritism and nepotism &c. rather than on the principle of personal qualifications and educational attainments. It appears that the government is not even inclined to pay sufficient attention to physical capabilities when such appointments are made. For the present we need not particularize the unhappy selections made by the government with disregard to physical fitness. As regards the educational attainments or mental qualifications the nominations by the government to important posts are much more unhappy.

The carelessness of the authorities does not stop here. Even after such unhappy appointments the attention paid by the local authorities to see whether their nominees try to improve themselves and discharge satisfactorily the duties which they are required to perform, amounts to nothing but a mere farce. Many of the officers so appointed try to appear for the departmental examination merely as a matter of form. From year to year they appear but fail and the authorities equally, as if a matter of etiquette, pass some official censure which these happy examinees think to be nothing but annual routine work on the part of the local government. After so-called many attempts of the examinee the government excuses him from any further attempt to pass the examination with some such remark "taking into account the circumstances of his appointment he is excused from appearing &c."

It is no wonder that the working of such officers is any thing but satisfactory. But will the higher authorities seriously think of remedying these evils hereafter? We have very few hopes since it hardly occurs to the Judicial Commissioner and the district Judges to inspect as often as is necessary the records of cases decided by such worthies. It is a pity that the tax-payers of Berars are so heedlessly treated by the government.

---

### MAHABLESHWAR-A SANITARIUM

(communicated)

The sanitarium so widely known in the Deccan as Mahableshwar bears the name of Malcolm Peith or Nahar & is nearly 4 miles by the carriage road from Mahableshwar proper which, is the source of the rivers Krishna, Venya, Koyna, Gayatri, and Savitri. The road from Poona lies through Wai, via Panchgani to Nahar. The journey from Poona to Wai by a tonga is not a very comfortable one; you have to go in *rickety* tongas that are jerking and jostling at very step; then up you ascend from Wai to Panchgani which is not so uncomfortable a journey as the tongas are necessarily slow there, until you come to Panchgani where you feel the climate entirely changed; and here no more the hot breezes of the lower plains blow against the weary traveller. The ascent thenceforth is also not a very trying one; there are ups and downs no doubt; but the whole length from Panchgani to Nahar may be described as a mountain-head level. As one ascends slowly up the ghauts the scene below is not very pleasant; all is one arid waste of steep precipices and deep ravinous gorges except when the sight is relieved of the dull monotony by a cluster of ferns and wild stunted trees. At Panchgani however there are tall trees that make the whole place appear like one vast garden of cypress trees. Here then is the feeling of the first change; onward you move when you find the climate cooler & cooler until at Nahar you get down from your garry and let your Tongawalla go with what they call *Bukseesh* or *Cherry-merry*. There are various roads from Nahar to Mahableshwar proper, to Mahad, to Sattara, and to Wai. Whichever way one goes he will see the trees beside the roadside thickly growing together but not quite mattedly interwoven, but forming passages underneath them for the cattle and the man of the Jungle to pass through. The Jungle is full of the trees called Párjámbhul with eatable fruits, the Pishi tree, considered to be a specific for consumption and general debility, the Gela tree with its nuts useful for boils, the Ràmàtha tree a medicine to dislocate the teeth to which might be added several names of minor note. There is one creeper especially which I have heard of but not seen and examined, the chewing of whose leaves makes the tongue so dull that sugar tastes like earth. It is supposed that this creeper might possibly prove useful for the cure of diabetes. So far for the flora of the place; now for the fauna and I suppose many Sablogs would like to know what sort of Shikaring they might expect, if they might go up the hills at all. There are the Bhekads and there are the deer in the Brahmaranya which place will be shortly noticed. Tiger there is none which is a legitimate denizen of

the forests at Mahableshwar; now and then a tiger commits some havoc amidst the village cattle and then there is great excitement and hot pursuit of the animal by tiger-hunt loving Europeau and native gentlemen. Only the other day an half-grown tiger killed a cow and the animal was traced but somehow it escaped the Shikari people. I myself clearly saw the foot-prints of the animal on the road leading to Brahmáranya where the wood is rather thicker than elsewhere & so affords a safe noon-day retreat for a stray tiger. Besides these animals there is a pretty large game of fowls and those who go out shooting return often with a goodly number of the flying folks. So much then for the fauna of the Locality. There is also much of geological interest; the whole range of the mountains are the result of volcanic eruptions of days past memory; it clearly betrays an origin of lava; there is not the least doubt of any single portion being diluvial. I suppose in India rocks of this kind are peculiar to the Mahratha country. In connection with this, it may be very useful, to notice that a large portion of the rocks contain iron ore which as the Dhavads informed me, is of the very best kind. Formerly before the British Government had any thing to do with these mountains the Dhavads, a class of Mohamedans whose sole profession was once of extracting iron ore from these mountains, took out large quantities of iron ore. Now they are virtually debarred from carrying on their profession as the forests are reserved, and consequently no wood or charcoal can be used to heat the iron ore. This class of people is in a very wretched state and it has to live as the ordinary labouring class. I saw some of the stones which I was told were stones containing iron ore. They are purple in color. One result of their being iron ore in the mountains is that the ice-cold water of the streams that flow out from them has a somewhat bitter taste & is more digestive than ordinary water elsewhere as it contains iron in solution. The soil wherever it is more genial to the growth of trees is soft and of a reddish colour but it is not a very yielding soil. It sticks to your clothes and gives your clothes a reddish appearance like the Byragis' chhatis or wearing-dhoties. The products of the soil are not many, nor are they important. I mean the products from the natural soil as it is, without any extraordinary labour; for with labour potatoes can be grown and cabbage and other English vegetables as also coffee; only a plentiful supply of water is necessary and manure of oilcakes.

Now we shall turn to the points of this mountain range which afford a view of the valleys beneath. These are the Bombay Point, the Lodwick Point otherwise called the Sydney Point, the Cornac Point, the Falkland Point, the Kates Point, the Elphinstone Point and the Arthur Seat Point if it may be so called. From the Bombay Points one can see the Mahad creek and the valley beneath, which is rather more woody than the other valleys, as also the distant windings of the river; in the evenings one can also see the glorious setting of the sun beyond the mountain-head that limits the view of the horizon in the western direction. A lot of people drive to the point in the evenings to enjoy a cool westerly breeze. This year Nahar had not its full tide of visitors, they say; so, generally the points were not so crowded as they ought to have been. However, the Bombay Point is of all the more fashionable evening resort of the visitors at the hill. I have not myself gone to the Lodwick Point or to the Carnac or the Falkland points; but the views from those points, I am told have not specialty. From the Elphinstone Point, one has a good view of the valley below, as also of the famous hill fort Pertapghar. This is a hill-fort and countains the temple of the goddess Bhawani who was worshipped by the great Shivajee himself. What feelings arise within the breast of a genuine Mahratta! It would be perhaps better to avoid them putting on paper. I had a great curiosity personally to see the fort and take a view from it; but unfortunately had not the leisure to do so. From the Arthur Seat Point, one can see range behind range of infinite mountainous risings, quite naked. At noon a very good view can be had; a fine scene for the landscape-painters pencil; alternate shade and light making the whole appear like a screen with beautifully colored stripes of black and white. There is a spring near the Seat, a little lower down, of very delicious and pure water coming direct from the iron rocks. If one wishes to lose himself in the Jungle, he will get his desire if he enters the wood beyond Arthur Seat by one of the foot-paths leading no one easily knows where. In conneotion with this place, it may be mentioned Brahmáranya which is a wood rather more intricate than the adjoining wood. There is a tradition that Brahma the creator of the Hindu Pantheon, performed a sacrifice in this forest, along with several other Rishis; and as a proof of this, the Brahmins dig out the Bhasma or the sacred ashes at the sacrifice, which are I fancy "rather as an heterodox, no more than a kind of clay with a peculiar smell." Next we come to the Kates Point; from this place, one can see the windings of the Kristna river and the valley of the river in beautiful mazes, and a copsewood of lowly Jungle ferns and trees. Besides these there are two paths which are known as the Blue Valley and the Tiger's path. These go through a very thick and awe-inspiring Jungle. The next place worth description is Mahableshwer the source of the rivers Kristna and four others. This is a small village consisting of a haudful Brahmins, Kunbis and Guravs. Here there are the temples of Mahableshwar and Atibalshwar. The story with regard to this is that there were two mighty giants named Mahabal and Atibal, who became powerful and disturbed the peace of Heaven and Earth. At last they were killed by Shankar, the great God of Destruction and as a last boon these two giants asked Shankar to have their names perpetuated. The five rivers that are supposed to have their source here, come from five niches in a wall; it is said that the sacred Ganges comes here after every 12 years, in the Kanya'gat year; and Saraswate comes here after every 60 years, at Kapila Shashte.

The scenes and engagements at Nahar are not many, at least so far as the natives are concerned. They can enjoy the horse races which come off more than once in the season, as also the band. The people that come to the hills are first the European officials, including the Governor of Bombay and suite; secondly natives who were once in high office but who have retired from Government service; thirdly the puppet chiefs of the Southern Mahratta country and their men; fourthly men who are simply desirous of spending their summers in cold weather; and lastly those that are sick and come here for physical improvement. The first mentioned class come here as a matter of course; they have their pleasures at the ball, at the Club rooms and in rides and drives. The second class come here to keep themselves in the good graces of superior British officials, so as to avoid becoming antiquated. The chiefs who as somebody expressed at the horse races could by analogy be called political courtesans, come here as in duty bound to dance attendance upon the secretares to Government and the Governor himself. Their position in the eyes of the English people is, I suppose no more than that of noblemen with big pomp, and very little knowledge of things. The fourth and fifth class of men, come here with a self evident object. As the band stand, one can see a motley crowd of Parsees, and Europeans and Mahrattas of all the classes above mentioned. There is the Native Library to engage the natives; and on every Sunday lectures are delivered by various gentlemen, the latest being one on Female Education' by Mr. Shankar Pandurang Pandit.

In the Peth or the main street which is occupied by the natives, there is not so much cleanliness as in the European buugalows which do not lie in a range but are all isolated more or less. The living here is comparatively dear; but one can reap all the advantages of Sanitarium with a moderate expense.

It would not be quite out of place, if I give at the end of this description of Mahableshwar some idea of the weather at the advent of the monsoons. There are mists and breezes first; followed by a heavy rain-fall; and the air then becomes so damp as to be quite undesirable. The fogs are so thick sometimes that hardly a thing is seen at a distance of two hands. It becomes necessary by the end of May to bid adieu not very willingly though, to the chief Sanitarium of the Southern Mahratta country.

---

## वऱ्हाड.

या सालची वऱ्हाडची वकिलीची परीक्षा सप्तेंबर तारीख २ रोजीं उमरावतीस सुरू होणार आहे. या परीक्षे करितां येणाऱ्या उमेदवारांनीं अर्ज पहिल्या जून पर्यंत कामिशनराकडे पाठवावे असें तारीख १९ मेच्या प्रसिद्ध झालेल्या रेसिडेन्सी आरडरवरून गेल्या आठवड्यांत कळलें. बाहेर गांवच्या लोकांस ही मुदत फार थोडी असल्याकारणानें बरीच गैरसोय होणार आहे तर ही तारीख पुढें घालावी असें आम्ही सुचवितो.

प्रसिद्ध तंट्या भिल्ल यानें जळगांव तालुक्याचे सरहद्दींत मोठा डाका घातल्यामुळे येथून त्याच्या शोधार्थ पोलीस सुपरिनटेन्डन्ट मि. कंबरलेज हे तिकडे गेल्याचे समजते.

मि. नोल्डीस साहेब वाशिमचे डे. क. हे काल रोजीं चिखलदऱ्याहून येथें येऊन वाशिमास रवाना झाले.

येथिल मुलीच्या शाळेचे मास्तर रा.रा. गोपाळ विनायक बापट यांनीं येथील लायब्ररीस एक सुमोर १६ रुपये किंमतीचें घड्याळ बक्षिस दिलें. ही देणगी, बापट यांच्या अल्प किफायतीच्या मानानें पाहिली असतां फार मोठी आहे. या त्यांच्या औदार्याबद्दल आम्ही त्यांची जितकी स्तुति करावी तितकी थोडीच होणार आहे. रा. रा. बापट ह्यांचे सत्कृत्य लोकांनीं कित्ता घेण्यासारखें आहे.

यंदा वऱ्हाडांतून म्याट्रीक्युलेशन परीक्षेंत पसार झालेले रा. रा. नारायण बालकृष्ण परांजपे यांस येथील इंग्लिशमराठी शाळेंत २५ रुपयांचे जागेवर नेमिल्याचें कळतें. शाळाखात्याप्रमाणें इतर खात्यांत ही युनिव्हार्सिटीच्या परीक्षां पास झालेल्या लोकांस नेमिल्यानें त्यांस जास्त उत्तेजन येईल.

गेले आठवड्यांत येथील अ॰ डेप्युटी इार्कीचे जागेवर जी नेमणूक झाली ती कामिशनरचे सरक्युलरा विरुद्ध झाली असल्यामुळें बरीच वाटाघाट चालू आहे असें समजतें.

येथून कमी पगारावर बोरगांवाचे पोस्ट मास्तरचे जागीं नेमिलेल्या निळकंठ हरी नांवाच्या मनुष्यावर पैशाची अफरातफर केल्याबद्दल खटला चालणार आहे असें कळतें. पोस्टल खात्यांत वारंवार अशा प्रकारचे अपराध घडत असल्यामुळें लहानसहान ठिकाणचीं पोस्ट मास्तरचीं कामें तेथील शाळा मास्तराकडे देऊन त्यांस ६ रु. अलावन्स द्यावयाचा ही व्यवस्था, या खात्याचे वरिष्ठ अधिकारी आजपासून सुरू करणार आहेत. ही नवीन युक्ती कितपत सुयंत्र चालेल याबद्दल मोठा विचार आहे.

औरंगाबाद समाचार वरून कळतें कीं हैद्राबाद येथील सुलतान नवाब जंग यांचे कर्जा प्रकर्णी एकदाचा निकाल लागला. सर्व हकीकत अद्याप आमचेतों बाहेर आली नाहीं, एक कोटी रुपये दर वर्षास पांच लक्षाचे हप्ते बंदीनें द्यावें असा कमिशननें ठराव केला.

प्रसिद्ध किर्लोस्कर संगीत नाटककार मंडळी ह्या आठवड्यांत येथें येऊन तारीख ६ मिनहू रोजीं पहिला खेळ करणार असें समजतें.

ह्या डिव्हिजनचें पोष्टा कडील इन्स्पेक्टर मी. गोपाळराव हे बोरगांव येथील पोष्ट मास्तरावरील खटला चालविण्या करिता येथें आले आहेत.

मे. डन्लाप साहेब यांस आतां नवीन नेमणूकी प्रमाणें दोनहजार रुपये दरमाहा मिळणार असून दरवर्षास चारशे रुपये प्रमाणें पांच वर्ष पर्यंत बढती ही मिळणार असें कळतें.

निजाम सरकारचे सैन्यावरील कमान्डिंग आफिसर मेजर नेव्हिल यांनीं हैद्राबाद येथील "टेलिग्राफ" नांवाच्या वर्तमान पत्रावर अब्रूची फिर्याद केली आहे. फिर्यादी तर्फे मि. जारडान मुंबई येथील बारिस्टर हे आहेत. या मुकदम्याचा काय निकाल होता आकडेस सर्वांचे डोळे लागले आहेत.

मलकापूर—तारीख २४ रोजीं दिवसा बारवाजतां एक मोठी वीज पडून दोन बापका एकदम ठार झाल्या व आणखी दोघीस साधारण दुखापत झाली आहे.'

---

## वर्तमानसार

जगतांतील कोणतीही वस्तु माझी म्हणणें व्यर्थ आहे—एक मुशाफर तार्तरी देशांतून प्रवास करित करित बल्क शहरीं आला, आणि नजर चुकीनें धर्मशाळा आहे असें समजून राजवड्यांत गेला. राजवाड्यांत इकडे तिकडे कांहीं वेळ फिरून, एका मोठ्या दालनांत शिरला. आणि आपली मुशाफरीची पिशवी खालीं ठेऊन आपली सत्रंजी पसरून, हात पाय ताणून झोंप घेऊं लागला. अशा स्थितींत फार वेळ झाला नाहींतोंच राजपरिचारकांनीं त्यास पाहिलें, आणि त्यास विचारिलें कीं, तुशे ह्या ठिकाणीं येण्याचें काय कारण? मुशाफरानें त्यांस उत्तर दिलें कीं, मी ह्या धर्मशाळेंत रात्रीचा मुक्काम करण्याकरितां आलों आहें. राजसेवकांनीं त्याची बरीच खरडपट्टी काढिली; आणि त्यास निक्षून सांगितलें कीं ही धर्मशाळा नव्हे, राजवाडा आहे. असें त्यांचें बोलणें चाललें आहे इतक्यांत राजा त्या रस्त्यानें जात होता; त्यास मुशाफराचे मुर्खत्वाचा व चुकीचा मोठा अचंबा वाटून त्यानें त्या मुशाफरास विचारलें कीं, तुला राजवाडा आणि धर्मशाळा ह्यांचे मधील भेद कळत नाहीं काय? मुशाफरानें उत्तर दिलें, "महाराज" "आपल्यास दोन प्रश्न विचारण्याची मला मोकळीक असावी. हें घर ज्यानें प्रथम बांधलें तो कोण होता?" राज्यानें उत्तर दिलें कीं, माझे पूर्वज. फिरून मुशाफरानें विचारलें कीं, तुमच्या मागें येथें कोण राहत होता? राजानें उत्तर दिलें कीं माझा बाप. फिरून मुशाफरानें विचारलें कीं, हल्लीं येथें कोण राहत आहे? राजानें उत्तर दिलें कीं, "मी" फिरून मुशाफरानें विचारलें कीं, तुमच्या मागें येथें कोण राहील? राजानें उत्तर दिलें कीं, "माझा मुलगा" मुशाफर म्हणाला कीं ज्या घराचे धनी वारंवार बदलतात, तें राजवाडा नाहीं पण उघड धर्मशाळा आहे." हें ऐकून राजा चकित झाला आणि त्यानें मुशाफरास मोठें बक्षिस दिलें.

अकाली मृत्यू—दाजी साहेब किबे यांचे जेष्ठ पुत्र विनायकराव किबे यांस सोमवारीं इंदूर येथें देवाज्ञा झाली.

मांस खरेदी:—रशियन सरकार व इंग्रज बहादुर यांचे द्वंद्व झाल्यास सोल्जरचें पोट भरण्यांस मांसाची जरूर लागेल, म्हणून इंग्लिश सरकारानें अमेरिकेंत मांस खरेदी चालविली आहे!! दोन खाटिक कंपन्या कडून १ कोट पौंड मांस खरेदी झालें. लढाई तर पुढेंच आहे. तूर्त चार पायाचे प्राणी खपतात!!! सोल्जर लोकांचे बरदाशी बदल ह्या तजविजी? यंव!! ज्ञाते पुढील तरतुद अशीच करितात!

पोलीस जुलुम करूं लागले काय?—कोल्हापूरांत शुक्रवार पेठेंत एका नवऱ्याच्या बापकोवर पोलिसानें जुलूम करून तिला काढून नेली. आतां मात्र शिकस्त झाली! सरकारचे आश्रित देखील अशीं कामें करूं लागले ना? मग दगलबाज लोकांस कशास हंसावें!

गंमत—एक अमीर आपले मित्रमंडळामध्यें बोलत बसला असतां त्याला भोजनास उठावयाचें होतें. पण तो पडला पक्का कृपण? त्याणें विचार केला कीं, आपण जर भोजनास उठून गेलों तर वाईट दिसून, त्यांत जे याचक होते त्यांस विषम वाटेल. म्हणून तो त्यांस म्हणाला,:—मी शौचास जाऊन येतों. असें म्हणून तो निघून गेला आणि जेवून बाहेर आला. कर्मधर्मसंयोगानें त्याचे दाढींत एक शीत अडकलें होतें. तेव्हां जवळच एक स्पष्टवक्ता बसलो होता तो म्हणाला, जनाब! आपल्या दाढींत विष्टा अडकली आहे ती काढावी तेव्हां तो अगदीं खजील होऊन मंडळींत हंशा पिकला!

जं० क

ठाणें जिल्ह्यांतील जंगल जुलमाचें प्रकरण पार्लमेंटांत लवकरच निघेल असें दिसतें. सदर्हू जिल्ह्यांतील १,००० चौरस मैल जमीन मुंबई सरकारानें राखीव जंगा लाकडे घेऊन १० लक्ष प्रजेच्या पुरातन हक्कांचा व शेतीभातीचा वगैरे चुराडा चालविला आहे हें खरें आहे कीं काय असा प्रश्न नामदार स्लाग साहेब यांनीं हिंदुस्थानचे अंडर सेक्रेटरीस विचारला आहे असें समजतें. अंडर सेक्रेटरी दाद देतील तेव्हां! स. प.

साहेबास शिक्षा—हेनरीविड नावाच्या पब्लिकवर्क्स खात्यांतील अकौंटटनें बिलांतले आंकडे फिरवून सरकारी पैसे चोरले होते त्यास सियाल कोटचे डे. कमिशनरांनीं ६ महिने सक्त मजुरी व ५००रु. दंडाची शिक्षा दिली!

निर्लज्जपणाची परमावधि अद्याप झाली नाहीं—श्री. होळकर सरकारचे प्रायव्हेट सेक्रेटरी रा. सा. बळवंतराव पटवर्धन यांनीं आपले बायकोच्या हातानें ना. गिब्स साहेबांच्या गळ्यांत हार घालविला म्हणून शिवाजी म्हणतात.

✓ मध्यप्रांतांतील सांबलपूर जिल्ह्यांतल्या कांहीं रयतेनें तेथील डेपुटी कमिशनराकडे आपली दाद लागण्याची एक नवीच युक्ति काढली आहे. डे. कमिशनर एके दिवशीं दिवसाढवळ्या एका गांवाच्या हद्दींत शिरला असतां तेथील लोक मोठाल्या पेटलेल्या मशाली हातांत घेऊन समोरे आले! दिवसाढवळ्या मशाली पेटवून कां आलां म्हणून डे. कमि. नें सहजच विचारलें तेव्हां ते म्हणाले कीं, इंग्रजी राज्यांत अंधार झाला असल्यामुळें डे. कमि. स रस्ता दाखविण्यास उजेडाची गरज आहे असें आम्ही समजतों! म्हणजे काय असें डे. नें विचारलें, त्यावर शेजारच्या गांवचे लोक आमचीं मालकीचीं झाडें कापून नेत असतां त्याची कांहींच दाद लागत नाहीं असें त्यांनीं सांगितलें. हें ऐकतांच डे. कमिशनरानें लागलीच चवकशी सुरू केली. अर्ज्या करीत बसण्यापेक्षां ही युक्ति दाद लागण्यास खाशी झाली कीं नाहीं?

अ० द०

एक चमत्कारिक खटला—आलबर्ट या नांवाच्या गृहस्थानें कांहीं दिवसांपूर्वी हल्लींचे प्रधान मि० ग्ल्याडस्टन यांस एक पत्र आपल्या नांव व पत्यासह पाठविलें त्यांत असें लिहिलें कीं जर तुम्ही अमुक दिवसांत २००० रुपयाची रकम मला पाठविणार नाहीं तर अमक्या दिवशीं मी तुम्हाला ठार मारीन. तें पत्र पोंचताच त्या मनुष्यास पकडून त्याच्यावर खटला चालूं झाला.

अंडामन्स बेटांत ठेवलेले कांहीं बर्मीज कैदी कट करून तुरुंगांतून बाहेर गेले व त्यांनीं कांहीं हत्यारें व दारू समान चोरलें. त्यानंतर त्यांनीं जंगलांत जाऊन तेथून नार्थबे येथील निमक खान्यावर कांहीं धान्य सामुग्री वगैरे मिळेल या हेतूनें हल्ला केला. या दांडगाईनंतर्ये येथील अफिसरांस यांनीं ठार केलें व पुन: ते जंगलांत पळून गेले. यानंतर यांच्या शोधार्थ एक आगबोट मागून पाठविली त्या आगबोटीवरील माणतांस ही टोळी भेटल्याबरोबर थोडीशी मारामारी होऊन या दंगेखोर लोकांपैकीं २मेले व कांहीं जखमी झाले पण ह्यांच्या पैकीं कोणी अजून पकडले गेले नाहींत असें समजतें.

दी० बं०

न्युयार्क शहरांतील हिंदु विद्यार्थी—कृष्णराव बी बल्लेळ कावाचे गृहस्थ जे अमेरिकेंत वैद्यकीचा अभ्यास करावयास गेले आहेत त्यांची वैद्यशास्त्राची परीक्षा फारच चांगली उतरली ह्मणून टाईम्स आफ इंडियाचा बातमीदार लिहितो. यांनीं वैद्यकीय पाठशाळेंत अवघा ६ महिनेच अभ्यास केला होता व इतक्या थोड्या काळांत अभ्यास करून परिक्षेंत १ ला नंबर येऊन यांची मोठी कीर्ति झाली. जर हे तीन वर्षेपर्यंत पाठशाळेंत राहिले असते तर पाहिले बक्षिस यांसच मिळालें असतें परंतु वेळेचे अटीमुळें तें यांस मिळालें नाहीं. कारण हे ६ महिनेच पाठशाळेंत राहिले. तरी हरएका विषयामध्यें याचा १ ला नंबर आला. त्या संबंधानें पाठशाळेच्या अध्यक्षांनीं यांची फारच वाखाणणी केली व त्यांचा सतत आणि दृढनिश्चयानें अभ्यास करण्याचा प्रयत्न फारच पसंत ठरविला. हल्लीं डा० बल्लेळ न्युयार्क शहरीं आपल्या सहाध्यायी मित्रांबरोबर कालक्षेप करीत आहेत व लवकरच त्याचा मुंबईस येण्याचा मानस आहे. मुंबईस आल्यानंतर येथील विद्वान लोकांनीं त्यांचा योग्य सन्मान करावा अशी त्या बातमीदाराची सूचना आहे.

जोहर करण्याची तावडी, हिरवी किंवा कोणत्याही रंगाची लाख ब्रांडी किंवा वाइन दारूंत मिळविली असतां पेट्या वगैरे रंगविण्याचें उत्तम रोगण तयार होतें.

साताऱ्यास काबुली लोक घोडे विकण्या करितां गेले आहेत. त्यांजपासून तेथील एका साहेबांनीं एक घोडा ठरवून पैसे बंगल्यांत देण्याच्या करारानें नेला व पैसे देतेवेळेस कांहीं पैसे कमती करावे ह्मणून पैसे आणण्याकरितां पाठविलेल्या गृहस्थास साहेबांनीं विचारिलें, नेटिव आहे व त्यास जरा दरडाविलें कीं वठणीस येईल असें साहेबांस वाटलें परंतु तो काबुली मनुष्य—त्याला कोणाची भीड मर्यादा नसल्यामुळें त्यानें ताडकन साहेबांस असा कांहीं वाग्बाण समर्पण केला कीं साहेब चुरमुरे खात राहिले व मुकाट्यानें पैसे त्याच्या हातावर ठेवून त्यास सलाम केला.

सु० प०

---

नोटीस.

रा. मुरारी वलद रामजी तेली राहणार जवके तालुके अकोट जिल्हा अकोलें यांस त्यांलीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमच्याशी माझें लग्न होऊन अदमासें सोळा वर्षें झालीं. आज सुमारें एक वर्ष झालें मजला तुम्ही माहेरी बापाच्या बोलावण्यावरून एक महिना पाठविलीत नंतर मी व माझा बाप मिळून चार दोन वेळां तुम्हाकडे येऊन राहिले परंतु तुम्ही विनाकारण मजला घरीं नवळ ठेऊन न घेतां घालवून दिलें. त्यानंतर मी आपले बापाचे घरीं आज वर्षभर कर्ज काढून अन्नवस्त्र घेत आहे. आपल्या कडे मजला न्यावें म्हणून यावर्षांत फार वेळा सांगितलें. परंतु तसें कांहीं होत नाहीं याजकरितां ह्या नोटीशीनें कळविलें जातें कीं, नोटीस पावल्यापासून आठ ८ दिवसांत मजला घेऊन जावें. नाहींतर सोडचिठी द्यावी, व एक वर्षाची पोटगी वगैरे रुपये ६० द्यावें. असें न केलें तर रितीप्रमाणें कोर्टांत दावा करून रुपये घतले जातील. व हीच सोडचिटी समजून दुसरा घरठाव करीन. कळावें म्हणून लिहून दिली नोटीस सही. ता० २९ माहे सन १८८९ ईसवी.

(सहीचो) बांगडी

काशी मर्द मुरारी

तेली ईची आहे

---

# डाक्तर गोविंदराव खोत यांनीं विशेष काळजीनें तयार केलेलीं सरबतें.

१ गुलाबाचें सरबत. २ लिंबांचें सरबत. ३ डाळिंबांचें सरबत. ४ नारिंगाचें सरबत. ५ द्राक्षांचें सरबत.

हीं सर्व सरबतें फक्त फुलांच्या व फळांच्या अर्कांचीं केलेलीं असून उत्तम प्रकारचीं आहेत; आणि उष्ण देशांत थंडाई आणण्याचे जे गुण सरबतांत असावें ते वरील सरबतांत आहेत. बाजारांत मिळणाऱ्या या प्रकारच्या हलक्या जातीच्या सरबतांस वाईट रुचि व गंध असतो, त्या मुळें पुष्कळ लोकांत तीं घेणें आवडत नाहीं, म्हणून आमचीं सरबतें चांगलीं रुचकर व सुगंधीं करण्याची पुष्कळ काळजी व श्रम आम्ही घेतले आहेत असें खात्रीनें कळवितों. हीं सरबतें पाचक, रुचकर, थंडाई आणणारीं, व मधुर आहेत. यास्तव उन्हाळ्यांत हीं फार हितकर आहेत. आणि इतर सरबतांच्या अंगीं दाह उत्पन्न करण्याचा जो दोष आढळतो तो यांच्या अंगीं बिलकूल नसल्यामुळें हीं सर्वांनीं घेण्यास विशेष योग्य आहेत.

घेण्याची कृती २ पासून ३ मोठे चमचे कोणत्याही स० चे पेलाभर पाण्यांत घेणें.

ह्या सरबतांचा मोठा कारखाना उमरावतीस मालकानें घातला आहे. ज्यांस हीं सरबतें हवी असतील अशा व्यापाऱ्यांनीं तीं मागवून घेण्याबद्दल त्यांस विनंती आहे.

## किंमत.

| | | |
|---|---|---|
| गुलाबाचें सरबत | ९ रु० | एक ड० मोठ्या बाटल्यांस |
| लिंबांचें " " | ९ | " " " " |
| डाळिंब (अनार) | ९ ॥ १२ | " " " " |
| संत्र्याचें | १०॥८ | " " " " |
| द्राक्षाचें | १२ | " " " " |

दर डझनच्या पेटीला व प्याकिंगला चार आणे शिवाय पडतील.

एकदम घेणारास शेंभर रुपयांस ८ रु० कमिशन दिलें जाईल.

सरबतें उमरावतीस व अकोलें येथें 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत मिळतील.

पत्ता डा० जी० व्ही. खोत उमरावती.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै. बा. खंडेराव बाळाजी यांचे 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

…cks o. -g…

5. To decide questions 1c

ताहामाही .. १ ,, ,, ८८
साहामाही .. ० ,, ,, १८८
कीरकोळ अंकास ...............८२

१० अ... ... ातरु.१
पुढें दर ओळीस ८१८६
दुसरे खेपेस .... ८१

Perannum in arrears 17 7 1 Rs
Six monthly ......... 3 7 8as
Single copy ......................... 4as

Advertisements
Below 10 lines......2Rs
per line over 10 ...4as
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XIX AKOLA MONDAY JUNE 8 1885 NO 22

पुस्तक १९ अकोला सोमवार तारीख ८ माहे जून सन १८८५ इ० अंक २२

## पक्षकार लोकासफार उपयोगी माहिती.

रा० रा० रामचंद्र दाजी नगरकर बी.ए एल. एल. बी. मुंबइ हायकोडताचे वकील, हे सध्या वऱ्हाडांत आले आहेत. हे मोठ्या घराण्यांतील असून हुषार, व अनुभवशीर आहेत. यांचे हापीस वऱ्हाडसमाचार छापखान्याशेजारी काळे मारुती जवळ आहे. वऱ्हाडांतील लोकांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें अशी आमची त्यांस सूचना आहे.

तारीख ९ माहे दिसेंबर सन १८८४ } पत्रकर्ते

## RESIDENCY ORDERS NOTIFICATION.

No. 20.

*The 19th February* 1885

The following bye-laws framed by the Municipality, Akola under Section 14 of Act IV. of 1873 [The Punjab Municipal Act], for the regulation of the cotton market at that place have received, under Section 15 of the said *Act*, the approval of the Resident, and are hereby published for general information:-

*Appointment of committee*

I. A cotton market committee, composed of five members, three of whom will be municipal members, and the remaining two persons engaged in cotton trade, shall be appointed annually in the first week of September by the registered cotton merchants of Akola, subject to the confirmation of the Municipal Committee. The cotton committee shall appoint one of its own members as chairman.

*Quorum at meetings.*

II. At meetings of the cotton market committee the presence of three members shall be necessary to form a quorum, and their decision on all questions shall be final, *except where specially provided for by these rules.* At such meetings the chairman shall, in the event of the meeting being equally divided, have a casting vote.

*Powers of the cotton market committee.*

III. The cotton market committee shall exercise the following powers:-

1. To take a general control of the cotton market and establishment employed therein.
2. To enforce the regulations of the market.
3. To collect the market cess on behalf of the municipality.
4. To inspect the weights, chains, and scales used in the tucks of registered buyers.
5. To decide questions referred under Rule 14.

Provided that in entering any private tuck for purposes of inspection not less than two members of the committee shall be present.

*Buyers to register their names.*

IV. All persons wishing to buy in the market shall be required to enter their names in a register kept in the cotton exchange, and shall declare their in:—

1. Their adherence to the cotton market rules.
2. The locality of their tucks.
3. Or if they have no tucks, the place where they propose to weigh cotton.

*Public brokers not allowed.*

V. No public brokers will be allowed in the market. Registered buyers, who ordinarily purchase not less than 500 bojas per annum shall be allowed to employ not more than two private brokers or servants in purchasing in the market. Buyers who ordinarily purchase less than 500 bojas shall not be allowed to employ any brokers or servants in purchasing in the market.

*Exclusion of persons not bona fide buyers.*

VI. The cotton market committee may strike out of the register the names of persons who are not *bona fide* buyers, and whose object in registering themselves as buyers is to evade the rule excluding public brokers.

*An* appeal against an order under this rule shall lie to the Municipal Committee.

*Explanation:*— A *bona fide* buyer within the meaning of this rule is a person who *bona fide* weighs, takes delivery, and pays for the cotton purchased.

*Memo. of the purchases to be given to sellers for registration at the exchange room.*

VII. No buyers shall enter the market without providing himself with printed forms of tuck putee, which may be supplied by the Municipal Committee. These forms shall be filled in by the buyers when cotton is purchased and given to the sellers.

These forms should be shown to the Darogah before cotton is *removed* from the market.

*Stamped chains attached to scales ... ges, ... country ... ard weights. in the real ... no signifi...*

VIII. Chains of uniform weight of 10 lbs., and stamped by the cotton market Committee, shall ... to each buyer to be ... him in attaching the ...o the scale.

For the purposes of weighing cotton 1 lb. shall be taken to be equal to 40 tolas, 28 lbs. equal to one maund, and a docra to represent 5 maunds, and a boja 10 maunds.

*No addition to be made to chains*

IX. The chains prescribed by Rule VIII. represent the average weights of the wrapper or gunny in which cotton is packed, and no further weights or additions shall be added thereto.

*Trade allowance.*

X. The following deductions are recognized on purchases:-

1. Trade allowance 3 annas per boja.
2. One pound per boja (to be deducted from the quantity shown in the tuck puttee). The sample taken out for examination to be replaced in the docra.

*Cotton bojas to be registered.*

XI. Every boja of cotton that comes within municipal limits for sale should be registered in the market.

*Market cess and collection of.*

XII. *A* yard fee of one anna per boja, out of the three annas alluded to in Rule X., shall be paid by the seller for cotton brought into market for sale to the registered buyer, who will make monthly payments of the same to the municipality. The proceeds of this cess wil form the income of the cottonl market committee.

*Market cess on what to be expended.*

XIII. The market cess will be expended by the cotton market committee on establishment & making improvements in the cotton yard and its approaches:

*Complaints*

XIV. Complaints regarding any matter connected with cotton trade of Akola may be made in writing to the cotton market committee.

XV. *Any* registered buyer or any seller of cotton shall be entitled to ask for a meeting of the cotton market committee, and on receiving such requisition the chairman will arrange for a meeting at the earliest convenient date.

XVI. *Any* person not conforming to the above rules will be debarred from using the market.

XVII. *A* copy of the market rules in English and Marathi shall be hung up in the exchange room.

(By order.)

W. J. CUNINGHAM,

*Secretary for Berar.*

## रेसिडेंन्सी आरडर जाहिरात नंबर २०

तारीख १९ माहे फेब्रुवारी

अकोले येथलि (काटन मार्केट) रूई बाजाराचा बंदोबस्त राखण्या करितां आक्ट नंबर ४ सन १८७३ [पंज्याब मुनिसिपाल आक्ट] यांतील कलम १४ अन्वयें-त्या शहरचे मुनिसिपाल कमेटीनें तयार केलेले नियमास वर लिहिलेले आकटाचे कलम १५ अन्वयें अलिशान-रेसिडेंट साहेब बहादूर यांची मंजूरी मिळाली आहे व ते नियम या आधारें सर्व लोकांचे माहिती करितां प्रसिद्ध केले जात आहेत.

१ ज्यांचीं नांवें नोंदलीं गेलीं आहेत

कमेटीची नेमणूक } अशा अकोले येथील रूईचे व्यापाऱ्यांनीं दर वर्षी सप्टेंबर माहिन्यांतील पहिले आठवड्यांत एक काटन मार्केट कमेटी मुनिसिपाल कमेटीचे मंजुरातीनें ने... या कमेटींत पांच मेंबर असावे त्या पैकीं तीन मुनिसिपाल मेंबर असावे आणि बाकीचे दोन रूईचे व्यापारी असावे. काटन मार्केट कमेटीनें आपणा पैकींच कोणास तरी चेअरमन नेमावें.

२ काटन मार्केट कमेटीचे सभेचें काम

सभेचे कोरम[काम चालविण्या पुरती मेंबरांची संख्या] } चालूं होण्या करितां तीन मेंबर आवश्य हजर असलेच पाहिजेत आणि त्यांनीं कोणते ही बाबतींत केलेले निकाल या नियमांत विशेष ठराव केला नसल्यास अखेरचे समजावे, अशा सभेंत सारखीं मतें झाल्यास एक ज्यास्त मत देण्याचा चेअरमन यास आधिकार आहे.

३ काटन मार्केट कमेटीनें खालीं लिहिलेले आधिकार चालवावे.

काटन मार्केट कमेटीचे आधिकार } (१)काटन मार्केट व त्या संबंधीं नोकर लोक याजवर हुकमत असावी.

(२)मार्केट नियम अमलांत आणावे.

(३)मुनसिपालिटीचे तर्फे मार्केटचा कर वसूल करावा.

(४)नोंदलेले खरीददाराचे तकांत असलेलीं वजनें सांखळ्या आणि कांटे तपासावे.

(५)नियम १४ यांत सांगितलेल्या फिर्यादीचा निकाल करावा.

* टीप—तपासणी करितां खाजगी तकांत जाण्यास निदान दोन मेंबर असले पाहिजेत.

४ काटन मार्केटांत ठेविलेले रजिष्टरांत खरेदी करूं इच्छिणारे सर्व लोकांनीं आपलीं नांवें शरीक करून

खरेदी दारांनीं आपलीं नांवें रजिष्टरी शरीककरावी } घेतली पाहिजेत व असें खालीं रजिष्टरां लिहिलेल्या गोष्टी त्यांनीं लिहून ... पाहिजेत.

(१)काटन मार्केटचे ... वस्तु कबूल आहेत असा ले... कसें वागावें,

(२) आपल्या तक्याचें ठिकाण.

(३) तक नसल्यास कपाशीचें वजन कोणते ठिकाणीं करणार तें ठिकाण.

५ दलालीचा धंदा करणाऱ्या प्रसिद्ध दलालास मार्केटांत येण्याची मनाई आहे.

सार्वजनिक दलालास मनाई. — साधारणपणें १०० बोक्यांहून कमी नाहीं इतके बोजे सालीना खरेदी करणारे नोंदलेले खरेदीदारांस मार्केटांत खरेदी करण्याकरितां देहेंहून जास्त माहींत इतके खास गी दलाल अगर नोकर पाठविण्यास परवानगी आहे. सालीना १०० बोक्यांहून कमी खरेदी करणारास मार्केटांत खरेदी करण्याकरितां कोणी दलाल अगर नोकर पाठविण्याची मनाई आहे.

६ जे लोक वास्तविक खरेदीदार नाहींत आणि उघडपणें दलाली करणारास

खऱ्या हेतूनें खरेदीदार नसणारे लोकास मनाई. — ज्या नियमांनीं मनाई केली आहे त्यांची अंमलबजावणी चुकविण्याकरितांच खरेदीदार म्हणून ज्यांनी आपलीं नांवें नोंदलीं आहेत अशा लोकांचीं नांवें रजिष्टरांतून काढून टाकण्याचा अधिकार काटन मार्केट कमेटीस आहे

या प्रकारचे दिलेले हुकूमावरील अपील मु० कमेटीकडे चालेल.

जो इसम खऱ्या हेतूनें स्वतःकरितांच विकत

स्पष्टीकरण. — घेतलेले रुईचें वजन करितो माल गाडींत घेतो आणि त्याची किंमत चुकती करून देतो तोच इसम या नियमा अन्वयें खरे हेतूनें खरेदी करणारा समजला जाईल.

७ तक पट्टीचे छापील नमुने मुनासिपालिटी कडून घेऊं आपले नवळ ठेवि

मार्केटचे आफिसांत नोंदण्याकरितां खरेदीची यादी विकणारे लोकास द्यावी. — ज्या खेरीज कोणी ही खरेदीदारांनीं मार्केटांत घेऊं नये कपाशी

खरेदी करते वेळीं सदरहू नमुने खरेदीदारानें भरून विक्री करणारास द्यावे.

सदरहू नमुने दरोग्यास दाखविल्याखेरीज रुई मार्केटांतून हलवूं नये.

८ दाहा पौंड वजनाच्या सारख्या साखळ्या ज्यावर मार्केट कमेटीनें शिक्के केले

शिक्का केलेल्या साखळ्या कांट्यांस लावाव्या व वजनें ठरविलेलीं असावीं. — आहेत अशा कांट्यांस वजनें अडकविण्याकरितां प्रत्येक खरेदीदारास दिल्या जातील.

कपाशी वजन करण्याचे कामीं एक पौंड म्हणजे ४० तोळे, २८ पौंड म्हणजे एक मण, एक दोकडा म्हणजे ५मण आणि एक बोजा म्हणजे १० मण समजावे

९ ज्या बारदानांत कापूस भरलेला असतो त्याचे सरासरी वजनाबरोबर नियम८

साखळयास काहीं ज्यास्त लावूं नये. — यांत सांगितलेल्या सांखळ्यांचें वजन समजलें जातें, म्हणून त्यांहून ज्यास्त वजने वगैरे काहीं लावूं नयें.

१० खरेदीवर खालीं लिहिलेली वजावट मंजूर केली आहे.

वजाई (१) प्रत्येक बोज्यास तीन आणे प्रमाणें व्यापाराचा कर.

(२) प्रत्येक बोजामागें एक पौंड रुई तक पट्टींत दाखविलेल्या मालांतून कमी (परीक्षेकरितां काढलेला मासल्याचा कापूस पुन्हा देवळ्यांत घालावा)

११ मुनासिपाल हद्दींत आलेला प्रत्येक

बोजे नोंदले जावे — कपाशीचा बोजा मार्केटांत नोंदला गेला पाहिजे.

१२ मार्केटांत विक्री करितां जो कापूस आणिला असेल त्यावर विकणारानें रुऴ

बाजाराचा कर आणि त्याचा वसूल. — १० यांत सांगितलेल्या तीन आण्यांकीं प्रत्येक बोज्यात एक आणा "पार्ट-फी" नोंदलेले खरेदीदारास द्यावा व खरेदीदारांनीं सदरहू पैसा दर महिन्यास मुनसिपाल कमेटी कडे जमा करावा. या कराचा सर्व वसूल मार्केट कमेटीचें उत्पन्न समजलें जाईल.

१३ बाजाराचे कराचा पैसा महकम्याकडेस बाजारचे आवारांतव आवाराकडे चोहोंकडून

बाजारचे करानें उत्पन्न करणें खर्चावें — येणारे रस्त्यांचे सुधारणा करण्याकडे काटन मार्केट कमेटीनीं खर्च करावा.

१४ अकोलें येथील रुईचे व्यापारासंबंध फिर्यादी वगैरे सर्व तक्रारी काटन मार्केट कमेटी कडे कराव्या

१५ काटन मार्केट कमेटीची सभा भरविण्याकरितां कोणतेही नोंदलेले खरेदीदारास अथवा कोणतेही विक्री करणार सभ्यास अर्ज करण्याचा हक्क आहे असा अर्ज आल्यावर चेअरमन यांणीं होईल तितके लवकर सभा भरविण्याची तजवीज करावी.

१६ जो कोणी इसम सदरहू नियमास अनुसरून वागणार नाहीं त्यास मार्केटचा उपयोग करण्याची मनाई करण्यात येईल.

१७ मार्केटचे नियमाची इंग्रजींत व मराठींत एक एक प्रत मार्केटचे आफिसांत टांगून ठेवावी.

(सही) डब्ल्यु जे. कनिंगहाम
सेक्रेटरी फॉर बरार.

---

वऱ्हाडसमाचार

मिती अधिक ज्येष्ठ वद्य १० शके १८०७

## म्युनिसिपालिटीच्या शाळा.

( Municipal Schools )

हायस्कुलें व मिडल्क्लास शाळा शिवायकरून येथील आणि उमरावती शहरांतील इतर सर्व शाळा एप्रिल महिन्या पासून म्युनिसिपालिटीचे ताब्यांत सरकारानें दिल्याबद्दल आमचे वऱ्हाड प्रांतांतील वाचकांचे ऐकण्यांत आलें असेलच. म्युनिसिपालिटीचे ताब्यांत दिलेल्या शाळांस आतां म्युनिसिपालिटीच्या शाळा अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. पण जसें राजाचा वाडा किंवा माझा पैसा या दोन वाक्यांतील प्रथम पदाच्या षष्ठी विभक्तीनें द्वितीय पद प्रथमाच्या स्वत्वविशिष्टवस्तु समजलें जातें तसें मात्र कोणी चुकीनें समजत असल्यास तो भ्रम त्यांणीं त्वरित दूर करणें जरूर आहे. कारण या शाळांवर म्युनिसिपालिटीचा कांहीं एक अधिकार नाहीं. मालकी नाहीं. स्वत्व नाहीं. उलटपणाचें घुराचे दिवे यांत प्रथमांद्वितीय पदांचा जसा जीवनजीविभावसंबंध आहे त्याहून म्युनिसिपालिटी व त्याच्या शाळा यांतील संबंध विशेष भिन्न प्रकारचा नाहीं. म्हणजे म्युनिसिपालिटीनें या शाळांचे खर्चास पैसा द्यावा इतकाच. याहून ज्यास्ती नाहीं. ही गोष्ट या शाळा ज्या शर्तीवर आमचे सरकारानें म्युनिसिपालिटीस अर्पण केल्या आहेत त्या शर्ती बद्दल थोडी माहिती झाल्यावर आमचे वाचकांचे लक्षांत येण्यास फारसें कठीण जाणार नाहीं असें आम्हांस वाटतें. त्या शर्ती येणें प्रमाणें—सर्व प्रकारची देखरेख शाळाखात्याचे अधिकाऱ्यांनीं पूर्वी प्रमाणें ठेवण्याची, मास्तरांस बदली देणें त्यांचा पगार कमी करणें, बदल्या करणें, किंवा अगी दूर करणें पूर्ववत् पूर्वीप्रमाणेंच अभ्यासाच्या इयत्ता शाळाखात्यानें ठरविण्याच्या. परीक्षा यांचेच अधिकाऱ्यांनीं पहिल्या प्रमाणें घेण्याची, फीचे दर यांणींच ठरविण्याचे, शाळांचे स्थितीबद्दल रिपोर्ट सरकारास यांनींच करण्याचे. तात्पर्य आज तागायत चालूं होतें त्याप्रमाणें सर्व सरकारानेंच करण्याचें. खर्चाचें बिल मात्र म्युनिसिपालिट्यांनीं देण्याचें.

म्युनिसिपालिटीचे ताब्यांत शाळा देण्याचा मूळचा हेतू उत्तरोत्तर शहाणे होत चाललेले लोकांस आपल्या प्रतीचीं आपापलीं सामाजिक कार्यें आपण कशीं करावीं ही गोष्ट शिकविण्याचे इरादानें व तेणें करून राजकर्त्यांवर राज्यकारभाराचा जो बोजा तूर्त पडतो तो अंशतः तरी हलका व्हावा म्हणून व हळु हळु लोकांनीं याही पेक्षा महत्वाचे कारभारांत सरकारास मदत करण्यास लायक व्हावें. व त्यांकडून तशीं कार्यें करवावीं अशा तत्वाचा आहे हें आमचे सुज्ञ वाचक समजतच आहेत. पण या तत्वाचा या वरील व्यवस्थेंत गंध ही नाहीं हें म्हणून दाखविण्यास नकोच. या व्यवस्थेचे आद्य ऋषि कोण हें आम्हांस चांगलेंसे माहित नाहीं. परंतु आमचे सांप्रतचे लोकप्रिय दूरदर्शी डायरक्टर साहेबांचे विचारानें किंवा सल्यानें हें झालें असेल यांत शंका नाहीं. मंत्री कोणी असो या कामांत इतर सर्व कारभारा प्रमाणें नामदार रेसिडेंट साहेब यांजवर अखेरची जबाबदारी आहे हें जरी आम्हांस माहीत आहे तरी या कामांतील मंत्र्याच्या सुज्ञतेची आमच्यानें तारीफ करवत नाहीं हें म्हणण्यास आम्हांस दिलगिरी वाटते. वस्तुतः लोकलसेल्फ गव्हर्नमेंट विषयाची ही थट्टा केल्या सारखें होतें. जर म्युनिसिपाल कमिट्यांचे अंगीं तूर्त अशीं कामें करण्याचें मुळींच सामर्थ्य नाहीं असें नामदार रेसिडेंट साहेबांस वाटलें होतें तर त्यांणीं म्युनिसिपालिटीचे ताब्यांत मुळींच शाळा द्यावयाच्या नव्हत्या. म्यु० कमिट्यांनीं शाळा आपल्या ताब्यांत मागितल्या होत्या कीं काय हें आम्हांस माहीत नाहीं. मागितल्या असतील तरी अशा शर्तीवर मुळींच दिल्या नसत्या तर तो प्रकार अधिक योग्य दिसला असता. हा लोकल सेल्फ गव्हर्नमेंटचा या प्रांतांतील पहिला मासला त्याजबद्दल तोचे भावी मासले असतील तर नोंदून दिले कलसेल्फ गव्हर्नमेंट मुळींच न चालूं झाल्यास तें शतशः बरें असें आम्हास वाटतें. शाळाखात्याकडे सर्व अधिकार व व्यवस्था ठेवून फक्त खर्च मात्र म्युनिसिपालिट्यां कडून घेण्याचा जो सरकारानें ठराव केला त्याचें बीज व अर्थ आम्हांस समजत नाहींत. म्युनिसिपालिट्यां कडून शाळांची योग्य व्यवस्था होणार नाहीं असें सरकारास वाटलें असेल किंवा आपला अधिकार लोकांचे हातीं देण्यास आमचे अधिकाऱ्यांस कठीण वाटत असेल असे दोन अर्थ याचे होतात. जर पहिली गोष्ट खरी होती तर तसें कां स्पष्ट म्हणवत नाहीं! येथील म्यु० पालिट्या शाळांची व्यवस्था करण्या जोगा अजून हुषार नाहींत असें स्थानिक सरकारानें हिंदुस्थान सरकारास लिहिण्याचें होतें. परंतु तसें केलें नाहीं हें स्पष्टच आहे. कारण स्थानिक सरकारास तसे वाटतेंच तसें लिहिलें असतें तर म्युनिसिपालिट्याकडे शाळा दिल्या नसत्या. बरें स्थानिक सरकारास खरोखरच जर वाटत असेल कीं सांप्रतच्या म्युनिसिपालिट्या अशा प्रकारचें काम हातीं घेण्यास नालायक आहेत तर समजून उमजून नालायक म्युनिसिपालिट्याकडे शाळा देणें हें ही अयोग्य असें आम्ही समजतों. ज्या कामास म्युनिसिपालिट्या नालायक तें काम त्यांजकडे समजून उमजून सरकार सोंपवील अशी कल्पना आमच्यानें करवत नाहीं. महत्वाचीं व जबाबदारीचीं अनेक कामें बऱ्याच वर्षांपासून म्युनिसिपालिट्या कडून सरकार करवून घेत आहे व त्यावरून म्यु० कमिट्या तें व तशा प्रकारचें इतर काम करण्यास समर्थ आहेत असा सरकाराचा समज आहे असेंच म्हटलें पाहिजे. तेव्हां दुसरें कारण म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांस आपल्या हातचा अधिकार दुसऱ्यास देण्यास मोठें संकट वाटतें व ते आपला अधिकार यत्किंचित् ही कमी होऊं देण्यास राजी नाहींत. ही गोष्ट वर लिहिलेले अयोग्य व्यवस्थेस मुख्य कारणीभूत आहे असें म्हटल्या वाचून गति दिसत नाहीं. आपलें अंगचें पाणी दुसऱ्यास देववत नाहीं तेव्हां अधिकार देणें हें कठीण खरें. परंतु लार्ड रिपन सारख्या दूरदृष्ट्या व आमचे देशाच्या खऱ्या हितचिंतक पुरुषानें आमचे लोकास थोडा बहुत अधिकार राज्यकारभारांत देण्याचा ठराव कोणत्या हेतूनें केला आहे याकडे नजर करून आमचे सरकारी अधिकाऱ्यांनीं विशेषत नेटिव्ह अधिकाऱ्यानें त्या महत्कार्यास मदत करणें निदान विघ्नें तरी न आणणें हें आपलें कर्तव्य आहे असें समजण्याची फार आवश्यकता आहे. व्यक्तिरूप अधिकाऱ्यांचे अधिकार चिरायु नाहींत. ते कमी ज्यास्त होतात व कधीं कधीं मुळींच जातात. परंतु सेल्फ गव्हर्नमेंट व्यवस्थेचा पाया आमच्या अभाग्य देशांत पडल्यास त्यापासून आपल्या देशाचे चिरायु फायदे आहेत. या करितां आमच्या देशाच्या खऱ्या हितचिंतकांनीं सामाजिक कल्याणा साठीं आपल्या व्यक्ति महत्वाचा किंचित् क्षय होऊं दिल्यास त्यांचें खरें महत्व कमी झालें असें समंजस लोक मानणार नाहींत इतकें त्यांस आम्ही खात्रीनें सांगू शकतों.

The Berar Samachar

MONDAY, June, 8, 1885

## LEADERS OF MASSES.

In a lecture delivered at Hirabag the other day the conception of a leader of the masses was given. The speaker said that those were leaders of masses who took hold of a universal sentiment prevailing all around and carried it out in practice. He explained it by assuming that the sentiment cannot be called Universal till it prevails from Cashmere to Cape Comorin and therefore no man can be called a leader according to his conception of it whose pulse does not beat with the pulse of the whole of India. The others he defined to be leaders in detail. A learned gentleman who closed the debate suggested for consideration two kinds of leaders, viz, leaders of Ideas and leaders of Action. The first he stated to be those who have lived and perished in their idea-the seed which produced the latter class. They were martyrs. He classed General Gordon amongst them. The second class of leaders were those who carried a Universal feeling to its practical results-who gave physical embodiment to the ideas predominant in the breasts of the people.

A leader is very hard to define. The definition of a leader as one who leads is too general. Though imperfect in itself it contains the germs of any other definition or definitions that could be given. It would be a labour thrown away to frame a proper definition of a leader unless the time, the circumstances and the field or department we have in view have been fully explained. If you go to barbarous times your conception of a leader is no other than the head of a nomad tribe which feeds by plunder and game. If you come to more settled times in which popular will has yet assumed no objective shape where people yet revere the sovereign and complain of oppression or tyranny, leader is one who is wise enough to govern by paying due consideration to the wants and wishes of the nation. A tyrant since he does not reecho the feelings of the people is only a sovereign not a leader. When the voice of the people begins to assert itself a leader is one who is the mouthpiece of the prevailing ideas, who gives expression and attends to the development and realisation of those ideas.

The views entertained by the lecturer appeared to be very peculiar in that he asserted that he considered Shiwaji, Budh, Shankaracharya as a detail not approaching the definition of leader as c[illegible]ived by him. They were leaders [illegible]icular portion of the In[illegible]. The lecturer considered tha[illegible] an who deserves the name of a leader should be a representative & a practical embodiment of a sentiment which finds a place in the breasts of all Indian people generally from the Himalayas to Cape Comorin. It is difficult to understand how the goal is to be reached, how a man is to be found to represent the feelings of different races that inhabit India, each assuming a peculiar characteristic by its language, its manners and customs, its religion, its intelligence, and its moral and military spirit. We can well understand that the conception of a leader of the kind suggested by the hero of the day, assumes that there is such a Universal concord of opinion on some national want, grievance, or aspiration thriving in the minds of the people. In the times in which Shiwaji lived India was not the India of today. There was not much security of person & property. The country was torn asunder by factions, by wars by the strong against the weak. Communications were very deficient. Every town or village had to seek protection not in the stability of government but in the ramparts erected around it to provide against foreign attack. There was no knowing when the wave of conquering, predatory soldiers under the command of chieften would come in and dictate hunger and starvation to the population. There was little knowledge in the south of what was going on in the north. India was like a continent divided into various nations each domineered by its own ruler. A Hindu Prince reigned over the Mahomedan population and a Mahomedan prince reigned over the Hindus. If any adventurous young man could command the sympathies and respects of a warlike tribe it was not very difficult for him to establish a principality of his own. The sovereign who was considered to have sway had to give almost illimitable authority to the officers entrusted with the charge of the districts. How is it possible to conceive that Universal sentiment prevailed amidst such a heterogeneous population? How ridiculous would it be to look upon India of the days of Shiwaji or formerly of the days of Akbar or Baber with the spectacles of our own days. Religion helped political emancipation and political emancipation helped religion in return. Unless Shiwaji had been actuated by patriotic motives, if he had not conceived a contemptuous hatred of the Moslems, if he had not pitied the miserable condition in which Hindus were rotting under the religious *propagandas* of the rulers, if he had not perceived that Mahomedan religion was being fastened upon them against their will, if he had not been convinced that if the state of things was not remedied Hindus would be blotted out of existence he would scarcely have raised his hand to save the religion of Rishis, to liberate the population from the depth of misery in which it was sunk. It would therefore, be an abuse of language to call Shiwaji a minor leader. The lecture professed to be imaginative and we can, therefore, scarcely pardon him for the unimaginative conception of a leader he preached. Would he allow us to extend the boundaries which he has marked out and within which he has no objection to greet the expositor of a general sentiment with the title of a leader? Why, we ask, should he so circumscribe the boundaries? Why is he not prepared to say that the sentiment should prevail throughout the length and breadth of Asia? Would it not be more dignified to lead the population of Asia than the population of India alone? A reasoning based on such a principle will land us no where. Even the lecturer would himself see the absurdity of the dictum he laid down. Properly speaking the definition of place must be extracted from the conception of a leader. You have leaders in villages, leaders in towns, and leaders in countries. The difference lies only in the renown. A village leader has no significance beyond the village. A town leader has no significance beyond the town itself. A leader of a country has no significance beyond the country consisting of the towns and villages which go to make it up. Each is known in the surrounding territories according to his deserts. Each may be equal to the other or unequal. The capacity for leadership is not wanting. The extent of the country over which the authority prevails makes a difference in its importance. It will thus appear that the universality of the sentiment is an attribute which raises a leader into importance and the definition must be framed by excluding the element altogether from consideraton.

## वऱ्हाड.

गेल्या शनवारीं सायंकाळीं येथील नोटेब नजरल लायब्ररींत रा. रा. देव व विनायक वकील यांनीं 'हिंदुस्थान सारख्या देशांत प्रजेचे पितृवत् पालन करणाऱ्या राज्या पासून फायदे' या विषयावर व्याख्यान दिलें. विषयाच प्रतिपादन उत्कृष्ट व मुद्देसूत झालें. अखेरीस येथील माजी डिपुटीकामिशनर कर्नल फिट्झरल्ड साहेब हे आपले नवीन जागेवर यवतमाळास जाणार म्हणून त्याच्या कारकीर्दीचें थोडक्यांत त्यांनीं दिक्दर्शन केल्या नंतर कर्नल साहेबांनीं ब्रिटिश राज्या विषयीं हिंदुस्थानचे लोक खरे राजनिष्ठ आहेत वगैरे सांगून सर्वांचे आभार मानिले.

कर्नल फिट्झरल्ड साहेब हे शनवारीं पाहाटेच्या गाडीनें येथें येऊन त्याच दिवशी रात्रीचे गाडीनें यवतमाळास रवाना झाले.

रा. रा. कृष्णाजी दिनकर सब इंजिनियांची बदली वाशिमाहून उमरावती जिल्ह्यांत केल्याचें कळतें.

गेल्या अंकीं कळविल्या प्रमाणें किर्लोस्कर संगित नाटककार मंडळीनें येथें येऊन परवां रात्रीं 'संगीत सौभद्र' नाटकाचा प्रयोग करून दाखविला. प्रयोग एकंदरींत त्यांच्या किर्ती प्रमाणे चांगला झाला व तो प्रेक्षक समुदायास आवडला असें दिसतें. येते बुधवारीं 'संगीत शाकुंतल' नाटकाचे चार अंकाचा प्रयोग करून दाखविणार आहेत. या नाटका संबंधानें आम्हांस अभिप्राय देणें आहे तो आणखी एक दोन खेळ झाल्यानंतर प्रदर्शित करूं. प्रेक्षक मंडळीचा जमाव मोठा होता व बाहेरगांवचे ही लोक पुष्कळ आले होते.

बोरगांवचा माजी पेस्ट मास्तर निळकंठ हरी याजवरील फौजदारी खटल्याचा निकाल गेल्या आठवड्यांत होऊन १० महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा व ८० रु. दंड झाल्याचें समजतें.

### नोटीस.

चंद्रभान वल्लद एकाजी पाटील अढाऊ राहणार निजामपूर यांस खाली सही करणार यांज कडून नोटीस देण्यांत येते कीं, मौजे निजामपूर येथील शेत सर्वे नंबर २२ व कसबे अडगाव येथील शेत सर्वे नंबर २८२ चें रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापरडे चे मालकीचे सन १२९३ तागाइत सन १२९७ फसली पर्यंत पाच वर्षे स्वामित्वा बद्दल दरसाल रुपये १५० देण्याचें कबूल करून वहितीस केलें त्याबद्दल कबुलायत तुम्ही लिहून देऊन नोंदून दिले आहे. या प्रमाणें दोन सालें तुम्ही वाहित केलें मात्र त्याबद्दल आजपर्यंत तुमचे कडे रकम रुपये १६५ घेणें निघत आहे. हल्लीं सालीं तुम्ही शेताची मिरासगारी अद्याप केली नाहीं. व शेत तुम्ही कबुलायती प्रमाणें नांगरलें नाहीं. आणि पेरणीचे दिवस तर नजीक येऊन पोंहचले. म्हणून नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, तुम्ही नोटीस पावल्या पासून चार दिवसाचे आंत शेत नांगरून साफ करून पेरणी करून द्यावी. आणि आमचा पांच सालें पुरी करून द्यावी याप्रमाणें केलें नाहीं तर शेतीचे नुकसानी बद्दल तुमचे वर या नोटिशीचे खर्चा सुद्धां दिवाणींत फिर्याद केली जाईल. जर तुम्हास शेती वहित करणें नसल्यास शेत नांगरून राहिलेल्या सालाचे हक्क सोडण्या बद्दल अकोट येथें येऊन फारकत लिहून द्यावी आणि आमचे दोन सालापैकी तुमचे कडे घेणें राहिलेले रुपये द्यावेत. याप्रमाणें केलें नाहीं तर पुढें तुमची कांहीं एक तक्रार न ऐकतां दरसालचे स्वामित्वा बद्दल व मागील घेणें बद्दल व शेताचे नुकसानी बद्दल अशी एकंदर दाम भरून घेतले जातील. तारीख ६ माहे जून सन १८८५ इसवी.

सही.

मारुती गणेश असलकार

वहीवाटदार वासुदेव गणेश असलकार दस्तुर खुद.

### नोटीस.

१ गजरी मर्द फुलाजी मानकर राहणार कवट बुद्रुक तालुके अकोट. व २ बहिराम वल्लद भवाजी कृष्णपक्षी व ३ नारायण वल्लद मारुती ढोले, व ४ गजाजी कुणबी, ५ रामाजी सुनुने कुणबी, ६ कचऱ्या माहाली राहणार मौजे मजकूर यांस खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही आमचीं शेतें मौजे विटाळी येथील शेत सर्वे नंबर ३८–३१–१२–१३ चे चार निम्मे बटाईनें सन १२९३ तागाईत सन ११९७ पावेतों ५ वर्षे वहितीस करून त्या बद्दल बटई खत लिहून दिलें त्या प्रमाणें दोन सालें वर्तणूक करून शेती वाहिली. हल्लीं साल तिसरें आहे. अद्याप पर्यंत तुम्ही शेतांतील कुंदा, काडी, हरळी, काढून नांगरून साफ केली नाहीं. व पेरणीचे दिवस तर नजीक येऊन पोंहोचले म्हणून नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं तुम्ही नोटीस पावल्या दिवसांपासून ४ दिवसाचे आंत, शेत नांगरून, पेरणी करून आमची सालें पुरी करून द्यावी जर तुम्हास शेती वहितीस करणें कबूल नसल्यास अकोट येथें तीन सालची मुदत, व आज पर्यंत तुमचे कडे घेणें असलेले रुपये १७ ८८ ८९ पै भरून देऊन राहिलेले सालचे हक्क सोडल्या बद्दल लेख करून द्यावा. जर या प्रमाणें केलें नाहीं तर तुमचे वर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून शेतीची नुकसानी या नोटिसीचे खर्चा सुद्धां भरून घेतली जाईल. तारीख ६ माहे जून सन १८८५ इसवी.

सही.

१ मारुती गणेश असलकार

२ वहिवाटदार वासुदेव गणेश असलकार

दस्तुर खुद्द

वर्तमानपत्र ... वस्तु ... कसें वागावें,

दापोली येथें एका भंग्याचे मुलीस पाद्री साहेबानीं अडकवून ठेविलें आहे, अशाबद्दल पोलिसांत फिर्याद झाल्यामुळें पोलिसांनीं वारंट काढून मुलीचा तपास केला म्हणून वगैरे कारणावरून दापोलीचे चीफ कान्स्टेबलास रत्नागिरी येथें बलावून आणिलें आहे धर्म संबंधी कामांत अशी ढवळाढवळ होणें चांगलें नाहीं.

एकवचनी दुकान—नाशीक येथील पेनशनर रा. सा. बळवंत रावजी पेणसे व दुसरे कांहीं गृहस्थ असे मिळून येथें एक कापड वगैरे माल विकण्याचे एकवचनी व सचोटीचे दुकान स्थापन करणार आहेत. ह्या दुकानांत माल आणण्याचा खर्च व शिवाय प्रत्येक रुपयास ०१ आणा याप्रमाणें नफा घेऊन माल विकणार आहेत. वर लिहिलेलें दुकान स्थापन करण्याचे कारण व्यापारी लोक पुष्कळ नफा घेऊन शिवाय त्यांच्यांत खरेपणा फारच कमी असतो ही उणीव नाहींशी व्हावी वगैरे कारणाकरितां येथें वर लिहिलेले दुकान स्थापन होत आहे वर लिहिलेले प्रकारचे दुकानाची येथें फारच अवश्यकता आहे असें आह्मास वाटतें.

जे इंग्रज इंजनेर हीरातेस गेले ते हीरातची तटबंदी करण्याकरितां अगर तटबंदी करण्याच्या कामांत अफगाणलोकांस मदत करण्याकरतां गेले नसून तटबंदी कोणत्या ठिकाणीं कशी व किती खराब झाली आहे हें अफगाणलोकास समजून सांगण्याकरतां गेले आहेत. हीरातकिल्याच्या दुरुस्तीचे नकाशे वगैरे मागेंच रवाना करण्यांत आले असून त्याप्रमाणें अजून कांहीं दुरस्ती झालेली नाहीं व त्या नकाशांची वगैरे अफगाणलोकांची समजूत न झाल्यामुळें तसें झालें असावें. नकाशे पाठवून जी अफगानलोकांची समजूत व्हावयाची त्यापेक्षां इंग्रजइंजनेरांनीं समक्ष सांगण्याने जास्त समजणार आहे. तेथें जी व्यवस्था करावयाची त्यांत मुख्य त्या शहराचा बचाव करतां येईल अशी एका मोर्चावर तोफा सज्ज करून ठेवणे हें मुख्य आहे.

हीरात ही हिंदुस्थानची किल्ली आहे असें ह्मणण्या पेक्षां हिंदुस्थानचें एक नाकें आहे असें म्हणणें चांगलें. हीरात शहर घेण्याचा रशियाचा मुख्य इरादा नसून हीरातप्रांत घेण्याचा आहे, व तो प्रदेशच काय तो महत्वाचा आहे. ह्या प्रदेशांतूनच हिंदुस्थानांत जाण्याची वाट असून पूर्वीं टर्कोमन लोकांनीं ज्या हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या त्या ह्याच वाटेनें केलेल्या आहेत. तो प्रदेश एकदा रशियाच्या हस्तगत झाला म्हणजे तो इतर प्रदेशाची फारशी पर्वा बाळगणार नाहीं. या प्रदेशाचें संरक्षण करण्यास १,५०,००० फौज पाहिजे असें मे. सांडर्स यांणी आपल्या १८५८सालच्या रपोर्टांत लिहिलें आहे.

एक चिनी पत्रकर्ता ही पुढील गमतीची गोष्ट सांगतो. तिकडच्या समुद्रांत अस-
मा॰ णाऱ्या रशियन आरमारावर सक्त नजर
म्स आरिवण्याकरितां इंग्रज आरमार ठेवलेलें अस·
माहिती मिळे प्रसिद्ध आहेच, त्या प्रमाणें एका
(S लवताच्या चलनवलनावर नजर Secret
Government'न गलबत नेमलेले असतां तें रशियन गलबत इंग्रज गलबताची थट्टा करण्यास प्रवर्तक झालें न भलत्याच दिशेस चाल करून जाऊं लागलें तेव्हां तें इंग्रजगलबतही थांबलें. रशियन गलबत माघारें फिरलें, इंग्रजगलबतही फिरलें. रशियन गलबत पुन्हां दुसऱ्या दिशेसे निघालें इंग्रज गलबतही निघालें, रशियन थांबलें, इंग्रजही थांबलें. रशियन नांगर टाकून स्वस्थ बसलें तेव्हां इंग्रज गलबतानें रशियन खलाशांस जेवणास येण्याचा बावटा दाखविला व तें आमंत्रण रशियन गलबतानें नाकारलें आणि शेवटीं हें आपल्या पाहाऱ्याबाच आहे अशी रशियन गलबतानें आपली खात्री करून घेतली.

विलायतेस असलेले हिंदुस्थानचे कित्येक नेटिव आफिसर मागच्या महिन्यांत पार्लमेन्टच्या कामन सभेंत गेले होते व त्यांचे पुढारी पंजाबचे सरदार ठाकूरसिंग हे असून त्यास मि. कास यांनीं सभेंतील लोकांस भेटविलें असे सांगतात. हेतु काय?

गव्हरनरजनरल यांचे दरबारांत संभाषण चाललें असतां प्रश्न असा निघाला कीं, हिंदुस्थानांत शिरण्याचा मार्ग कोठें आहे. त्याचा जबाब लार्ड डफरीन यांनीं असा दिला कीं 'तो दरवाजा हिरात, पेंजदें, झुलफिकार अगर इतर ठिकाणीं कोठेंही नाहीं. परंतु तो इंग्लंडचे मुख्य प्रधानांचे खिशांत आहे.'

ता. २२ रोजीं तरुण निझामांनीं उतकामंत येथें एक दरबार करून एक किताब घेतला व त्यावेळीं त्यांणी एक उडदूत चांगलें व्याख्यानही दिलें. निझाम यांणी हा नवा 'किताब हिंदुस्थान सरकारच्या परवानगीनें काढला असून त्याचा अर्थ "मोठेपणा ईश्वराकरतांच आहे" असा आहे. यावेळीं निझामसरकारचे रिवीनिव्यु व हिशोबीप्रधान नबाब मुनीर उल्मुल्क यांणीही एक मोठें व्याख्यान देऊन, तरुण नबाब हे सुमारें एक वर्षापूर्वीं कारभार पाहूं लागले असून तेव्हांपासून त्यांणी आपली राज्यव्यवस्था सुधारण्याचे बहुत उपाय केले वगैरे प्रकार सांगितला.

दिल्लीच्या एका वर्तमानपत्राचें रशियावर शिव्यांचा केवळ वर्षावच केला आहे! त्या शिव्या इंग्रजीवर्णानुक्रमानें रचलेल्या आहेत! ! त्याचा मासला.—रशियन गाढव मृतपिंडबुद्धी, शुंभ, भाडाणी, ठोणपे' दगड, धर्मलंड, अक्कलमंद, मूर्ख, अज्ञानी, डबड्येबेडगळ, दांभिक, फुकटडौली, हराम, लुबऱ्ये, लुच्चे, बावळट, सडके, सुस्त, खुळकत पायपोसखावू, बढाईखोर, नीच, सोरट किंवा इमामदांडगे, नेभळ्ये, अट्टल, सोदे, गिधाड्ये, खुनशी, उगीच ओरड करणारे, नंदीबैल, विदुषक, वगैरे. भ० द०

कलकत्याला प्रवेश परीक्षेला दोघी मायलेकी आल्या आहेत. दोन्ही बाल्या आहेत. हा प्रभाव कोणाचा? झनाना मिशनचा.

छापण्याची कमाल— एका फ्रेंच बाईनें एक पुस्तक रचिलें आहे. तें फार नामी होतें म्हणून इंग्रजींत भषांतर करून आजपर्यंत जगांत कोणी इतक्या त्वरेनें छापलें नाहीं तितक्या त्वरेनें छापावें असें एका न्युयार्कच्या छापखानेवाल्यानें मनांत आणलें याबद्दल त्यानें ५९भाषांतरकार बोलाविले! ते एक वाजतां बसले तो रात्रीं ११ वाजतां भाषांतर पुरें करून मालकापाशीं त्यांनीं दिलें. दुसरें दिवशीं दुपारीं ३५० पानांचें पुस्तक छापून विकायास आलें! सगळेंच अघटित.

काळ्या समुद्राचे किनाऱ्यावर ओडिसा व जीं दुसरीं व्यापाराचीं रशियाचीं बंदरें आहेत तेथील इंग्लिश व्यापारी लोक आपले हिशेब पुरे करून येण्या देण्याचा निकाल करून स्वदेशीं परत जाण्याच्या तयारींत आहेत असें कळतें. हें एक रशिया व इंग्लंड यांत सल्ला न होण्याचें चिन्ह होय. ने.

## जाहिरात.

मक्का येथें यात्रेस जाऊं इच्छिणारे लोकांस असें सुचविण्यांत येतें कीं, जद्दा येथें जाऊं देण्यापूर्वीं त्यांना कारंटाईन [रोग आहे किंवा नाहीं हें पहाण्याकरितां] करितां तुर्की सरकार कॉमरन बेटांत निदान दहा दिवस पर्यंत अडकावून ठेवतील. कॉमरन बेटांत जो पर्यंत रहावें लागेल तोंपर्यंत आपले खर्चाची व्यवस्था यात्रेकरूं लोकांस करावी लागेल. कॉमरन बेटांत जो अडथळा येईल ते दिवस वजा जाऊन जद्दा येथें हज करितां वेळेवर जाऊन पोहोंचणें होईल अशा बेतानें निघणारे गलबतांत बसण्याची यात्रेकरूं लोकांनीं आपली खात्री करून घेतली पाहिजे. कॉमरन-बेटांत कारंटाईन करितां यात्रेकरूं जितके दिवस राहतील तितके दिवस त्यांना आपली खाण्यापिण्याची व्यवस्था करावी लागेल आणि या शिवाय तुर्की सरकार त्यांजकडून कांहीं फी घेतील; आणि जीं गलबतें कारंटाईन टाळून जातील त्यांतील यात्रेकरू लोकांस जद्दा येथें उतरूं दिलें जाणार नाहीं.

याजकरितां यात्रेकरू लोकांस अशी सूचना करण्यांत येत आहे कीं, कारंटाईन हज आणि परत हिंदुस्थानांत येण्याइतके पैसे आपले जवळ आहेत किंवा नाहींत हें त्यांनीं यात्रेस निघण्यापूर्वींच पाहिलें पाहिजे. जद्दा येथील मुसलमानी व्हाईस कौन्सल अब्दुर रज्जाक यांनीं असें सुचविलें आहे कीं जद्दा येथें जाण्यास गलबताचा जो खर्च लागतो तो देऊन आणखी प्रत्येक यात्रेकरू जवळ हिंदुस्थानांतून निघते वेळेस निदान तीनशे रुपये तरी असले पाहिजेत. जद्दा येथें इंग्रज सरकारचे अंमलदारांकडून पैशाची मदत मिळणार नाहीं.

ज्यांना यात्रेस जाणें असेल त्यांनीं जहाजांत बसण्याची योग्य तारीख कोणती आहे याजविषयीं मुंबई प्रोटेक्टर ऑफ दि पिलग्रिम्स आणि इतर बंदरचे अंमलदारांपासून माहिती मिळवावी.

(Signed) A. mackenzie.
Seeretary to the
Government of India.

## नोटीस.

नोटीस बेशमी देवाजी वल्लद विटेबा आडनांव आले जात कुणबी राहणार मौजे शेंदरी इरोबाची परगणे दारव्हे तालुके मजकूर जिल्हा वणी यांस खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुम्ही माझे लग्नाचे नवरे आहांत तुमचा माझा विवाह जगरूढी प्रमाणें होऊन सुमारें १० वर्षें झालीं व आम्हांकडे मी शहाणी होऊन ही ७वर्षें झाली. परंतु परत एवढ्या दिवसांत तुम्ही मजला मुळींच नेलें नाहीं व मी हल्लीं मौजे मांगूळ येथें आपल्या बहीण जावाई यांचे घरीं राहात आहे व एवढ्या काळांत मी लोकांचें कर्ज दरसाल रु. ६०प्रमाणें रु. ४२०सावकाराचे खाल्ले आहेत. व सदर्हू रुपये ज्याचे घेतले आहे त्याची मजला रुपये मागण्याची फार तसती आहे, याजकरितां तुम्हास कळवितें कीं सदर्हू रुपये ४२०व्याज सुद्धां ज्याचे त्यास देण्या करितां मजकडेस घेऊन यावें व मजला चांगल्या रितीनें वागविण्याबद्दल योग्य जामीन असें तुम्हांस ही नोटिस पावल्यापासून ८ आठ दिवसांचे आंत येऊन मजला घेऊन जावें मी तुम्हापाशीं राहण्यास कबूल आहे. असें तुम्ही न केल्यास सदरील सावकाराच्या रुपया करितां व मी आपले प्रपंचा करिता नोटीशीची मुदत पुरी होतांच मी दुसरा नवरा करून त्याज बरोबर मी आपला प्रपंच करणार मग तुमचा नवरेपणाचा हक्क मजवर राहणार नाहीं. मजपाशीं तुमचे दागीने वगैरे कांहीं एक नाहींत- ही नोटीस लिहून दिली सही तारीख ३१माहे मे सन १८८५ इसवी. दस्तुर बाळकृष्ण मोरेश्वर परांजपे राहणार यवतमाळ.

सहीची निशाणी लक्ष्मी
मर्द देवाजी आले राहणार
मौजे मांगूळ परगणें नेरपर-
सोपंत ता.दारव्हे जिल्हा व-
णी इचे हातची वांगडी
खुद्द असे.

## नोटीस.

रा. रा. रंभाजी वल्लद पुंनाजी माळी राहणार मोरगांव बाघाचे तालुके बाळापूर जिल्हा आकोले यांस खालीं सही करणार जानजी वल्लद उकर्डा माळी राहणार पारसी याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझी मुलगी तुळशी इचे लग्न तुम्हा बरोबर करून देऊन आज सुमारें १२ वर्षें झालीं. तीन वर्षे तुम्ही माझे मुलीस बिलकुल नांदवित नाहीं. तुम्ही रागानें पोरीस माहेरी घालवून दिली. नंतर आम्ही चार संभावित लोक जातीनें जाऊन तुमचें घरीं तिला सोडली. व तुम्ही तिला बरेंच दिवस ठेऊन घेऊन माहेरी परत केली. त्यास ४ वर्षें झालीं, तुम्ही बायकोस नेत नाहीं याबद्दल बहुत वेळां तुम्हास जातीवाल्यानीं वगैरे समक्ष सांगितलें परंतु पण तुम्ही ऐकत नाहीं. यामुळें कळवितों कीं नोटीस पावल्यापासून १५ दिवसांत सदरील ३ वर्षांची पोटगी वगैरे खर्च रुपये १५० हो देऊन मुलीस घेऊन जावें. असें न होईल तर रुपया बद्दल तुमचे वर कोर्टांत काम चालवून नोटीशीच्या खर्चासुद्धां निकाल होईपर्यंत जे नुकसान होईल तें भरून घेऊं व मुलीस सोडचिठ्ठी द्यावी. न दिल्यास ही सोडचिठ्ठी समजून दुसरा घरठांव केला जाईल मग कोणत्याही प्रकारचें बोलणें राहिलें नाहीं. नोटीस लिहून दिली सही.ता० ३माहे जून १८८५इ.

सहीची निशाणी जानजी
वल्लद उकर्डा माळी
याची असे.

☞ हें पत्र आकोला येथें कै.वा. खंडेराव बाळाजी यांचे 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही ,, ३ ,, ,, ८८
साल अखेर ,, ७ ,, ,, १८८
किरकोळ अंकांस....................८४

er annum in arrears 7 ,, 18as
Six monthly.......... 3 ,, 8 as
single copy.................. 4 as

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ०।०।
दुसरे खेपेस .........०१

Advertisements
Below 10 lines......2Rs
Per line over 10......4as
Repetition per line...3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

VOL XIX AKOLA MONDAY JUNE 15 1885 NO 23

पुस्तक १९ अकोला सोमवार तारीख १५ माहे जून सन १८८५ इ० अंक २३

## पक्षकार लोकांस उपयोगी माहिती.

रा० रा० रामचंद्र दाजी नगरकर बी.ए एल. एल. बी. मुंबई हायकोर्टाचे वकील, हे सध्यां वऱ्हाडांत आले आहेत. हे मोठ्या घराण्यांतील असुन हुषार, व अनुभवशीर आहेत. यांचे हापीस वऱ्हाडसमाचार छापखान्याशेनारी काळे मारुती जवळ आहे वऱ्हाडांतील लोकांनीं इकडे अवश्य लक्ष पुरवें अशी आमची त्यांस सूचना आहे.

तारीख ९ माहे दिसेंबर सन १८८४ } पत्रकर्ते

## जाहिरात

मक्का येथें यात्रेस जाऊं इच्छिणारे लोकांस असें सुचविण्यांत येतें कीं, जड्डा येथें जाऊं देण्यापूर्वी त्यांना कारंटाईन [रोग आहे किंवा नाहीं हें पहाण्याकरितां] कारितां तुर्की सरकार कॉमरन बेटांत निदान दहा दिवस पर्यंत अडकावून ठेवतील. कॉमरन बेटांत जो पर्यंत रहावें लागेल तोंपर्यंत आपले खर्चाची व्यवस्था यात्रेकरूं लोकांस करावी लागेल. कॉमरन बेटांत नो अडथळा येईल ते दिवस वजा जाऊन जड्डा येथें हज करितां वेळेवर जाऊन पोहोंचणें होईल अशा बेतानें निघणारे गलबतांत बसण्याची यात्रेकरूं लोकांनीं आपली खात्री करून घेतली पाहिजे. कॉमरन-बेटांत कारंटाईन करितां यात्रेकरूं जितके दिवस राहतील तितके दिवस त्यांना आपलो खाण्यापिण्याची व्यवस्था करावी लागेल आणि या शिवाय तुर्की सरकार त्यांजकडून कांहीं फी घेतील. आणि जीं गलबतें कारंटाईन टाळून जातील त्यांतील यात्रेकरू लोकांस जड्डा येथें उतरूं दिलें जाणार नाहीं.

याजकारितां यात्रेकरू लोकांस अशी सूचना करण्यांत येत आहे कीं, कारंटाईन हज आणि परत हिंदुस्थानांत येण्यापुरते पैसे आपले जवळ आहेत किंवा नाहींत हें त्यांनीं यात्रेस निघण्यापूर्वींच पाहिलें पाहिजे. जड्डा येथील मुसलमानी व्हाईस कौन्सल अब्दुर रज्जाक यांनीं असें सुचविलें आहे कीं जड्डा येथें जा .ते गलबताचा जो खर्च लागतो तो देऊन आणखी प्रत्येक यात्रेकरू जवळ हिंदुस्थानांतून निघते वेळेस निदान तीनशे रुपये तरी असले पाहिजेत. जड्डा येथें इंग्रज सरकारचे अंमलदारांकडून पैशाची मदत मिळणार नाहीं.

ज्यांना यात्रेस जाणें असेल त्यांनीं जहाजांत बसण्याची योग्य तारीख कोणती आहे याजविषयीं मुंबई प्रोटेक्टर ऑफ दि पिलग्रिम्स आणि इतर बंदरचे अंमलदारापासून माहिती मिळवावी.

(Signed) A. mackenzie.
Secretary to the
Government of India.

## FOR SALE

The Bay Aral gelding Amir the property of Government. Age 6 off.

Height 14 hands and half an inch. Quiet to ride believed sound. Will be sold by auction with a reserve price of Rs 200 at the Akola Bazar on the 5th July.

(signed) R. D. Hare
Assistant Commissioner
Khamgaon

## WANTED

An English and Marathi copyist possessing some knowledge of precis writing- Salary Rs.30 per month, for a period of six months.

Apply to Deputy Commissioner Wun District.

## पाहिजे

जिल्ह्यातील इनाम रजिष्टर तयार करण्या कारितां मराठी व इंग्रेजी जाणणारा व विपर्यांतर न करितां त्याचें तात्पर्य काढून लिहिणारा क्लार्क सहा महिन्या करितां पाहिजे. पगार दरमहा रुपये ३० तीस प्रमाणें मिळेल.

मेहरबान डेप्युटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हे वणी यांजकडे अर्ज पाठवावा

(signed)
A. Elliott
Deputy Commissioner
Woon District.

## खेड्यांतील शिक्षकानें लोकप्रेम कसें संपादावें?

( लिहून आलेला मजकूर )

सर्व सरकारी नोकरांपेक्षां शाळा खात्यांतील नोकरांची व विशेषत: खेड्या पाड्यांतलि शिक्षकांची स्थिति अतिशय नाजूक असते. कां कीं इतर खात्यांतील अगदीं साधारण कारकून म्हटला तरी त्याच्या हातीं दुसऱ्याचें थोडें बहुत बरें वाईट करण्याचा अधिकार असतोच. उदाहरणार्थ तहशिल कचेरींतील एखादा जागले कारकून काघ्याना; त्याच्या हातीं कोणाची बाहली बरतर्फी नसते किंवा दंड करण्याचा ही अधिकार नसतो. तथापि दहा पंधरा रुपये पगारांत तो ६-७ मनुष्यांचा निर्वाह चैनीनें करून मुलांचीं लग्नादिकार्यें, दागदागिनें, कपडेलत्ते इत्यादि गोष्टीकडे त्यास बराच पैसा खर्च करितां येतो. सवड साधल्यास ज्या गांवांत तो नोकरी करितो, तेथें तो स्वत:चे घर देखील करितो; इतकें करून त्यास एक कवडी देखील कोणाचें कर्ज नसतें !! आतां दरमहा १०।१२ रुपयांत इतक्या गोष्टी कशा करितां येतील हें समजत नाहीं. जागले लोकांस दरमहा ४।५।६ रुपये असे पगार असतात व त्यांच्या कुटुंबांत निदान ३।४ तरी मनुष्यें असतात; तेही सुखानें निर्वाह करितात. मुनसफ कचेरींतले नकलनवीस, तहाशिलींतलि पोतदार, पोलीस खात्यांतील शिपाई व रायटर वगैरे यांस ६ पासून १९ चे आंत पगार असतात. यां पैकीं एकाचेही हातीं रयतेचें बरें वाईट करण्याचा अधिकार प्रत्यक्ष रीतीनें नसतो, तथापि यांस नोकरीवर आहेत तों पर्यंत कधीं कोणत्या ही गोष्टीची वाण न पडतां रयत लोकांत ते नेहमीं मान्य असतात असा पुष्कळांचा अनुभव आहे. या वरून इतकें सिद्ध होतें कीं यांचे हातीं प्रत्यक्ष नव्हे तरी अप्रत्यक्ष रीतीनें दुसऱ्यांचें बरें वाईट करण्याचा अधिकार थोड्याहून थोड्या मानानें तरी असतोच. एरवीं केवळ एकादा मनुष्य भला आहे म्हणून त्याला एखादा पाटलानें सर्पणाची एखादी गाडी किंवा पत्रावळी करितां पानें किंवा भाजीपाला फुकट नेऊन दिला आहे असें कधीं ही घडत नाहीं. स्कूल मास्तराचे हातीं मुलांस विद्या शिकविण्यावांचून दुसरें कांहींच काम नसतें व इकडील प्रांतांत खेड्या पाड्यांतून विद्येविषयीं तादृश् अभिरुचि नसल्यामुळें स्कूलमास्तर सर्वांशीं वटीक बनलेला असतो. खेड्यांतील स्कूल मास्तरांची स्थिति अत्यंत शोचनीय असते.

खेड्यामध्यें बहुत करून एक कारभारी पाटील व दुसरे त्याचे भाईबंद नामधारी पाटील असे असतात. त्यांचा आपसांत बेबनाव नाहीं असें शेंकडा एक देखील उदाहरण मिळणें कठीण. कारभारी पाटील बहुधा गरीब असतो, परंतु जागले, महार, एकादा सावकार आणि कित्येक सुखवस्तु लोक अशी मंडळी त्यास अनकूळ असते. नामधारी पाटील बहुधा सुखी असतात व गांवांतील बहुतेक सुखवस्तु लोक त्याच्या असाम्या असतात. असे दोन पक्ष बहुतेक खेड्यापाड्यांतून आढळतात. जेथें भाईबंदी नसते तेथें बहुतकरून दुफळी ही नसते. परंतु अशीं गांवें आमच्या इकडील दायादविभागाच्या विलक्षण परिणामामुळें फारच थोडीं सांपडतात. असो; एकंदरीनें दुफळीच्या गांवीं स्कूल मास्तराचे जे हाल होतात, त्यांचें वर्णन करणें अशक्य! ! ! तो कोणत्या ही एका पक्षाकडील लोकांशीं मिसळून राहूं लागला, तर दुसऱ्या पक्षाचे लोक एकदम नाराज होऊन आपापलीं मुलें शाळेंतून काढून कदाचित् एखादी गांवठी शाळा देखील स्थापितात. कोणत्याही पक्षाशीं मिळून न राहतां साधारण सर्वांशीं सलूख राखून जरी तो वागला तरी त्याजवर कोणाचाच विश्वास न बसून त्याची शाळा बहुधा रडकी असावयाचीच. जेव्हां परिक्षक लोक त्याच्या गांवीं जातात. तेव्हां शाळेची वाईट स्थिति पाहून ते पाटलास किंवा दुसऱ्या एखाद्या जाड्या गृहस्थास (म्हणजे पाटलाच्या विरुद्ध पक्षकारास) विचारतात; काहो पाटील, तुमच्या येथलि मास्तर कसे काय आहेत? पाटील म्हणतात बेस हायत, त्यांहीस काय झालें! आपलं काम करतात, आखीन काय काय करतील? कांहो तर मग येथें इतकी लोक वसती असून शाळेंत इतकीं मुलें कमी कां? पाटलि म्हणतात; काय सांगावें! लेक आमचे लोकच येडे. त्यांसनीं किती सांगितलें तरी यर्थ; भले, लेक झोडपले पाहिजेत. आम्हांस डिपुटी साहेबांचा [ डि. कमिशनरचा) हुकूम द्या म्हणजे एका दिवसांत शंभर पोर आणून देतो बुवा. असें ऐकून घेऊन डेपुटी इन्स्पेक्टर मास्तराजवर चरफडून अमुक दिवसांत शाळा सुधारली नाहीं तर तुला कमी करीन अशी धास्ती घालून निघून जातात. परंतु त्या गांवच्या स्थितीच्या मानानें मास्तरानें कसें वागलें पाहिजे याजविषयीं त्याला कांहीं एक सांगत नाहींत, असें शेंकडों वेळां घडलें आहे.

एकंदरीनें आमच्या या शाळाखात्याची चोहोंकडून हेळनाच होते. जनांमध्यें या खात्या विषयीं कितपत पूज्य भाव आहे, हें पुढील हकीकतविरून समजेल. एकदां रावबहादूर नारायण भाई माजी डायरेक्टर यांची स्वारी दवऱ्यावर असतां, कित्येक खेड्यांतील पाटलांस अमुक अमुक गांवांतून साहेबांची स्वारी जाणार अशी वर्दी पोंचली हाती. म्हणून ते पाटील, जागले व महार यांस आपापल्या हद्दींतील साहेबांच्या रस्त्यावरील खांच खळगे भरून रस्ता साफ करू लागले. इतक्यांत त्याच रस्त्यानें साहेबांचे शिरस्तेदार गाडी उडवीत येत होते. त्यांस एका पाटलानें कोण साहेब येणार. म्हणून विचारलें. शिरस्तेदारांनीं शाळेचे साहेब म्हणून सांगतांच पाटील 'रस्ता आतां चांगला साफ' असें म्हणून सर्व लोकांनिशीं आपल्या गांवांत चालता झाला! ! ! खुद्द डायरेक्टर साहेबांची ही हकीकत, मग खेड्यांतील य:कश्चित् मास्तराची काय वाट! तात्पर्य काय कीं जरी अकोला, उमरावती इत्यादि शहरांतील शाळा बऱ्या असल्या तरी खेड्यापाड्यांतील लोक शाळेविषयीं अद्याप फार उदासीन आहेत; त्यामुळें तेथील शाळा चांगल्या स्थितींत नसतात'

आतां खेड्यांतले लोक पराकाष्ठेचे उदासीन आहेत म्हणून तेथलि शाळा सुधारण्याची आशाच सोडून दिली पाहिजे असा माझा लिहिण्याचा अभिप्राय कोणी समजूं नये. तसेंच मास्तर म्हणजे अगदीं निर्दोष असतात असें ही नाहीं. परंतु मास्तरचा पगार थोडा असतो, व त्या मानानेंच त्यांची विद्या ही अल्प, तशांत गांवचे लोक अर्धवट रानटी; अशा स्थितींत अधिकारी यांनीं थोडी मेहेरबानीची नजर ठेविली पाहिजे. वस्तुस्थिति जाणून चार गोड शद्बांनीं कसें वागावें,

कसें शिकवावें वगैरे विषयीं मास्तरास उपदेश केला पाहिजे. सर्वच अधिकारी असें कारितात, असें मी म्हणत नाहीं. परंतु कैकवेळां असे ही बोभाटे कानीं आले आहेत, कीं, इनस्पेक्टर लोक मास्तराचीं क्षुद्रें काय आहेत तेवढीं पाहून "शाळेंत मुलें फार कमी, हजेरी अगदींच वाईट, अभ्यास कोणताच बरावर नाहीं; असेंच पुढें नजरेस आलें तर शाळेची ग्रेड कमी केली जाईल" असा शेरा खरडून देतात, आणि चालते होतात. परंतु यापासून त्या मास्तरास काढीं इतका तरी बोध होईल काय!

शाळा सुधारण्याविषयीं तिच्या मास्तरानें तर श्रम केलेच पाहिजेत, व गांवांतिल एकंदर स्थितीच्या मानानें त्यानें आपल्या वर्तनांत ही फरक केला पाहिजे. ते श्रम कोणते व कसे व त्याचें वर्तन कसें असावें, त्यानें लोकप्रीति कशी संपादावी, या विषयीं मी यथानुक्रम लिहिणार आहेंच; परंतु मास्तराच्या श्रमाला दुसऱ्या एका गोष्टीचें वजन पाहिजे; तें कोणतें हें प्रथम सांगतों. हें सर्वांस विदित आहे कीं शाळाखात्याचे व इतर वडे कामगार शाळेंत जातात, तेव्हां पाटील पांड्ये, शेट सावकार, कुणबी माळी, महार, जागले ह्मणजे हे लोक शाळेचें मुखावलोकन सुद्धां कधीं करीत नाहींत, ते सर्व त्यांच्या बरोबर असतात. परीक्षा सुरू झाल्यावर जमलेल्या सर्व लोकां समोर परीक्षक शिक्षकाचे दोष बाहेर काढून त्याजवर रागावतात. असें झाल्यानें शिक्षकाचा अपमान होऊन सर्व लोकांचा त्याच्या ठिकाणीं भाव बसत नाहीं. लेंकरास बापानें मारिलें असता, तें रडत रडत आईजवळ जातें; तिनें त्याचें सांत्वन केलें ह्मणजे तें हुशार होऊन पुर्ववत् खेळूं लागतें; परंतु सांत्वन न करितां आईनें ही त्याला एकादी थप्पड मारिली, तर त्यानें कोणाकडे जावें? अशी स्थिती त्या खेड्यांतील मास्तराची होत असेल, यांत संशय नको. करितां शाळेंत जाणाऱ्या अमलदारास शिक्षकाचे दोष काढणें झाल्यास त्यांनीं एकांतीं त्यास बोलावून सांगावें. एकांतीं त्याचे कान धरून शिक्षा करण्यास ही हरकत नाहीं. परंतु लोकांसमक्ष मास्तराचे गुण मात्र सांगावें. अशानें मास्तराचा बोज राहून त्याला श्रम करण्यास उमेद येईल. नुसते कुतर्क करून मी हें लिहितों असें नाहीं; अशा गोष्टी वारंवार घडतात. एकदां एका डेप्युटी इन्स्पेक्टरानें अगदीं क्षुल्लक कारणांवरून एका शिक्षकास शाळेच्या बाहेर हांकून दिलें होतें. तसेंच एका डेपुटी कमिशनरानें पाटील वगैरे यांच्या समोर स्कूलमास्तरास उर्दू भाषेनें उपदेश केला कीं "तुम्ही लोक पोटाकरितां दूर देशांहून आलां असून असल्या खेड्यापाड्यांतून तुमचा निर्वाह चालतो. खेड्यांत म्हटलें म्हणजे पाटीलच काय तो मुख्य; तो म्हणेल त्या प्रमाणें सर्व गांव वागतो. आतां तुम्ही पाटीलाशीं मिळून न राहिलां तर तो एका क्षणांत तुमचें नुकसान करील. म्हणून त्यांच्या कह्यांत तुम्ही असावें हें चांगलें." अशा रीतीनें मास्तराची स्थिति काय होईल याचा वाढ्ल विचार करा.

वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ट शुद्ध ३ शके १८०७

# कला कौशल्य शिक्षण शाळा.

फार दिवसापासून आह्मांस असें वाटत आहे कीं, या प्रांतांत लिहिणें वाचणें हिशेब वगैरे शिकविण्या साठीं सार्वजनिक शाळा जशा स्थापिल्या आहेत तशा निरनिराळीं उपयुक्त कसबें शिकविण्याच्याही शाळा असण्याची फार जरूर आहे. या प्रांताच्या स्थितींत लोकांस जें शाळांत सामान्य शिक्षण मिळत आहे त्या पासून त्यांचा मोठा फायदा होत आहे व पुढें वाढत्या प्रमाणानें होणारा आहे. परंतु अशा ज्ञान प्राप्ती बरोबर देश ज्ञान संपन्न झाल्यावर त्याच्या वाढत्या ज्ञानाचा उपयोग व वाढत्या आवश्यकतांचें संपादन करण्याचीं साधनें यांकडेही दूरदृष्टि देऊन एव्हांपासूनच विचार करणें जरूर आहे. लोक जसे जसे ज्ञानसंपन्न होत जातील त्या त्या प्रमाणानें त्यांचे ज्ञानाचा योग्य उपयोग करण्यास जागा पाहिजे व योग्य फायदा या देशास झाला पाहिजे. हल्लीं आमचे प्रांतांतिल शाळा व शाळांत जाणारे लोकांची संख्या वाढत आहे. परदेशांतील लोकही येथें पूर्वीं पेक्षां जास्ती प्रमाणानें स्थाईक होत आहेत. तेव्हां जरी शाळांत आज असलेले सर्व विद्यार्थी विशेष शिकतील व विशेष विद्वान् होतील असें नाहीं तरी थोडा काळ लोटण्या पूर्वीं मध्यम प्रतीचे शिक्षित लोक पुष्कळ होतील यांत संशय नाहीं. पण हे सर्व काय उद्योग करणार? सरकारी नोकरी सर्वांस पुरण्या इतकी नाहीं. शेती ही बस होणार नाहीं. व त्यांचे हातून ती विशेष होणार नाहीं. व्यापार धंद्यांतही एवढ्या मंडळीचा खप होऊं शकणार नाहीं. द्विपांतरीं जाऊन आमच्या लोकांकडून नवीन वसाहाती करवणार नाहींत, व त्यांस इतर अनुकूलता नाहींत, सर्वांस कांहींना कांहींतरी ज्याचे त्याचे स्थितीस योग्य धंदे स्वदेशांतच मिळाले पाहिजे. इतर देशांच्या स्थितीकडे पाहून आह्मांस खात्रीनें वाटतें कीं, आमच्या या प्रांतांत अनेक प्रकारचे अनेक वस्तू करण्याचे कारखाने झाले पाहिजेत तर मात्र उत्तरोत्तर ज्ञानसंपन्न होणाऱ्या लोकांस विद्येचा उपयोग करण्याचे व निर्वाहाचे मार्ग निघतील. पण कारखाने चालू होण्यास प्रथम तशा प्रकारचें ज्ञान लोकांस झालें पाहिजे. आणि ज्या अर्थीं शिल्पज्ञान संपादण्यास आज मुळींच मार्ग नाहीं त्या अर्थीं तें ज्ञान करून घेण्यासाठीं शिल्पशाळा या प्रांतांत चालू झाल्या पाहिजेत.

ज्या अर्थीं हल्लींचे लोकांत सशास्त्र शिल्पज्ञान विशेष नाहीं त्या अर्थीं स्वतंत्र रीतीनें अशा प्रकारच्या त्यांजकडून शाळा स्थापित होण्याचा मुळींच संभव दिसत नाहीं. परंतु देशाच्या भावी कल्याणासाठीं शिल्पशास्त्राचें ज्ञान होण्याकारितां योग्य तजविजी होणें फार जरूर आहे. आह्मांस असें वाटतें कीं, लिहिणें वाचणें वगैरे लोकांस शिकविणें हें आपलें कर्तव्य आहे असें आमचें सरकार जर समजतें तर शिल्पशास्त्राचें लोकांस ज्ञान करून देणें हें कमी कर्तव्य आहे असें नाहीं. सरकारचे या कामास आरंभ करणें उचित व अवश्य आहे असें आम्ही समजतों. हें काम मोठ्या खर्चाचें आहे शिवाय सरकारास जसें याचें महत्त्व समजत आहे तसें लोकांस आज समजत नाहीं. सबब आम्ही सरकारास विनंती करतों कीं या विषयींसरकारानें चांगला विचार करून कला कौशल्य शिक्षणाच्या शाळा स्थापण्याची तजवीज लौकरच करावी.

या प्रांतांत शेतीचें महत्व मोठें आहे. म्हणजे निर्वाहाशिवाय अल्पस्वल्प सधन होण्यास काय तो मुख्य धंदा तूर्त शेतीचा आहे. तेव्हां शिल्पशाळांची स्थापना होणें ती या गोष्टीस अनुलक्षून व्हावी वस्तुतः सर्वच प्रकारचे कसबाची येथें न्यूनता आहे. तेव्हां कोणत्याही प्रकारचें कसब शिकविण्यास आरंभ केल्यास पाहिजेच आहे. कोणत्या तरी प्रकारानें या प्रांतीं सशास्त्र शिल्पकलेचा पाया पडल्यावर कोणत्या प्रकारचे कसबापासून विशेष फायदा होईल व कोणत्या कसबा कडे विशेष लक्ष दिलें पाहिजे याचा निर्णय साहजिक रीतीनें त्या गोष्टीस अनुरूप पुढें होईलच.

या प्रांतीं अनेक जिन्नस पिकतात. परंतु ते तयार झाल्यावर तशाच तसेंच विकण्याचें किंवा परदेशीं पाठविण्याची मात्र लोकांस माहीत आहे. त्याचे अनेक तऱ्हेचे दुसरे पदार्थ करतां येण्या जोगे आहेत. परंतु या देशीं कसब नसल्यामुळें ते पदार्थ करण्यापासून जो दुसरा नफा होण्याचा व ते पदार्थ बनविण्यांत कारागीर आणि मजूर यांचें निर्वाहाचीं जीं साधनें होण्याचीं त्यांस हा देश मुकतो. उदाहरणार्थ कापूस येथून परदेशास पाठविण्याचा व आळशी येथून पाठविण्याची. परदेशानें कापसाचें कापड करून व येथून नेलेले आळशींचें तेल काढून त्यावरतें लावून रोगणी कापड करून आम्हांस उलट विकण्याचें. अशीं सहस्त्र उदारणें देतां येतील. करितां जर या देशांत उत्पन्न होणारे पदार्थांपासून कसबानें होणाऱ्या सर्व वस्तू नकोत. पण त्यांतून कांहीं तरी आपले आपणांसच करतां आल्या आणि त्या स्वदेशास आणि परदेशास पुरविण्याचें आमचे अंगीं सामर्थ्य आलें तर दरम्यानचे फायदे आपले पदरीं पडतील व देशांतील कसबी लोकांचा उपजीविकेस साधनें झालीं असें होईल. हल्लींचे आमचे स्थितींत आपल्या देशास पुढें सरसावण्यास आमच्या बुद्धीनें या देशांत कलाकौशल्याचें ज्ञान व त्याचा प्रसार होणें हेंच एक मोठें साधन आहे व सरकार किंवा सधन लोक या कामास आरंभ करतील तो सुदिन होय.

---

पुसलेकर रा० परशुराम पाटील व आणखी चार असामीस वलगांवीं मारामारी केल्या बद्दल मिळालेले शिक्षे विरुद्ध त्यांणीं जुडिशल कमिशनर साहेब यांजकडे अपील केलें होतें तें पहिल्या सुनावणीसच रद्द झालें म्हणून समजतें. शिक्षा झालेले गृहस्थां बदल आम्ही दिलगीर आहों. परंतु न्याय झाला तो योग्य झाला असें म्हणणें जरूर आहे. आपला कोणी कसाही अपराध केला तरी कायद्याचेच मार्गानें न्याय मागितला पाहिजे हे लोकांस पक्केपणीं समजणें जरूर आहे. या प्रांतीं इंग्रजी अंमल होऊन बत्तीस वर्षें झालीं परंतु अद्यापि कांहीं जुन्या लोकांच्या जुन्या मोंगलाई समजुती बदलल्या नाहींत. त्या त्यांणीं सांप्रतच्या स्थितीस अनुसरून बदलण्याची जरूर आहे हें या उदाहारणावरून त्यांस समजेल तर त्यांचा फायदा होईल. ज्या अपराधा बद्दल वरील असामीस शिक्षा झालेली आहे तो अपराध शाबीद धरल्यावर जिल्हे माजिस्ट्रेट यांणीं दिलेले शिक्षे पेक्षां कमी देतां आली नसती. असें आह्मांस वाटतें. ही शिक्षा फार सौम्य मिळण्याचें कारण कीं रा. परशुराम पाटील व इतरांस अतिसंताप येण्याजोगें व त्रास अपकीर्ति मिळण्याजोगें कृत्य प्रतिपक्षी वलगांवकर रा० तुकाराम पाटील यांनीं केलें होतें हे होय. आरोपी तर्फे रा. रा. रंगनाथ नरसिंह मुधोळकर एल्. एल्. बी. हे मुख्य वकील होते व त्यांणीं फार उत्तम रीतीनें, दक्षतेनें व हुषारीनें ह्या मुकदम्याचें काम चालविलें व त्याजकडून करण्याची शिकस्त त्यांणीं केली असें समजतें. ही गोष्ट त्यांस भूषणास्पद होय. त्याचें कार्य त्यांणी बजाविल्यावर अपराधाचें स्वरूप व पुरावा तसेंच न्यायाधिशाची नजर यांस अनुसरून निकाल त्यांचे पक्षाविरुद्ध झाल्यास त्यांजकडे कांहीं एक कमीपणा येत नाहीं.

---

फरक—विलायतेस पिण्याचे दारूवर थोडा कर वाढवावा म्हणून पार्लमेंट सभेमध्यें सरकार तर्फे एक बिल सुरू होतें. तें पार्लमेंट सभेस नापसंत पडल्यामुळें ते त्या सभेनें अमान्य केलें व त्यांचा परिणाम हल्लींची मिनिस्ट्री म्हणजे राजमंत्री मंडळ या त्यांच्या अपजयास्तव कदाचित् आपल्या कामाचा राजीनामा देतील असें दिसतें. यावरून आपल्या व दुसऱ्याचे कार्यांत फरक येतो तो पहा. आवश्यक पदार्थांवर कर बसविण्याचा नाहीं हें इंग्रजी न्यायानें कराचे मुख्य तत्त्व आहे. दारू वस्तुतः आवश्यक पदार्थ नव्हे तरी दोन रुपये किंमतीचे दारूवर दोन आणे ज्यास्ती कर आपचे सरकारास स्वदेशीं बसवत नाहीं. परंतु हिंदुस्थानांत या न्यायास कधींच जागा मिळत नाहीं. भाकर, पाणी, वायू, जशी आवश्यक तसें आम्हांस मीठ आवश्यक आहे. पण जितक्या मिठाची मूळ किंमत दोन आणे तितक्यावर तीन रुपये म्हणजे मूळ किंमतीचे सुमारें जवळ जवळ पंचवीसपट कर सहज बसविण्यांत आमचे सरकारास तादृश शंका वाटत नाहीं. उघडच आहे कीं पार्लमेंट सभासदांस स्वतांचीं दारू बद-

ल्ची जी काळजी ती हिंदूच्या मिठाच्या ब-द्दऊ कोठून वाटणार?


# The Berar Samachar

MONDAY, June, 15, 1885


From the knowledge of history we can authoritatively assert that the civilization of a country depends much upon the more in which the Government of the country is administered. Impartial administration of justice, equitable collection of revenue, efficient maintenance of peace and order, gradual development of materiel, moral, and intellectual prosperity of à nation should be the chief objects towards which those who administer the affairs of the government should direct their energy. In order to attain this object the most important and necessary condition is that those who carry on the government should be men of superior intelligence, the highest practical sagacity. It is in this way that countries, and provinces, most backward in civilization have considerably advanced.

Berar is a province of highest fertility and abounding in natural resources, but most backward in civilization. Since the establishment of the British rule in this province, considerable progress has been made in the different branches of the administration. But the progress has been, to a great extent hampered by the in judicious administration of the province. The resident, who is the highest officer of the state, entrusted with the management of the Government, lives at a considerable distance from the province which he is called upon to govern. Consequently he is least expected to get himself acquainted with the peculiarities of the province, and the minor details of its administration. The disposition of the important posts in the jucicial, and revenue Departments is as a matter of course regulated merely by the whimsical and ill-Judged choice and patronage of the secretaries, under-secretaries, and clerks of the residency office.

Several appointments that have lately been made in the revenue and judicial branches of the administration, without the least consideration being paid to men of tried abilities & acknowledged worth demonstratively prove the truth of this statement.

So long as the responsible posts in the administration are not bestowed upon men whose minds are cultured by the university training, whose powers of understanding are sharpened by the study of law, and who take a sympathetic interest in the welfare of their countrymen, there is not the least prospect of any material improvement in the administration of the province. The vast improvement that has taken place in the Bombay Presidency is to be mainly attributed to the selection of educated men in the revenue, judicial and educational departments. Most of the places in the judicial line are filled by those, who have either passed the L.L. B. or munsiff's examination. Similarly those graduates, who have passed the lower and higher standard examinations are entitled to places of Mamlat and deputy collectorship. Thus this system of appointing educated men to responsible posts seems to have worked so wonderfully that even those who first raised serious opposition to the introduction of the system now admit its justice and wisdom.

## THE ENDOF LIFE.

( *communicated.* )

Or the goal for which we are where we are at *present* and to attain to which we ought to strive.

The above mentioned subject is one which although it deserves the most serious reflection of a human being, is scarcely ever thought upon. It is so comprehensive but at the same time eluding the most strenuous efforts of some of the greatest minds that have ornamented this world, it has such a supereminent importance, it has such a tremendous practical bearing upon the existence of the human race with which it is *in fact* so intimately connected, that it deserves the most mature deliberation that a mortal could afford to give. It has no doubt in all ages and in all times engaged the thoughts and severely tasked the minds of the great philosophers of the world but the mystic grandeur with which the subject is enveloped has repelled every attempt at its discovery and has led persons to form a series of conjectures which have only a speculative value, without any solid basis for them. To try to discuss such a subject, may simply appear presumptuous; but as it was for a long time my desire shortly to put on paper some of the various conflicting theories which I know about the subject, I take this opportunity of doing it. Indeed, I could not be so fond as to suppose that I could ever find out something final, as an answer to the querry which is the subject before us; but yet I have attempted as I said, at least to state some of the views with regard to it.

To a person of ordinary feelings and thoughts, the above question probably never occurs; to him the world is a thing which goes on and on, no one knows where, and he goes on as his fellows go on in life, treading a path to which he is led on by accident or by a silly freak of fancy. What others do and how others act is enough to guide him in his own works and actions; but to a thinking mind, to a mind liberalized by thoughts of men of past days to minds to whom new prospects are to open at their start in life, such a question I think must necessarily present itself. The facts that help to bring on such thoughts is not that calm and sober state of mind caused by abundance of every thing that one may covet to possess, not that absence of want which some people appear to be so lucky in having; not that contented and easy tenor in life in which they have been bred, but an active and restless state in which the thoughts are hankering after knowing things, which is perhaps caused by some check and disappointment in life which has disengaged the mind from other occupations and left it to its own resources to feed itself.

If we could just fancy ourselves in a position a little apart from the common herd of the world, we can observe such a variety of things around us which would very naturally suggest a question *why* they exist where they are. After occupying the mind for a lapse of time on the investigation of the question we come to a result which we may very aptly call the fruitless fruit of all our troubles. Indeed nothing puts us in such an awkward position, nothing puts so vividly before us the littleness and insignificance of our knowledge as the questions why do the stars shine in the heavens, why do oceans roll, why a variety of creatures live upon the Earth and why we ourselves are in the position where we are. The power of the mind is stopped; the craving yet remains and we are at a loss what to do. After such a state of mind we are forced to get up and do our usual way; but it is not without a feeling that we are wafted and driven by something we know not what, *to* something we know not what. The routine work of which every one has more or less, makes us forget all these things; but the things stand as they ever have been, unapproachable, undiscoverable and defying all attempt at unravelling them.

We see some people of vast ambitions, with definite projects and aims before them; some we see hankering after a name that the world would care to enrol in its long and ancient roll; some aiming at and trying to secure what they call the public weal; some of a different turn of mind we see engaged in their worldly affairs never caring for things beyond their own affairs; in short each and every person has a view of his own; has aims of his own and he tries to carry them out in his own way; but all these people, are as Professor Mac Dougal is reported to have said, ' more or less mad.' For what is the use to me of the glory of a name when my-self is no more; what is the use to me of all the approbation of my fellows which they would heap on me when dead? and what advantage do I derive by trying to attain such glory and such approbation? Why should I not rather retire to a solitary place, why should I not end my existence in wondering contemplation of the beauties which I actually feel when alive and die calmly as nameless a being as the village Hampden of Gray? Why should I possess great ambition and try to carry out projects and aims? May I not rather look upon the ambitions as a set of mad people, fighting for things that they know not tend to what direction. May I not rather sit contented within myself, retired and unseen desisting from all those squabbles which ambition creates for if we consider well, the advantages which we expect to derive from ambitious motives are purely notional. It is undoubtedly true that every one consciously or unconsciously pursues a path of ambition or otherwise; but the fact that one is practically obliged to decide the grand querry for himself some way or other does not decide what really is the way to solve it. I believe it was the preference given by the older Aryans to the psychical development or the development of the faculties and powers of the mind, that gave quite a philosophical turn to their actions; now-a-days almost every one of us is decrying tnat we are too philosophical; we lack ambition and Enterprise which goes in Ambition's train; we glorify our present state by pronouncing it to be more civilized and an advance upon our former condition; who knows which is the better of the two? It seems that the moderns being engaged in physical enjoyments and comforts consider everything that tends towards the accomplishment of those enjoyments and comforts as *the* thing we are to strive after and the goodness or badness of a thing is determined by the degree in which it helps to create those enjoyments and comforts; the ancients as it seems, gave greater importance to the development of the mind and its powers and thus strove after attaining what *they* considered to be their aim. It may thus be evident that Civilization or non Civilization, Improvement or non-Improvement must depend upon the view which people have in a particular age; and here we see the intimate connection of our querry with our actions and careers in life.

As we have said before there are people that suppose that we are under deep obligations to Society, that we have been immeasurably benefited by our predecessors in Society and that therefore we are bound to try our best to repay the general Society by serving it in some way: thus they make the public good as their end in life. The answer to all this is that we are not at all bound to pay back to Society the benefits we have got from it; and the reason is that those benefits, if any, have been conferred on us without our consent; in fact the benefits are really ills in as much as we are made conscious every now and then of pain and of pleasure which conciousness is the least desirable---a thorough oblivion in which there is no consciousness of either pleasure or pain being I think far more preferable .( Again after all, Society is a selfish organization an[illegible] [illegible]hat is *good* to some members may [illegible]actly what they call *Bad* to [illegible]ers.) If then we are bound to serv[illegible] at all, which of the two are we to serve and in whose favor are we to make a preference?

My own opinion of the matter is inclined towards letting each one have his own aims, as the real aim in life can be determined; but this is all *in life;* as I said above tha state in which there is no consciousness either of pain or of pleasure is far more preferrable, if such a one can be attained with certainty. Here then I end.

## वऱ्हाड.

मे. डेप्युटि कमिशनर सा. यांची स्वारी ता. १० चे सुमारास नरनाल्याहून येथें परत येणार.

दिवाणी कोर्ट ता. १५ पासून पुन्हा खुली होणार. मि. देवराव नैकण्ण हे पुन्हा आकोटास जातील व जळगांव दिवाणी कोर्टाचें काम पाहण्यास कमिशनर साहेबांचे क्लार्क मि. केशवराव नैकण्ण देशपांडे यास तूर्त अ०ए० अ० क ० नेमल्याचें समजतें

आमनेर परगणे व तालुके मेळघाट पैकीं अलीसरदे मुकामाहून दोन कोसावर टकेसावली देव म्हणून येक खेडें आहे. आठिकाणच्या पाटलापाशीं ता. १ जून रोजी टंड्या भिलानें कांहीं खाण्याचे पदार्थ मागितले असून ते दिले नाहींत म्हणून, पाटलास व तेथील वाण्यास धरून नेलें त्यांचा पत्ता अद्याप पावेतों लागला नाहीं. तपास करितां जिल्ह्याचे पो.सु. मि. काटग्रेव साहेब हे गेले आहेत.

आम्हांस असें समजतेंकीं वैरागड प्रगणें व ता. मेळघाट जिल्हे इलिचपूर यांतील मौजे लवादा आणि मौजे पिंपलदा हें दोन गांव तंड्या डाकू यानें तारीख ७।६।८५ इ० रोजीं रात्रीं लुटले. व बहुतेक गरीब स्त्रियांची इजत घेतली. आणि जाते समईं असें सांगून गेला कीं भिरोना आणि मेसरपूर ह्या दोन गांववाले लोकांनीं हुशार रहावें. बंदोबस्ता करितां नरसपा पोलीस इ० व कांहीं कान्स्टेबललोक भिरोने मुक्कामीं गेले आहेत.

येथील आल्याची मीर इशान उलहक्क यांनीं ता. १ जून पासून अगर ते घेतील त्या दिवसा पासून पांच महिन्याची बिन पगारी रजा मिळाली.

मे. लेस्ली सांडर्स साहेब यांना वऱ्हाडचे कायमचे कमिशनर नेमल्याचें कळतें. ह्या वरून हल्लीं रजेवर असलेले मि. हेन्वी साहेब हे मुळींच येत नाहींत अगर परत आल्यास त्यांस दुसरीकडे जावें लागेल असें वाटतें.

## वर्तमानसार

ग्ल्याडस्टन मिनिस्ट्रीनें दिलेला राजीनामा राणी सरकारनी मंजूर केला नाहीं असें लंडन टाईम्स वरून कळतें.

बडोदें येथें एक आफगाण मेला. त्याचे जवळ एक ३ रुबलची व दुसरी ५ रुबलची अशा दोन, रशियाच्या नोटी सांपडल्या. यावरून रशियाचे हेर आफगाणी पोशाख करून हिंदुस्थानांत फिरत आहेत असें सिमला वर्तमानपत्रावरून कळतें.

हत्यारांची परवानगी. सिमल्याच्या तारेवरून असें कळतें कीं, भाले व शिकारी सुरे, हीं हत्यारें मुंबई, मध्यप्रांत आणि कुर्ग या प्रांतीं " आर्म्स आक्टाप्रमाणें " मना धरलीं जाणार नाहींत.

बायकांची स्वारी— कान्स्टांटिनोपल शहरीं ३० मार्च रोजीं कांहीं शिपाई लोकांच्या बायका कट करून आपले पतीच्या तुंबलेल्या पगाराच्या बाकया मागण्या करितां जमाबंदीकडील प्रधानाकडे एकदम चाल करून गेल्या पहारेकऱ्यांनीं पुष्कळ हरकत केली परंतु त्यांच्या त्या हरकतीस न जुमानता त्यांनीं तसाच प्रधानाच्या वाड्यांत प्रवेश केला. तेव्हां प्रधान साहेबांनीं पश्चिमद्वारें पलायन केलें! काय हें धाडस!

खालील मजकुराकडे लक्ष्य दिलें असतां पाश्चिमात्य मोठी सुधारलेलीं राष्ट्रें ही स्त्रीस्वातंत्र्याच्या कामांत मागेंच आहेत असें दिसून येतें. जावा बेटांत एक स्वतंत्र संस्थान आहे. तेथील सर्व राज्यकारभार बायकाच चालवितात. बटेव्हिया व सामेरिम यांचे दरम्यान ब्यांटारा संस्थान आहे, तें नांवानें मात्र हालन्डचे ताब्यांतील आहे. तेथील राजा काय तो पुरुष असावयाचा बाकी मंत्रीमंडळ, मोठ मोठे दिवाणी व फौजदारी अम्मलदार व शिपाई हे सर्व बायका असतात. यासंस्थानच्या स्त्री अधिकाऱ्यांस पुरुषांप्रमाणें हातांत भाले वगैरे घेऊन घोड्यावर उत्तम तऱ्हेनें बसतां येतें. हे सर्व स्त्री योद्धे भर रस्त्यानें चालले असतां तो देखावा किती मौजेचा दिसत असेल बरें? मागें हिंदुस्थानांत स्त्रीराज्य असल्याचें ऐकिवांत आहे परंतु हल्लींच्या या प्रश्नक्षास प्रमाण नकोच

लखनौंतील प्रत्येक बायको जशी बेगम तसाच अमेरीकेंतील प्रत्येक मनुष्य कर्नल. नुकताच एक मनुष्य लाउजाव्हिली रस्त्यांतील गाडींत शिरला व त्यानें येथें कर्नल साहेब आहेतका ह्मणून विचारलें. हें ऐकतांच त्या गर्डीतील तेरा असामी एकदम उभें राहून, होय आहेत, असें ह्मणालें. ने.ओ.

श्री. सयाजीराव महाराज गायकवाड यांस श्री. शिंदे सरकारची कन्या ह्मणजे सावंतवाडीकर दादासाहेब यांची नात द्यावी असा विचार चालल्याचें ऐकिवांत आहे. आ. व.

लाहोरास एक पट्टेवाला २,१००रुपयांची हुंडी पटविण्याकरितां गेला असतां चोरट्यांनीं त्याचा खून केला व त्याचा मुर्दा शहराबाहेर एका ओढ्यांत टाकून २,१०० रुपये लांबविले. काय द्रव्यलोभ हा! पैशाकरितां इतकें घोर पातक ना! ! !

फासेट साहेबांच्या स्मारका करितां जो फंड जमा झाला आहे त्यांपैकीं २० हजार रुपये जो अंध विद्यार्थी युनिवर्सिटीच्या परीक्षेत उतरेल त्यास स्कालरशिप देण्याकरितां ठेविले आहेत.

डागिन्यांसाठीं प्राणनाश—ल्हान मुलांच्या आंगावर फार मोलाचे डागिने घालून त्यांच्या मागें कोणी संरक्षक न ठेवितां त्यांस रस्त्यांतून एकटीं खेळावयास जाऊं देणें हें अत्यंत भयप्रद आहे, असा अनुभव वारंवार येत असूनही आईबाप वगैरे वडील माणसें वेड्यां प्रेमानें बालकांस डागिन्यानीं शृंगारून एकटीं बाहेर जाऊं देतात हें मोठें आश्चर्य आहे. अशा प्रकारच्या अविचारामुळें एका ८-१०वर्षांच्या मुलाचा प्राण केवळ १६ रुपये किमतीच्या चांदीच्या कडदोऱ्यासाठीं नुकतांच घेण्यांत आला.

या हृदयभेदक दुष्कर्माची हकीकत अशी आहे कीं, भुलेश्वरनजीक बनियन रस्त्यावर प्रेमजी तुळसी नांवाचा गुजराथी सुतार राहत असतो, त्याचा मुलगा जिवराज हा ता. १९ मे रोजीं सकाळीं खेळावयास म्हणून गेला तो परत आला नाहीं. ही गोष्ट त्याच्या आईनें नवरा कामावरून घरीं परत आल्यावर त्यास कळविली. त्यानें आसपास पुष्कळ शोध केला परंतु कांहीं पत्ता लागेना. तेव्हां त्यानें पोलिसास वर्दी दिली. नंतर स्वतः आपण व पोलिस मिळून सतत १० दिवस शोध करितां शुक्रवार ता. २९ मे रोजीं या निरपराधी बालकाचें प्रेत माहिम रेलवे स्टेशना नजीकच्या विहिरीजवळ बरेंच कुजून नाहींसें झालेलें अशा स्थितींत पोलिसास सांपडलें. तें या सुतारास पोलिसानें दाखवितांच त्या प्रेताचा राहिलेला भाग, त्याच्या जवळ पडलेलें धोतर, व त्याच्या कानांतील पितळेचें सुंकलें इत्यादि खुणांवरून तें आपल्या नाहींशा झालेल्या पुत्राचें प्रेत आहे असें पित्यानें ओळखिलें मुलाची आई नंदू हिनें सांगितलें कीं, मुलगा खेळावयास गेला तेव्हां त्याच्या कंबरेंत एक चांदीचा कडदोरा होता. तो मात्र या प्रेतावर सांपडला नाहीं.

या भयंकर प्रकरणाची पोलिस सर्जन मार्फत चौकशी चालूं असून ती ता.१३ मिनहु पर्यंत तहकुब आहे. या चौकशींत हें महा घोर कृत्य करणारे कोण असतील ते बाहेर पडतील, परंतु एका निरपराधी बालकाचा प्राण यःकश्चित धनलोभानें नाहींसा झाला आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. ही गोष्ट पाहून लोकांनीं आपल्या बालकांचे प्राण अशा रीतीनें धोक्यांत घालण्याच्या अविचारापासून दूर रहावें हें बरें. सु. प.

बडोदें येथील दरबार फिजीशियन डा. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर हे रजेवर येथें येणार असून पुनः ते बडोद्यास जाणार नाहींत असें समजतें. खरें असेल तर कां? गायकवाड सरकारास ब्राम्हणांच्या सान्निध्याचा वीट येऊं लागला कीं काय?

गेल्या आठवड्यांत येथील न्यू इंग्लिश स्कुलांतील दोन शिकणारीं मुलें मेलीं. दोघे ही चांगले अभ्यासी होते व एक तर शंकर शेटची स्कालरशिप मिळविण्यापैकीं होता असें म्हणतात. न्यू इंग्लिश स्कुलांत अभ्यास फार सक्तीनें चालतात असें म्हणतात व त्या मुळें जर अल्प काळीं मुलें मरत असतील तर स्कूलच्या म्यानेजरांनीं याच विचार करण्यासारखा आहे. दोन महिन्यापूर्वीं आणखी एक मुलगा परांजपे म्हणून मेला. तेव्हां या विषयाची चर्चा रानडे करतील काय? केवळ अभ्यासामुळें मुलांचे प्राण जावें हें किती भयंकर व शोचनीय आहे!!!

गेल्या गुरुवारच्या ग्याझिटांत गेल्या तीन महिन्यांत मुंबई इलाख्यांत जीं पुस्तकें, जे ग्रंथ, व जीं मासिकें, त्रैमासिकें वगैरे प्रसिद्ध झालीं त्यांची याद दिली आहे. एकंदर ग्रंथ सर्व भाषेंतील मिळून ३५१बाहेर पडले. मासिकें वगैरे ११२ इंग्रजींत; २३ ग्रंथ झाले. मराठींत १२३. गुजराथींत १०३. हिंदींत १२. ब्रिज भाषेंत अवघा १ ग्रंथ (महाभारतानार्गत श्री भारतसार) मारवाडींत४ उडदूंत७. अरेबिक—सिंदींत ३. संस्कृतांत३१. परसियन ३. अरेबिक४. एकापेक्षां जास्ती भाषेंत अशी ४० पिरियाडिकल्स म्हणजे ठरलेल्या काळीं प्रसिद्ध होणारीं चांगलीं ११२पर्यंत गेलीं. एकंदरींत आजमित्तीपर्यंत मराठींत जास्ती ग्रंथ भरणा होत आहे. परंतु गुजराथींतही पुष्कळच पुस्तकें होऊं लागलीं आहेत. मराठीचे अभिमानी असतील त्यांनीं आपल्या पुढें गुजराथेस जाऊं देऊं नये. बाकी अमदीं पाठीशीं अशीं तीच आहे. मराठींत शास्त्रिय पुस्तकें अजून होत नाहींत हें चांगलें नव्हें. "सटवे घे" अशीं पुस्तकें निघून नंबर वाढण्यांत कांहीं हंशील नाहीं. ज्या पुस्तकांच्या प्रकाशापासून अज्ञानतमाचा विध्वंस होईल व ज्यामुळें मराठी भाषेची वर्णनीय वृद्धि होईल ते ग्रंथ व्हावे. आमची ग्रंथकारांची सभा पाहूं काय करते तें.

आम्ही गेल्या अंकांत सुचविल्याप्रमाणें रा० ब० माधवराव यांस मेजवानी करण्याचा बेत तर झाला. यादी फिरताहेत, बरेच पैसे मिळतील व मिळाले असें कळतें. ही बडी मेजवानी करण्याच्या खटपटींत आमचे न्यु इंग्लिशस्कूलवाले आहेत असें कळतें. अलिकडे धर्मसंबंधानें त्यांचे व माधवरावजींचे तेढें पडलें असतांही, ही मंडळी हें कसें करते म्हणून कित्येक आमचे जवळ तक्रारी करतात; पण त्यांस उत्तर हेंच कीं इंग्रजी कावा असाच आहे. पार्लमेंटांत पक्ष दोन. ते एकमेकांच्या इतके विरुद्ध जातात कीं, एखाद्यास वाटेल हे शत्रु आहेत, पण तसाच एकदां प्रसंग येऊं द्या कीं, आपले सर्व लोक खांद्याला खांदा देऊन तयार! मग भेद वगैरे कांहीं नाहीं. सरहद्दीचे खर्चासाठीं व सुआकिमच्या खर्चासाठीं ११ कोट कर्ज काढण्याचे पुढारी मंडळी बोलली, पण त्यास सर्वांचा होकार तेव्हांच मिळाला. सार्वजनिक हितापुढें आपलीं भांडणें रद्द होत. आपले स्वतःचें हित तुच्छ मानणारे जेव्हां हरीचे लाल शेंकडों इकडे वावरूं लागतील तेव्हांच देशकल्याण सुरूं झालें म्हणावयाचें. मेजवानीची मंडळींनीं व्यवस्था मात्र चांगली ठेविली पाहिजे. लहान मोठ्याचा भेद करूं नका हो ! ! ! पब्लिक हिंदुखाना बहुतेक हाच पहिला आहे, तेव्हां जास्ती दक्षता पाहिजे. बगैरेदार सर्व जातीचे असतील, तेव्हां गडबड न उडेल अशी तजवीज ठेवतील अशी आशा आहे. आज साडे दहा वाजतां ही मेजवानी होणार. एकंदर हकीकत पुढील अंकीं देऊं. या खटपटीचे पुढारी रंगराव पुरंदरे आहेत.

पु० वै०

मानवी दुष्टबुद्धीचीं उदाहरणें पुष्कळ ऐकिवांत आलीं आहेत, परंतु हल्लीं एक मासला जो ऐकिवांत आला आहे तो फारच चमत्कारिक आहे. हालंडांत एका बाईनें द्रव्यलोभास्तव आज पर्यंत एकंदर १०२ मनुष्यें मारिलीं. मारण्याचा प्रकार तो असाः—तिनें एका मनुष्याच्या आयुष्याचा विमा उतरावा व त्या बदल लागणारे पैसे स्वतां भरावे. विमा उतरणें झाल्यावर ज्याचा विमा उतरला असेल त्यावर विषप्रयोग करून त्यास ठार मारून टाकावें व विम्याचे पैसे आपण घ्यावें. या प्रमाणें आजपर्यंत या बाईने १०२ मनुष्यें मारिलीं. सुधारणे बरोबर सौजन्य, चांगुलपणा, वगैरे कित्येक गुण प्रत्येक व्यक्तींत बलवत्तर होतात असा पुष्कळ लोकांचा समज आहे. व तो केवळ निराधार आहे असें ही नाहीं. तथापि सुधारलेले म्हणविणाऱ्या लोकांत ही असली उदाहरणें सांपडतात. तेव्हां केवळ बाह्य सुधारणा झाली म्हणजे लोक चांगलेच निपजतात असें नाहीं.

लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं, देवासे संस्थानचे मोठ्या प्रितींतील श्रीमंत महाराज बाबासाहेबांचा पुतण्या माहामारीचे तडाक्यांत सांपडून परलोकवासी झाल्याची शोचनीय बातमी आली आहे. या मुलाचें वय १६।१७ वर्षांचे असून वर्तन फार सुशील असे व योग्य समयीं त्यास दत्तक घेण्याची बाबासाहेब महाराजांची इच्छा होती.

धुलिपसिंगास परत हिंदुस्थानांत येण्यास सरकार मनाई करीत आहे. हिंदुस्थानांत जाऊन शीक लोकांत मिसळून राहाण्याचा माझा इरादा असून परत युरोपांत येण्याचा इरादा नाहीं असें महाराजांनीं सरकारास कळविलें व त्यावरून सरकारानें ही मनाई केली असें सांगतात. धुलिपसिंग हे पंजाबचे माजी राजे असून त्यांणी एका गोऱ्या बायकोशीं लग्न लावलें आहे व तिच्या पासून झालेलीं कांहीं मुलेंही आहेत असें असून त्या सर्वांपासून कायमचें वेगळें होण्याचा महाराजांचा इरादा दिसतो, पण सरकार मात्र आडवें आहे. कित्येक ह्मणतात कीं, तो परत हिंदुस्थानांत आल्यास शिक लोक कांहीं गडबड करतील असा संभव असल्यामुळें सरकार त्यांस इकडे येण्याची परवानगी देत नाहीं. लोकांची ही कल्पना अगदींच चुकीची दिसत नाहीं. दुसरे कित्येक ह्मणतात कीं, तो हिंदुस्थानांत आला ह्मणजे त्याची बायको झालेली जी गोरी बाई तिची मग हल्लीं सारखी चैन चालणार नाहीं ह्मणून त्यास हरकत होत आहे, पण या ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

ता. ३० मे रोजीं श्रीनगर येथें एक तास पर्यंत धरणीकंप झाला व त्याच्या योगानें लष्करी बराकी जमीनदोस्त होऊन २५ मनुष्यें व ६० घोडे ठार झाले. शहरांत ही कित्येक लोक मेले. पुष्कळ घरें जमीनदोस्त झाल्यामुळें आंतील लोक तंबूंत राहिले आहेत, हा धरणीकंप एक तासापुढें ही पुष्कळ वेळ होत होता व या पूर्वीं येथें असा कधीं झाल्याचें आढळत नाहीं.

कलकत्याच्या एका वृद्ध गोऱ्यानें १६ वर्षांच्या आपल्या एका तरुण मुलीचा खून केल्याचा एक खटला सुरू झाला आहे.

ठा० अ०

☞ हें पत्र अकोला येथें कै.वा. खंडेराव बाळाजी यांचे 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत.नारायण खंडेराव फडके यांनी छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची आगाऊ रु० ५ डाक हंसील ०।१।
सहामाही ,, ३ ,, ,, ०८
साल अखेर ,, ७ ,, ,, १०८
किरकोळ अंकास....................०२

er annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 ,, 1 8as
Six monthly.......3 ,, 8 as
single copy...................4 as

नोटिशी बदल
१० ओळींचे आत रु १
पुढें दर ओळीस ०।१।
दुसरे खेपेस .......०१

Advertisements
Below 10 lines......2Rs
Per line over 10......4as
Repetition per line...3as


# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.


VOL XIX AKOLA MONDAY JUNE 22 1885 NO 24

पुस्तक १९ अकोला सोमवार तारीख २२ माहे जून सन १८८५ इ० अंक २४


## पक्षकार लोकांस उपयोगी माहिती.

रा० रा० रामचंद्र दाजी नगरकर बी.ए एल. एल. बी. मुंबई हायकोर्टाचे वकील, हे सध्यां वऱ्हाडांत आले आहेत. हे मोठ्या घराण्यांतील असून हुषार, व अनुभवशीर आहेत. यांचे हाफीस वऱ्हाडसमाचार छापखान्यापाशेनारी काळे मारुती जवळ आहे. वऱ्हाडांतील लोकांनीं इकडे अवश्य लक्ष द्यावें अशी आमची त्यांस सूचना आहे.

तारीख ९ माहे दिसेंबर सन १८८४ } पत्रकर्ते

## जाहिरात

मक्का येथें यात्रेस जाऊं इच्छिणारे लोकांस असें सुचविण्यांत येतें कीं, जद्दा येथें जाऊं देण्यापूर्वीं त्यांना कारंटाईन [रोग आहे किंवा नाहीं हें पहाण्याकारितां] कारितां तुर्की सरकार कॉमरन बेटांत निदान दहा दिवस पर्यंत अडकावून ठेवतील. कॉमरन बेटांत जो पर्यंत रहावें लागेल तोंपर्यंत आपले खर्चाची व्यवस्था यात्रेकरूं लोकांस करावी लागेल. कॉमरन बेटांत जो अडथळा येईल ते दिवस वजा जाऊन जद्दा येथें हज करितां वेळेवर जाऊन पोहोंचणें होईल अशा बेतानें निघणारे गलबतांत बसण्याची यात्रेकरूं लोकांनीं आपली खात्री करून घेतली पाहिजे. कॉमरन-बेटांत कारंटाईन करितां यात्रेकरूं जितके दिवस राहतील तितके दिवस त्यांना आपले खाण्यापिण्याची व्यवस्था करावी लागेल आणि या शिवाय तुर्की सरकार त्यांजकडून कांहीं फी घेतील. आणि जीं गलबतें कारंटाईन टाळून जातील त्यांतील यात्रेकरू लोकांस जद्दा येथें उतरूं दिलें जाणार नाहीं.

याजकरितां यात्रेकरू लोकांस अशी सूचना करण्यांत येत आहे कीं, कारंटाईन हज आणि परत हिंदुस्थानांत येण्यापुरते पैसे आपले जवळ आहेत किंवा नाहींत हें त्यांनीं यात्रेस निघण्यापूर्वींच पाहिलें पाहिजे. जद्दा येथील मुसलमानी व्हाईस कौन्सल अब्दुर रज्जाक यांनीं असें सुचविलें आहे कीं जद्दा येथें जाण्यास गलबताचा जो खर्च लागतो तो देऊन आणखी प्रत्येक यात्रेकरू जवळ हिंदुस्थानांतून निघते वेळेस निदान तीनशे रुपये तरी असले पाहिजेत. जद्दा येथें इंग्रज सरकारचे अंमलदारांकडून पैशाची मदत मिळणार नाहीं.

ज्यांना यात्रेस जाणें असेल त्यांनीं जहाजांत बसण्याची योग्य तारीख कोणती आहे याजविषयीं मुंबई प्रोटेक्टर ऑफ दि पिलग्रिम्स आणि इतर बंदरचे अंमलदारांपासून माहिती मिळवावी.

( Signed ) A. mackenzie.
Seeretary to the
Government of India.

### नोटीस.

रा. रा. जानजी वल्लद बकर्डा माळी राहणार पारसी तालुके बाळापूर यांस नोटीस देणार रंगाजी वल्लद पुंजाजी माळी राहणार मोरगांव वाघाचे. हा ह्या नोटीसीनें असें कळवितों कीं तुम्ही ता. ८ माहे जून सन १८८५ इसवीची नोटीस वऱ्हाडसमाचार पत्रांतून दिली ती पावली. नोटिसींतील सर्व मजकूर समजला. आतां तुम्हांस असें कळविलें जातें कीं आम्ही आमची सून नामें तुळसी इजला आम्ही घरीं घेऊन जाऊन चार इतर लोकांप्रमाणें तिजला नांदविते व तिजला तीन वर्षांत पोटगी बदल रुपये १५० तुम्ही मागतां त्यांस ती माहेरीं तुम्ही नोटिसीनें कळवितां त्या प्रमाणें तीन वर्षें नसून तिजला माहेरी तीन महिने जाहले असें असून तुम्ही १५० रुपये मागतां नवलाची गोष्ट असो, आतां तुम्हांस असें ही कळवितों कीं तुमची पोरगी आम्ही आमचे मुलास केली त्या वेळीं तिजवर दागदागिने ११७८ रुपये किंमतीचें अंगावर घातले आहेत ते तुम्हांजवळ आहेत ते दागिने व मुलीस ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांत मुलगी व सदरील दागिने असें आणून पोचतें करावें असें न केल्यास रीती प्रमाणें काम चालवून हर एक प्रकारचें नुकसान भरून घेतलें जाईल कळावें ता. १६ माहे जून सन १८८५ इसवी

(सही)ची निशाणी रंभाजी
वल्लद पुंजाजी माळी
यांची असे.

### नोटीस.

रा. नामु वल्लद पुंजाजी पाटील राहणार लींगरवाडा तालुके जळगांव जिल्हे अकोलें यांस खालीं सही करणार चिनकी मर्द नामु पाटील नोटिसीनें कळवितें कीं माझें लग्न तुज बरोबर लहानपणीं जाहलें. नंतर मी वयांत येई पर्यंत आपले बापाचेच घरीं होतें. पुढें मी मोठी झाल्यावर तुम्ही मजला स्वतः येऊन घरीं घेऊन गेला तुमच्यापाशीं मी पांच सहा वर्षें घर धंदा करून होतें नंतर माझे आईबाप मयत झाले व माझा चुलता रणधीर वल्लद दानाजी यांच्या मुलीचें लग्न होतें त्या वेळीं माझे चुलत्यानें मजला पाठवून द्यावें म्हणून तुम्हांस लग्न चिठ्ठी पाठविली होती त्या वेळीं तुम्ही मजला माहेरी चुलत्याच्या घरीं लग्नास पाठविले नंतर चार सहा महिने माहेरी राहून तुम्हांकडे परत आले तों तुम्ही मज बरोबर रीती प्रमाणें न राहतां मारा-हाण वगैरे काय पाहिजे तें करूं लागला त्या वेळीं माझे चुलत्यानें मला माहेरी बोलावून घेऊन तुम्हांस असें सांगितलें कीं विनाकारण माराहाण करून गैर इजत करितां ती न केल्यास तुमच्या बायकोस पाठवून देईन म्हणून सांगितलें व पुढें मी आज ती न वर्षें तुम्ही मजला घेऊन जावें म्हणून चार संभावित जात भाई कडून सांगितलें परंतु घेऊन न जातां उलट कांहीं तरी माझें नुकसान करीन म्हणून सांगून पाठवितां याजकरितां तुम्हांस असें कळविलें जातें कीं नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत मजला आज तीन वर्षें बसून तुझे नांवावर कर्ज काढून पोटास वगैरे खर्च जाहलेले १५० रुपये देऊन मजला घेऊन जावें असें न होईल तर रीती प्रमाणें कोर्टांत दावा करून सर्व नुकसान भरून घेतलें जाईल. शिवाय असें ही कळविलें जातें कीं सदरील करारा प्रमाणें रुपये देऊन मजला घेऊन जावें असें न झाल्यास हीचें सोड चिठी समजून दुसरा घर ठाव करीन मग कोणच्या ही प्रकारचा संबंध तुझा मजवर राहिला नाहीं म्हणून लिहून दिली नोटीस ता. १९ माहे जून १८८५ इसवी.

( सही ) ची बांगडी चिनकी मर्द नामु इच्या
हातची असे.

## खेड्यांतील शिक्षकानें लोकप्रेम कसें संपादावें?

( लिहून आलेला मजकूर )
( मागील अंकावरून पुढें चालूं )

गेल्या अंकीं लिहिले प्रमाणें पातूरची सुधारणा झाली खरी, परंतु तिचा उत्पादक कोण या विषयीं मला मोठी शंका उत्पन्न झाली. कां कीं, ज्या वेळीं ही कमेटी प्रथम स्थापित झाली, तेव्हां तेथील कारभारी पाटील मि. भोनाजी यांस कमेटीचे कारभारी नेमून, काजीसाहेब, इंग्रजी शाळेचे हेड मास्तर मि. दामोदर कृष्ण व दुसरे एक दोन गृहस्थ यांस मेंबर नेमिलें. पुढें या मंडळींत एकोपा नाहीं, असें पाहून हेडमास्तर यांनीं राजीनामा दिला. व त्यांची लागलीच बदली झाली. तेव्हां कमेटी जुलमी होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. परंतु स्पेशल माजिस्ट्रेट यांचे शिरस्तेदार मिस्तर बळवंतराव यांची रिकाम्या जागेवर कमेटींत नेमणूक झाली तेव्हांपासून हळूहळु वर सांगितल्या प्रमाणें पातूरची सुधारणा झाली.

बळवंतराव हे गृहस्थ स्वभावानें व मनानें अगदी सरळ, दृढनिश्चयी असून लोकोपयोगी कामें करून हस्तें परहस्तें जनहित साधणें हेंच आपलें कर्तव्य असें ते समजतात. लायब्ररी, मुलींची शाळा, मुलांच्या शाळेची हल्लींची उत्तम स्थिति व कमेटीचीं अनेक कामें हीं सर्व यांच्याच परिश्रमाचीं फळें आहेत, असें अकोलें जिल्ह्याचे डेपुटी कमिशनर यांची देखील खात्री झाली आहे. हे गृहस्थ स्वतंत्र असते, तर एवढ्यावरूनच यांची कीर्ति होऊन स्पेशल माजिस्ट्रेटचा अधिकार ही यांस मिळता, परंतु ते सरकारी नोकर आहेत, म्हणून यांची विशेष नोटीस घेतली जात नाहीं, असें मी समजतों. यांस नायब तहशिलदार किंवा असेंच एखादें चांगलें काम दिलें असतां, त्यांच्या उद्योगाचा मुबादला त्यांस मिळून ते तें काम ही चांगले रीतीनें करतील यांत संशय नाहीं; डेपुटी कमिशनर या गोष्टीचा विचार करून कांहीं करितील तर होणार आहे.

एवढावेळ पर्यंत खेड्या पाड्यांतील शिक्षकांस वारंवार ज्या अडचणी येतात, त्या व शाळाखात्याचे व इतर अधिकारी यांनीं शिक्षकाचा बोज कसा राखिला पाहिजे यां विषयीं लिहिलें. आतां शिरो लेखाकडे म्हणजे शिक्षकानें स्वतः कसें वागलें पाहिजे, आपल्या शाळेच्या व स्वतः आपल्या उत्कर्षा करितां काय काय केलें पाहिजे, लोक प्रेम कसें संपादितां येईल वगैरे विषयीं लिहितों.

प्रथम ईश्वरेच्छेनें उदरनिर्वाहा करितां हें शिक्षकाचें काम आपण करीत आहोंत हें प्रत्येकानें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. कां कीं १०।१२ रुपयांची नोकरी केल्यानें मोठी इजत मिळते, किंवा लोकोपकार होतो, किंवा येथील लोकांस चांगला शिक्षक मिळत नाहीं, म्हणून मोठ्या श्रमानें त्यांनीं आपणांस हुडकून मोठ्या अर्जवानें आपणांस येथें ठेवून घेतलें आहे असें नाहीं. जर कोणी असें समजत असेल, तर त्यांची ही मोठीच चूक असून तो समज त्यानें आपल्या मनांतून निर्मूळ काढून टाकावा, नाहींतर राजीनामा तरी द्यावा. कां म्हणालतर नोकरी म्हणजे ताबेदारी; मग ती जागल्याची असो किंवा डेपुटी कमिशनरची असो; आणि ताबेदार म्हणजे आपलें शरिर आणि मनही कांहीं काळपर्यंत दुसऱ्याच्या कामीं लावणें. अर्थात जेथें स्वातंत्र्य नष्ट झालें, तेथें मोठेपण कोठून राहणार! जें काम करण्या बद्दल आपण दरमहा पगार खातों, तें काम फार उत्तम रीतीनें जरी केलें तरी परोपकार होत नाहीं हें ही सांगणें नको. अमका शिक्षक आपलें काम चांगलें करितो, अमका वाईट करितो, हें ठरविण्याचा अधिकार व सामर्थ्य आपणांस नाहीं. तसेंच मी मोठा उत्तम शिक्षक आहे अशी ही घमंड आपणांस बाळगितां कामा नये. प्राचीन काळीं आमचे ऋषी मंत्र सामर्थ्यानें एका क्षणांत दगडाचा वृक्ष स्पाति करीत असत. तें सामर्थ्य आपणांमध्यें आहे काय? पण इतकें लांब कशाला, आपल्या या वऱ्हाडांतच कांहीं शिक्षक असे आहेत कीं ज्यांनीं नऊ महिने खेळणें हसणें खिदळणें अशांत घालवून परीक्षेचे पूर्वीं २।३ महिने सक्त मे

हनत घेऊन परीक्षेत दिलेलीं सर्व मुलें पास करून घेतलीं आहेत!! हें तरी सामर्थ्य आपल्या मध्यें कोठें आहे? आणखीं एक तान्हें उदाहरण रा. रा. विष्णूपंत महाजनी यांची अकोले हायस्कुलांत हेड मास्तरचे जागीं नेमणूक होण्यापूर्वीं त्या शाळेचा म्याट्रिक्युलेशनचा रिझल्ट दरसाल कमी होत होत भोपळ्या एवढ्या पूज्यापर्यंत येऊन पोंचला होता. परंतु महाजनी यांच्या दोन चार महिन्यांच्या सफाईच्या हातानें परीक्षेस गेलेलीं सर्वच मुलें पास झालीं! केवढें सामर्थ्य; तात्पर्य मीच उत्तमशिक्षक अशी कोणी ही घमेंड बाळगण्याचें कारण नाहीं.

प्रत्येक शिक्षकानें असें समजलें पाहिजे, कीं आपल्या निर्वाहा करितां, कोणता तरी धंदा करणें प्राप्त असून ईश्वरेच्छेनें शिक्षकपणा आपल्या वांट्यास आला आहे. अतां आपणांस पगार मिळतो, तो, आपलें कुटुंब मोठें आहे, किंवा आपण मोठ मोठ्या लोकांच्या ओळखीचे आहोंत किंवा आपणांस सतार चांगली वाजवितां येते, किंवा आपण मोठे वक्ते आहोंत, किंवा विद्वान् आहोंत म्हणून मिळतो असें नाहीं; तर आपलें कर्तव्य अधिकारी यांच्या पसंती प्रमाणें आपल्या हातून झालें, तर आपण आपल्या विद्यमान पगारास पात्र होतो. ह्या पात्रतेची मुदत एक वर्षपर्यंत असते. म्हणजे एका वार्षिक परीक्षेमध्यें आपलें काम अधिकारी यांस पसंत पडलें, तर दुसऱ्या परीक्षे पर्यंत आपणांस पगार कमी होण्याची धास्ती नसते. परंतु दुसऱ्या परीक्षेंत जर काम चांगलें झालें नाहीं, तर पहिल्या वर्षाची लायकी दुसऱ्यावर्षीं कांहीं कामाची नाहीं. ती दरसाल प्राप्त केलीच पाहिजे; ही गोष्ट विशेष लक्ष्यांत ठेवण्या सारखी आहे. कित्येक खेड्यांतील शिक्षकांची अशी एक तक्रार वारंवार कानीं येते कीं, मी गुदस्त सालीं जशी मेहनत केली, तशीच यंदां ही केली; असें असतां गुदस्तां माझा रिझल्ट चांगला झाला आणि यंदाचा वाईट झाला; यास काय करावें! असें होतें खचीत यांत संशय नाहीं. परंतु हा परीक्षकाचा दोष नाहीं, शिक्षकाचा आहे. कसा तो पहा. अहो, वऱ्हाड शाळाखातें कैलासवासी डा. सिंक्लेर यांनी प्रथम स्थापित केलें त्या वेळची स्थिति आणि ते निजधामासगेले त्यावेळची स्थिति यांत किती अंतर आहे बरें! पुन्हां रावबहादूर नारायण भाई यांस डायरेक्टरचा अधिकार प्राप्त झाला, तेवेळची व सांप्रतची स्थिति यांत ही जमीन अस्मानाचा फरक आहे, हें कोणीही कबूल करील. तसेंच आपले हल्लींचे डायरेक्टर यांचे कारकीर्दींत असाच फरक पडत जावयाचा हें सिद्धच आहे. आतां हा फरक एकदम होतो काय? नाहीं. तर सालोसाल थोडाथोडा फरक होत होत, कांहीं वर्षांनीं मूळस्थितीशीं ताडून पहातां मोठा फरक दिसतो. ही हळु हळु होत असलेली सुधारणा दूरच्या खेड्यांतील शिक्षकांच्या नजरेस नयेतां तो उगाच परीक्षकांस दोष देतो इकडे परीक्षक बुद्ध्या कडक होत जातो असें नाहीं; पण प्रश्न सालाच्या मानानें आपो आप बदलत जातात; त्यामुळें त्या शिक्षकास परीक्षक कडक आहे असें वाटतें. इंग्रजींत एक म्हण आहे; One must keep pace with the time; हिचा अर्थ असा आहे कीं, जग दिवसें दिवस सुधारत चाललें आहे, म्हणून प्रत्येक मनुष्यानें ही आपली स्थिति सुधारीत गेलें पाहिजे. तसें तो न करील तर या जगांतील निरंतर चालणाऱ्या शर्यतींत तो मागें पडेल. यांत तिळ मात्र संदेह नाहीं. मागें सिंक्लेर साहेबांच्या कारकीर्दींत जे शिक्षक विद्वान व उत्तम असे ठरले होते, ते एलीअट साहेबांच्या कारकीर्दींत नालायक ठरत चालले. पुढें भाईसाहेबांच्या अमलाखालीं पुष्कळ लोक नालायक होत जाऊन शेवटीं बहुतेकांनीं पेन्शनें घेतलीं. व कित्येक कमी पगारांवर राहण्यास कबूल झाले. आणि नवे नवे विद्वान् लोक भरती झाले. याचें कारण असें आहे कीं, मनुष्याला एकदां नोकरी लागली कीं गंगेत घोडे न्हाले असें त्यास वाटूं लागतें. मग त्याला अभ्यास करण्याची जरूरी नाहीं; जन्मास येऊन जें सार्थक्य करणें तें आपण केलें असें समजून चंची, पटके, बूट वगैरे लोकांतील डामडौलाच्या गोष्टींकडे लक्ष जातें. इतक्यांत तिकडे नवस करीत असलेली बायको येऊन गळ्यांत पडते; असें झालें म्हणजे मग कशाचा अभ्यास! पगार थोडा असल्यामुळें बायकोस पुरून उरलेलें गृहकृत्य स्वतः राजश्रीस करावें लागतें. अशा स्थितीनें देखील कदाचित् ११२ वर्षे त्याच्या शाळेचें काम बरें दिसेल; परंतु ही स्थिति फार दिवस चालत नाहीं, हें वर दाखविलेंच आहे. असो. यावरून इतकें उघड होतें कीं प्रत्येक शिक्षकानें दुसऱ्या दिवशीं शाळेंत जे विषय शिकवावे लागतात, त्यां विषयीं थोडे तरी घरीं मनन केलें पाहिजे; जगांत कोठें काय चाललें आहे, तें समजण्या करितां एखादें चांगलेंसें वर्तमान पत्र किंवा मासिक पुस्तक वाचिलें पाहिजे. तसेंच अलीकडे स्कूल लायब्ररींत चांगली चांगली पुस्तकें मिळालीं आहेत त्यांचा योग्य उपयोग केला पाहिजे. असें केल्यानें आपण मागें राहण्याचें भय नाहीं.

याजवर कोणी असा आक्षेप घेतील कीं, १२ रुपये पगारांत प्रपंच भागून मासिक पुस्तक आणि वर्तमानपत्र हीं घ्यावींत कशीं? याजवर मी एक उत्तम तजवीज योजिली आहे. ती अशी, प्रत्येक शाळेच्या आसपास ३।४ कोसांत बहुतकरून तीन चार शाळा असतात या सर्व मास्तरांनीं मिळून एक कंपनी बनवावी. तिचे ठराव प्रत्येकानें एका मासिक पुस्तकाचे अगर वर्तमान पत्राचे वर्गणीदार व्हावें. प्रत्येक रविवारीं एका गांवास सर्वांनीं नियमितवेळीं जमावें. त्या गांवच्या मास्तराचे घरीं ते त्या दिवशीं पाहुणे समजले जातील. त्या शाळेची त्यांनीं सर्वांनीं मिळून परीक्षा घ्यावी आणि कंपनीच्या दफतरांत त्या शाळेचे गुण दोष लिहून ठेवावे. त्याची एक नक्कल त्या मास्तरास द्यावी. आपापल्या वर्तमानपत्राचा अथवा मासिक पुस्तकाचा मोबादला करावा. तसेंच प्रत्येकानें आपल्या जवळच्या पुस्तकांची यादी दुसऱ्यास दाखवून त्यां पैकीं कोणीं कांहीं पुस्तक वाचायास मागितलें असतां द्यावें. विषय शिकवितांना ज्या अडचणी येतात, त्यां विषयीं आपसांत चर्चा करावी. एखाद्या गोष्टी विषयीं सर्वांसच संशय असला, तर त्या विषयीं एखाद्या आपल्या खा तरीच्या हुशार मास्तरास लिहावें. प्रत्येकानें प्रत्येक रविवारीं एकाच विषयावर निबंध लिहून आणावा. तो वाचून झाल्यावर थोडा वेळ त्याच विषयावर संभाषण करावें. संध्याकाळीं कंपनीच्या दफतरांत त्या दिवशीं झालेल्या हकीकती नमूद कराव्या त्यावर सर्वांनीं सह्या करून मग आपापल्या गांवीं जावें.'' हे किंवा या सारखे दुसरे नियम करून जर आमच्या या वऱ्हाड प्रांतांत सर्वत्र लहान लहान मंडळ्या स्थापित झाल्या, तर किती मौज होईल म्हणून सांगूं!!

(पुढें चालू.)

वऱ्हाडसमाचार

मित्ती जेष्ट शुद्ध १० शके १८०७.

## अकोलें येथें माहामारीचें बरेच दिवस वास्तव्य

या रोगाचा उपद्रव येथें सुरू झाल्यापासून आजपर्यंत बरेच लोक या बाईच्या तडाक्यांत सांपडले. वऱ्हाडांत इतर ठिकाणापेक्षां हाच गांव या बाईस कांविशेष पसंत वाटला याचें कारण पाहूं गेलें असतां असें नजरेस येतें कीं येथील हवापाणी व लोक वस्तीचीं ठिकाणें तीं जशीं आरोग्य कारक असलीं पाहिजेत तशीं तीं ठेविलीं जात नाहींत. मुख्यत्वेंकरून या गोष्टीकडे लक्ष देणें हें काम मुनसिपालिटीचें व शहरचे मुख्य डाक्तर (Civil Surgeon) यांचें होय. परंतु या कामाकडे त्यांचें लक्ष्य पुरेसें नाहीं असें दिसतें. अलीकडे आमच्या मुनसिपालिटीचीं सर्व कामें कितपत कळकळीनें चाललीं आहेत हें सर्वांच्या लक्ष्यांत आलें असेलच. आमच्या बड्या डाक्तर साहेबांचें लक्ष्य शहरच्या सानीटेशन[सफाई] संबंधीं मुख्य मुख्य गोष्टीकडे हवें तितकें न जातां शुष्क गोष्टीकडे मात्र सहज वळतें. गरीब बिचाऱ्या नाटक वाल्यास "तुम्ही नाटक करूं नका" अशी धमकी दिल्यानें सानिटेशन सुधारते अशी गोष्ट नाहीं.

हवा, पाणी व लोक वस्तीचीं ठिकाणें यांकडे हमेशा जास्त लक्ष दिलें पाहिजे. शहरचे बरेच लोक येथील नदीचें पाणी पितात. हें पाणी साचवणीचें व तुंबवलेलें असल्या कारणानें पिणारांस बरीच इजा देतें असें वाटतें. पुलापलीकडील पेठेंत विहिरीचें पाणी पिणारे लोकांस नदीचें पाणी पिणाऱ्या लोकांपेक्षां जास्त आरोग्य असते यांत संशय नाहीं. जर करितां शहरवासी लोकांस नदीच्या पाण्याशिवाय दुसरा इलाज नाहीं तर हें पाणी होईल तितकें स्वच्छ ठेवणें व प्रसंगोपात त्याचा उपयोग महकूब करणें ह्या गोष्टी अवश्य आहेत.

या नदीस दोन ॲनीकट बांधले आहेत त्यांच्या दरम्यानच्या पाण्याचा लोक उपयोग करितात. जर वरील ॲनीकटास पाणी सुटण्याच्या ठिकाणीं फिल्टराचा उपयोग होईल तर आमच्या मतें फार चांगलें होईल त्याच प्रमाणें दरम्यानच्या पाण्यांत बराच चिखल, केर, कचरा व इतर पाणी नासविणारीं झाडें झुडपें वाढलेलीं दिसतात हीं वेळों वेळीं काढून टाकणें जरूर आहे कित्येक वेळीं सदहू पाण्यास दुर्गंधी ही येऊं लागते. या करितां आमचे बडे डाक्तर अगर मुनसिपालिटी नियमीत वेळीं ह्या पाण्याचें पृथक्करण (Analyies) करून त्याजविषयींची हकिकत प्रसिद्ध करीत जाईल तर लोकांस फार हितावह होईल. शहरांतील पावसाच्या पाण्याचा थेंब ही होईल तितका नदीच्या पाण्यांत न जाऊं दिल्यास ठिक पडेल.

शहरचीं अव्यवस्थित खुलीं गटारें व शेतखाने हीं हवा बिघडविणारी मुख्य कारणें होत. मुनसिपालिटीचा सॉनिटेशन संबधानें चांगलासा बंदोबस्त नाहीं. शहरांतील शेतखान्याची बांधणी, त्याचा व्यवस्थित उपयोग, व योग्य सफाई पाहण्याकरितां मुनसिपालिटीनें निराळ्या कामगाराची मुकररी करणें जरूर आहे. पोलिस कडून हा बंदोबस्त होणें मुष्कील आहे. एकतर पोलिसाला आपलेंच काम फार जड झालें आहे. व दुसरें त्यांना सानीटेशन म्हणजे काय हें समजणें देखील जनराच आहे. द्रव्य लोभास्तव ह्या कामाचा बंदोबस्त ते पत करतील, परंतु त्यापासून आम्हां शहरवासी लोकांस काय फायदा!!

गटार प्रकर्णं अलिकडे मुनसिपालिटीनें उपस्थित केलें आहे परंतु अशा कामास सुरवात करण्यापूर्वीं जी भातिनभव ते होणें अवश्य तीं झाली नाहीं आमच्या पत्रांत या संबंधीं पूर्वीं एक पत्र व्यवहार आला होता परंतु " आपण म्हणतां त्याचप्रमाणें आमचा अभिप्राय " असें म्हणणाऱ्या मंडळीचें तिकडेस लक्ष कुठन जाणार! कशी ही गोष्ट असो हीं खुलीं गटारें गांवांतील हवा बिघडवितात यांत संशय नाहीं.

या प्रकारच्या कारणामुळें महामारी बाईचें वास्तव्य अकोलें येथें फार दिवस होत आहे यांत नवल तें काय! असो! आमची मुनसिपालिटी व आमचे बडे डाक्तर साहेब शहर सफाईकडे या पुढें पूर्ण लक्ष देतील अशी आम्हांस उमेद आहे.

The Berar Samachar

MONDAY, June, 22, 1885

## HONORABLE RAO BAHADUR RANADE ON SOCIAL LEGISLATION.

Honorable Rao Bahadur Mahadeo Govind Ranade closed the summer series of lectures at the Hira bag town hall, Poona, by a most emphatic learned and thoughtful speech on the limits and conditions of state legislation in social matters. After thanking the gentlemen who had given the Poona public the benefit of their study during the past year on historical, scientific, literary, po-

litical and social subjects, for the vast amount of information which they supplied each in his own way, he commenced with the *magnum opus* of the evening. He said the subject was one on which he had spoken before and intended to speak again with special reference to the development it had received during the last year. There were two schools who had distributed all the materials collected between themselves. The first school depended upon education, upon time, the improvement of men's minds by contact with the western ideas for the eradication of the customs of child-marriage and enforced widowhood. The other school sought the aid of government to help the matter by the stamp of legislation. Mr. Ranade belonged to the latter school which was in the minority. It could account amongst its ranks such distinguished men as Dewan Bahadur R. Raghunath Rao of Indore and Mr. Mahipatram Rupram of Ahmedabad. As the school to which he belonged had not many adherents he thought he must make out a case for legislative interference by occupying more time and stating at great length the arguments he had to urge. He stated *in limine* that the discussion of the subject was enveloped by many mis-apprehensions which must be left aside when an appreciative and critical study of it was commenced. He compared those mis-apprehensions to idols of the den, idols of the market, Idols of the theatre and several other idols mentioned by Lord Bacon in his work on the advancement of learning. One of the idols he pointed out was the idol of false patriotism. If our ancestors who had achieved glorious reputation in past centuries were to be referred to for the purpose not of washing our hands clean of these social stigmas but for the purpose of perpetuating them or of giving them a sanction by such means then it were better if we had started with a blank ticket and had no ancestry to boast of. The pride ought to be rather the other way. People should think that descended as they are from remote ancestors who were famous for the best religion, for the best philosophy, for the best literature, ancestors who practised remarriage, ancestors who had barred early marriage as a plague of the most venomous type, we must root out the evils under which we are now smarting, which check progress material and moral, bued numerous disputes, generate disunion and other similar evils and try to approach the standard of the noble ancestors from whom we have degenerated. Another idol which was pointed out was the idol of exaggeration. Each school has tried to point its own opinions as deep as possible. Mr. Malabari has exaggerated and others have followed suit. But by exaggeration the evil cannot be shelved. It is unreasonable to think so. Leaving out of consideration all these exaggerations the question must be looked at within those reasonable limits which could be marked out for it. The third idol or mis-apprehension he pointed out was the idol of *Cui Bono*. It is said the women do not complain. There are not more than 1000 widows and it is not of any practical use that they should engage so much of our attention. The Honorable gentleman said that women did complain. They could not make their complaint heard. They had no voice. Their opinions had always been overruled. Can any man honestly believe that the women have nothing to complain? If the greatest grace of the head is taken off, if the widow is treated as a contemptuous being in the world, if all the happiness in this world is gone is it a matter for congratulation for the widows? If a woman were to take to herself superfluous husbands as a man marries two, three, four girls without any reasonable cause and against the express directions of the Shastras that have laid down the strictest limits within which second marriages are permitted while the first wife is living, if a woman were to enter upon such a career while her first lord is living within his cognizance and before his eyes how would the husband feel.? Has he any reason to suppose that his wife should not have the same feeling if he were himself the aggressor? Another idol he referred to was the practice to tell people to attend to other matter which should engage prominent public attention and leave this question of social reform in the back ground.

When we have got over other difficulties, various other evils under which the nation is groaning, when we have secured from government all the rights we are fighting for, there will be time enough to take care of your homes, your wives and children. No other false reasoning could be supposed. If your primary objects of life are to obtain food and comfort, do you pass all the hours of the day in doing that business? Is there no time left when you could look to other matters. It is admitted that there are many subjects of grave importance which call for the foremost attention at our hands. After having cared for them time enough would be left to mind the social question. All subjects must take our time and attention in proportion to their magnitude. The last idol he pointed out had a reference to the numerical aspect of the question. The evil is so small that it does not necessitate the spending of so much breath. If there were but one widow who is the sufferer from the Himalayas to Cape Comorin the subject would still retain its own importance. If a magistrate unjustly and illegally sentences one innocent man to be hanged, is it not a public grievance? Do you not strive to remedy it? Is then the widowhood of infant girls not such an abominable evil? Rao Bahadur Narayan Bhicaji Joglekar, a man of a very orthodox tendencies, was relating to the learned lecturer the scenes on the banks of Goda river at Nasik. Thousands of girls are being deprived of their hair in the most miserable fashion. The victims are entrusted to the mercies of the priest, the parents are not present, some distant relations perhaps accompany, and in broad day light without a curtain, without any sort of privacy at the dictation of a man who cares only for his money, the girl is placed before the barber, her clothes bedewed with tears, in a gift of agony of the most piteous description, to go through an operation at which nothing but great fear, the terror of disapprobation and contempt keeps her calm. The gentleman told the story of a girl who was put into the hands of a merciless priest, crying and protesting against the disgrace, was taken to the river side and made to sit amidst a crowd of spectators with nothing to screen her from their gaze, neither father nor mother to comfort her, each urging her on, making her conscious of the state in which she must pass the whole life without any fault on her side, the only consolation afforded to her being that it was the result of her sin in a by-gone life, a consolation which little secured the peace of her mind. All this was too much for her. She got up, protested against any thing being done to her, retraced the steps to her father's house, always asserting that she would not subject to the indignity without a special permission from the parents which she had gone to ask. She felt the disgrace too deep and revolted against such inhuman doings in human and civilized beings. While she had progressed half the way back, some scheming surrounding stole a march over her to the parents' house and procured a written command to go back and never to show her face till the ceremony was over. Poor girl? She was only fourteen. She could not brook the disfavour of the father, the mother upon whom she depended for every little thing in life. Most sorrowfully she began to recede. Her legs would not help her. Against her will, against the bent of her own conscience, fully knowing that it was a barbarism of the worst type, sobbing and cursing good for making her miserable without any reason nay while she was acting most riteously, most honourably and with the greatest self control and self abnegation, she treaded the way back to the river and in an agony of distress and lamentation sufficient to draw pity from even a stone, which the men assembled in her opinion grievously lacked. She bent her head to the razor prepared to make her unwomanly, ghastly, wretched being. She would have thrice blessed that instrument, would have considered it a heavenly grace and gift if it had put an end to her cares and anxieties, to her subordination and disgrace, to her dependance and contemptuous treatment, always toiling for others, nobody caring a lock of wool if anything happened to her body, all wishing her speedy end, she herself trying the best to cut life short by fasts and privations, by discomforts and mental anguish, she would consider it a blessed beatitude if the instrument had by one clean stroke made life a road to heaven. We must stop to-day. If we can we will take up the other points and very numerous they are which have been stated by Honorable Rao Bahadur Ranade.

---

## वऱ्हाड.

हवामान— आकाशांत अभ्रें येतात परंतु या आठवड्यात पाऊस मुळींच पडला नाहीं. पुन्हा उष्मा होऊं लागला आहे. महामारीचा उपद्रव तुरळक तुरळक चालूं आहे.

आम्हांस लिहिण्यास अतिशय वाईट वाटतें कीं येथील हायस्कुलांतील असिस्टंट मास्तर रा. रा. रामकृष्ण हरी कानिटकर यांस गेले मंगळवारी दोन प्रहरीं महामारीचे उपद्रवानें देवाज्ञा झाली. यांचा स्वभाव गरीब व शांत असून मन मिळाऊ होता यामुळें त्यांच्या मरणाची वार्ता ऐकून त्यांच्या आप्तांस व इष्टमित्रांस दुःख होईल यांत संशय नाहीं.

गेले शनिवारीं किर्लोस्कर संगीत नाटक मंडळीनीं "संगीत सौभद्र" नाटकाचा प्रयोग पुन्हा करून दाखविला. तो पहिल्या पेक्षां उत्तम झाला असें आम्हास वाटतें. हा खेळ पाहण्या करितां कांहीं साहेब लोकही आले होते. ही मंडळी येते बुधवारीं 'रामराज्य वियोगा' चा व शनिवारी साग्र शाकुंतल नाटकाचा अखेरचा प्रयोग करून दाखवून बऱ्हाणपुरास जाणार असें त्यांच्या सूचने वरून कळतें. बुधवारचे खेळाचे टिकीटांचा दर विद्यार्थ्यां करितां मंगळवार सायंकाळ पावेतों नेमे ठेविला आहे.

रा. रा. देवराव विनायक वकील व्हाईस प्रेसिडेंट हे मासूमशावली जवळील बंधाऱ्यावरून जात असतां पाय घसरून पाण्यांत पडून पाण्याच्या जोरासरसें बरेंच खालीं वाहवत गेले परंतु सुदैवानें कांहीं इजा न होतां लवकरच बाहेर निघाले हे कळविण्यास आम्हांस आनंद वाटतो. पाण्याच्या धारेंत सापडल्यामुळें व त्याच्या धक्यानें सर्व आंग दुखत आहे त्यापासून ते लवकर बरे होवोत असें आम्ही इच्छितो.

हैद्राबाद येथें आज बरेंच दिवसांपासून कांहीं लोकांनीं खोट्या सनदा वगैरे करण्याचें काम मोठ्या झपाट्यानें चालवलें असून त्यांचा पत्ता आज पावेतों कोणास ही लावतां आला नाहीं. निजाम सरकारनीं ह्या कामा करितां मुद्दाम नुकतेंच मि. डनलाप साहेब यांस नेमिले होते. त्याप्रमाणें ह्या साहेबांनीं पुष्कळ मेहनत घेऊन व बारकाईनें तपास करून येक १९।१६ असामींची टोळी मुद्देमाला सह पकडली आहे. ह्याकामांत मि. डनलाप साहेब यांस लवकरच यश प्राप्त झालें हें ऐकून आम्हास आनंद वाटतो.

येथील टौन चीफकान्स्टेबल मि. धोंडजी यास तंट्याभिलास पकडण्याकरितां स्पेशल ड्युटिवर नेमिल्याप्रमाणें ते गेले आठवड्यांत तिकडे तावडतोब निघून गेले. व त्यांचें काम त्यांचेच हाता खालचे एका तोताराम या नांवाचे हुशार हेड कान्स्टेबलाकडे सोंपविलें आहे.

मे. निकोलेट साहेब दिपुटी कमिशनर ह्यांची स्वारी नरनाल्याहून कालरोजी येथें आली.

---

## वर्तमानसार

सिकंदराबाद येथें वीजपडून त्या छावणींतले दोघे युरोपियन लष्करी कामदार मरण पावले. हे दोघे घराच्या मध्यभागांत युरोपियन खेळ खेळत होते व दुसरे कित्येक कामदार बाहेर पहवीत होते.

हैदराबाद येथील तुरुंगांत कैद्यांची व शिपायांची मारामारी झाल्याबद्दल एक कमिशन चवकशी करण्या करितां नेमिलें होतें त्याच्या रिपोर्टावरून असें होतें कीं या मध्यें तुरुंगाचा सुपरिंटेंडेंट याचा मुळींच दोष नाहीं व शिपायांस गोळी घालूं नको म्हणून सांगितलें असतां त्यांनीं ऐकिलें नाहीं. म्हणून शिपायांवर सर्वांनीं दोष ठेविला आहे. या खटल्याचा विचार पुढें होणार आहे असें समजतें.

देवा पुढें कुठें पळावें—मस्कत एथील एक बातमीदार लिहितो कीं, दहा बारा आरब रानांतून येत असतां विजेच्या कडकडण्याला भिऊन त्यांनीं एका गुहेचा आश्रय पाहिला इतक्यांत झालें काय कीं, त्या गुहेवरच वीज पडून जी एक शिळा खालीं कोसळली ती नीट त्या गुहेच्या दारावर येऊन गच्च बसली ! आणि तेणें करून गुहेचें दार बंद झालें तेव्हां उघडच आंतील लोक तेथल्या तेथें अन्नपाण्याविणें प्राणास मुकले. !!

भट्टी बिघडली—एकास एक वक्ता म्हणतो १ वेदांची भट्टी बिघडली आर्य समाजानें. २ अस्तिक्याची भट्टी बिघडली इंग्रजी शिक्षेनें ३ देवळांची भट्टी बिघडली इंग्रजी बुटांनीं. ४ तरुणांची भट्टी बिघडली वेश्यांनीं ५ भले माणसाची बुज गेली पोलिसामुळें. ६ प्रजेची भट्टी बिघडली कर देण्यानें. ७जमीनदाराची भट्टी बिघडली टेनन्सी बिलानें. ८ भारतीय सरकारची भट्टी बिघडली, रुसच्या दबदब्यानें ९ डोळ्यांची भट्टी बिघडली चष्म्यानें १० समाजाची भट्टी बिघडली पोकळ भाषणांनीं ११ लिहिण्या पढण्याची भट्टी बिघडली, चाकरी न मिळाल्यानें. १२ हिंदुस्थानची भट्टी बिघडली, एकी नसल्यानें. १३ पुनर्विवाहपक्षाची भट्टी बिघडली पुढाऱ्याच्या भित्रेपणामुळें.
क. मि. इं० प्र०

दक्षिण हिंदुस्थानांतील जंगल रक्षक अधिकाऱ्यांस सुलसोईकरितां एक किंवा दोन हत्ती तैनातीस ठेवण्याची सरकारांतून परवानगी झाली आहे व तत्प्रीत्यर्थ त्यास ४,००० रुपये खर्च करण्याची मंजुरी देण्यांत आली आहे. इतक्या रुपयांत त्यांनीं एक किंवा दोन हत्ती ठेवावे. मोठमोठ्या दाट जंगलांतून फिरण्यास गाड्या घोडी बिलकुल उपयोगी पडत नाहीत म्हणून ही नवीन योजना केली आहे.

महादीची बायको.--डेलीन्यूज पत्राचा डोंगोला येथील बातमीदार असें कळवितो कीं, महादीच्या बायकोला पकडून कैद करण्यांत आले व तिच्या जवळ पुष्कळ संपत्तीही सांपडली आहे. महादी हा जें कांहीं द्रव्य मिळवी तें सर्व आपल्या बायको जवळ नेऊन ठेवीत असे. ह्याप्रमाणें तिच्याजवळ पुष्कळ संपत्ति असून ती एका उंच डोंगरावर राहत असे, त्या डोंगरी रस्त्यावर तिला तिच्या सर्व खजिन्यासह पकडण्यांत आलें.

विद्युतघातामुळें सिंकदराबाद येथें ले० सिमोर नांवाचे गृहस्थ १५ दिवसांखालीं मरण पावले त्यांचें प्रेत इंग्लंडांत त्यांचे आप्तांनीं मागविलें आहे ह्मणून शिशाच्या पेटीत घालून लवकरच तिकडे पाठविलें जाईल. हे गृहस्थ मोठ्या घराण्यांतले होते.
सु० प०

येत्या भाद्रपदमासीं कपिला षष्ठीचा योग आलेला आहे तर वैदिकधर्मी लोकांनीं ही अमोल पुण्यकाल पर्वणी व्यर्थ दवडू नये.

सदर्न मराठा रेल्वे कंपनीच्या एजंटानें असें सर्क्युलर [ वटहुकूम ] काढलें आहे कीं, ज्या कंपनीच्या नोकरास सरकारी सेविंग ब्यांकेंत आपल्या पगाराचा हिस्सा दरमहा ठेवण्याची इच्छा असेल त्यानें आह्मांस कळविणें, ह्मणजे आह्मी पगाराच्या तक्त्यांतून सदहू रक्कम वजा करूं. पैसा काढणें वगैरे ब्यांकेचे हक्क ज्याचे त्यास आहेत. ह्यांत कांहीं तरी इंगित असावें असें वाटतें.

ता० १० जूनचे मुंबई ग्याझेट पत्रांत एक चमत्कारिक बातमी फ्रांसिस [पारीस] येथील पत्राचे आधारें घेतली आहे, ती अशी कीं, नाना साहेब पेशवे यांचे चिरंजीव म्हणून कोणी एक श्रीमान गृहस्थ रशियन फौजेंत शिरला आहे. त्याणें आपलेकडे चांगल्या मिलिटरी अधिकाराचें काम घेतलें आहे.

काय नाना साहेब पेशवे यांचा हा मुलगा?

काय ब्राम्हणाचा पोर ! आपले इंग्रज सरकारा विरुद्ध?

आम्ही म्हणतों ही सर्व थट्टा असावी अगर हिंदुस्थानांतील ब्राम्हण राज भक्त आहे. त्यांचीं मनें इंग्रज सरकारापासून फाटलीं जाऊन त्यांनीं आपल्या नांवाचें गीत गावें म्हणून रशियन लोकांनीं ही टूम काढली असेल. आतां आम्हास स्मरतें कीं, श्री० नाना साहेब पेशवे सन १८५७ सालच्या दंग्यांत अध्वर्यु असल्याचा गवगवा बाहेर पडला तेव्हां त्यांस चिरंजीव होता खरा. पण त्याला रशियन सरकार साह्य देऊन हातीं घेतील ही कल्पना असंभाव्य आहे. त्यांत जर तो ब्राम्हण आहे, तर अटकेचे पार जाईल कसा! म. मि.

वर्तमानपत्रांतून ज्या बातम्या प्रसिद्ध होतात, त्या बातम्यांवर ज्या वर्तमानपत्रांतून त्या प्रसिद्ध होतात, त्या वर्तमानपत्रांचा कांहीं काळपर्यंत हक्क असावा अशा महसुलाचें जें बील कलकत्ता येथील कायदे कौंसिलांत आलें आहे, त्याचे कानु बहुतेक व्हिक्टोरिया, न्यूझिलंड वगैरे ठिकाणीं चालू असलेल्या कानूप्रमाणें ठरविले जातील असा रंग दिसतो.
पु० वै०

गेल्या शनवारी लार्ड री यांनीं कायदे कौन्सिलांत जें भाषण केलें ह्यावरून त्यांच्या कारकीर्दींत आमचें पाऊल थोडेबहुत पुढें पडेल अशी आशा उत्पन्न होतें आहे. परशत्रूपासून पीडा न होण्यासाठीं अवश्य लागणारा पैसा व वेळ त्या कामाकडे लावून, बाकीचा या देशांतील विद्या, व्यापार कला कौशल्य वगैरेकडे लावण्याचा त्यांचा जो निश्चय झालेला आहे, तो योग्य आहे.

शिपायाचें शहाणपण—एका श्रीमंत गृहस्थानें आपल्या खजिन्यावर पहारा करण्यास एक शिपाई ठेविला, आणि त्याला, पूर्वींच्या चाली प्रमाणें, तलवार बंदुक दिली. तो शिपाई, एका हातांत तलवार आणि दुसऱ्या हातांत बंदूक घेऊन एके रात्रीं पहारा करीत असतां, त्याच्या समक्ष एका चोरानें खजिन्याची पेटी फोडून त्यांतलें द्रव्य नेलें. ह्यावरून त्याचा यजमान त्यांस फार रागें भरला. तेव्हां ते शिपाई बावा त्यास म्हणाले, "महाराज काय करूं? त्या वेळेस माझे दोन्ही हात तलवार बंदुकीनें गुंतले होते, म्हणून माझा उपाय चालेना. नाहींतर मी चोराला दाखविलें असतें कसें काय तें?"
केसरी

विलक्षण प्रश्न-- एका संभावित बाईचा असा प्रश्न आहे कीं, पुरुषांस जसें द्वितीय संबंधाच्या वेळीं पुण्याहवाचन करतेवेळेस कणवटीस स्त्री ऐवजी सुपारी लावून बसतां येतें, तसें एखाद्या स्त्रीस पुनर्विवाहाच्या वेळेस गतधवापणाबद्दल आपल्या जवळ नारळ घेतां येइल काय? येत नसल्यास कां येत नाहीं? याचें उत्तर आपल्या प्रीय आश्रदात्यांतून कोणी देतील काय?

स्पेन देशांत पटकीं होऊं नये म्हणून देवी काढण्याच्या कृती प्रमाणें शिरामध्यें कांहीं औषध टोंचण्याची युक्ती काढली आहे. शहरांत पटकीची सांथ उद्भवली असतां सदरील औषधानें ज्यास टोंचल त्यास पटकीची बाधा झाली नाहीं, परंतु २ गृहस्थानीं आपणास टोंचून घेण्यास नाकारलें त्यांस पटकीचा उपद्रव होऊन ते मरण पावले असा अनुभव आला.

टेंपलचे काका—!अमृतबझार पात्रिकाकर्ते लिहितात कीं, दुष्काळ पीडित लोकानां द्यावयाचे माजिस्त्रेट मोठ्या उदारपणानें रीलीफ फंड पोंचवीत आहेत. पुरुषाला दोनपैसे आणि पोराला एकेक पैसा प्रत्येक वेळेला! यांत त्यांचे पोट भरून ते चार दिवस जगतीलच! सर रिचर्ड टेंपल साहेबांचे हे काका नव्हेत का?

पुणें बेळगांव लाइनीचें काम इतके झपाट्यानें चाललें आहे कीं. येत्या जानेवारीच्या सुमारास मिरज पर्यंत गाडी आणून पोहचवणार.

वृक्षांच्या दीर्घायुष्याविषयीं कांहीं आश्चर्यकारक गोष्टी ऐकीवात येतात. जर्मनीमध्यें एक गुलाबाचे झाड १००० वर्षांचे जुने व तें अजूनही कांहीं दगा न झाल्यास तितकीं वर्षें निदान राहील असें म्हणतात. मागच्या जुलई महिन्यात त्या झाडाला एक फांदी फुटली ती आतां ९फूट लांब वाढली आहे.

चेनिच बोथ नावाच्या एका मनुष्यास जन्मतःहात नाहींत, व तो आपल्या पायांच्या योगानें धनुष्य बाण मारतो, मासे पकडतो शिवण काम करितो असें म्हणतात.
ध० वृ०

एक पठाण आपले चुलत्याचे घरीं राहत होता. त्यास कांहीं काम नसल्या मुळें त्याची प्रीती आपले चुलत बहिणीवर जडली. तिची प्रीति आपणावर जडावी म्हणून त्यानें पुष्कळ प्रयत्न केला परंतु तो सर्व व्यर्थ गेला. त्यानें ही आपले प्रीतिची गोष्ट चुलत्यास कळविली. चुलत्यास फार राग येऊन त्यानें त्यास घरांतून हाकून दिलें. नंतर त्या पठाणानें अफू विक्याचे दुकानांतून एक तोळाभर अफू विकत घेऊन खाल्ली व आपले चुलत्याचे घरी येऊन झालेली हकीकत सांगितली. ह्यावरून पोलिसास लागलीच वर्दी देऊन त्यास जे. जे. इस्पितळांत नेऊन शुद्धीवर आणले त्याजवर आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप ठेवून मि. रैन साहेब यांनीं त्यास १ आठवडा साध्या कैदेची शिक्षा दिली.

बार्लिन येथें एक घर आहे त्यांत १३० कुटुंबांची चांगली सोय होते. म्हणजे १०२५ मनुष्यास त्यांत सोईनें राहतां येतें.
ने० स्रो०

नवा चमत्कार-- समुद्रांतील सगळें मीठ आणून पसरून ठेविलें तर ३० लाख मैल पसरेल आणि ढीग करून रचले तर अल्पस पर्वताहून पांचपट पर्वत मोठा होईल.
न्या. सीं.

कल्पक-- अमेरिकेंतील न्यूयार्क शहरीं हेलर नामक गृहस्थानें असा एक अंगरखा तयार केला आहे कीं, त्याचे खिसे प्रवासांत कान टोपीच्या ऐवजी उपयोग करितां येण्याजोगे आहेत. या अमेरिकन लोकांना युक्ति शिवाय कांहींच सुचत नाहीं.

एका उद्योगी फ्रेंचमनानें जगांतील राजांसंबधीं माहिती व हकीगत मिळविली आहे. ती येणें-प्रमाणें:-- आजपर्यंत ६४ राष्ट्रांवर २५, ४० बादशाहा व राजे झाले. या पैकीं ३०० पदच्युत झाले, ६४ राज्यें सोडून गेले २४ नीं आत्महत्या केली; १२ सबेड लागेल;१०० लढाईंत मेलें, १२३ दुसऱ्याच्या कैदेंत होते; २५नीं स्वमतार्थ प्राण दिले; १५१ मारले गेले व १०८ स शिक्षा होऊन मेले गेले.
श. सू.

राशियाचा बादशहा मध्य एशियाचा सार्वभौम असें म्हणविणार. चीन व इंग्रज यांना अवडेल काय?

कापसाच्या सरक्यांचे पीठ केलें तर पिठाच्या ऐवजीं त्याचा उपयोग होतो. व त्याच्या भाकरी ही होऊं शकतील. असें एका जाणत्याचें मत आहे.
सु. सिं.

नेत्र वैद्य--प्रसिद्ध गंगाबिसन लाला काल्पीकर नेत्रवैद्य यांचा पट्टशिष्य गणपत लाल नारायण मानभाव परोळेकर हे येथें बरेच दिवस झाले आले असून त्यांनीं येथील व बाहेरगांवचे शेंकडों लोकांचे डोळे दुरुस्त केले, व हल्लीं करीत आहेत. हे वैद्य गरीब लेकांचे डोळें, पैसा न घेतां फुकट दुरुस्त करून देतात, त्या मुळें गरीब लोक यांजकडे फारच येत असतात व आपले डोळे चांगले करून घेऊन आनंदानें आपलें घरीं जातात. यांनीं एका वाण्याचे मुलाचे डोळ्यास कांहीं रोग झाल्यामुळें डोळ्यास अगदीं दिसेनासें झालें होतें, त्या डोळ्यास शस्त्रोपचार करून डोळ्याचा खालचा व वरचा भाग कांपून काढून डोळ्याचें बुबूळ बाहेर काढलें, व मध्यें कांहीं रोग होता तो शस्त्रानें कापून काढून व औषधोपचार वगैरे करून बुबूळ जशाच्या तसाच बसवून कापलेला वरचा व खालचा भाग शिवून वर औषधाचा पाय बांधून दिला व त्यास घरीं परत पाठविलें. व आठ दिवसांनीं डोळा चांगला होऊन तो दाखविण्यास वाणी मुलास घेऊन वैद्याकडे आला होता डोळा चांगला झाला असें पाहून मुलास परत नेण्यास सांगितलें. या प्रमाणें शेंकडों लोकांचे डोळे दुरुस्त होतात हे वैद्य दोन चार दिवसांत पारोळ्याकडेस जाणार आहेत असें सांगतात.
आ० व०

अडीचशे रुपयांच्यावरच्या पगारांच्या चाकऱ्या सेक्रेटरी आफ स्टेट यांची परवानगी घेतल्या शिवाय कोणास देऊंनयेत असा सरकारचा ठराव झाला आहे असें कळतें.

---

☞ हें पत्र अकोला येथें के.वा. खंडेराव बाळाजी यांचे 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची आगाऊ रु० ५ डाक हांशील ०।१३
सहामाही ,, ३ ,, ,, ०८
वाक थकेर ,, ७ ,, ,, १।८
किरकोळ अंकास..................०४

ओळिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ०।०४
दुसरे खेपेस ........०३

SUBSCRIPTION RATES.
Rs
Per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 „ 1 8as
Six monthly.......... 3 „ 6 as
single copy.......................... 4 as

Advertisements
Below 10 lines......2Rs
Per line over 10......4as
Repetition per line...8as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XIX — AKOLA — MONDAY — JUNE 29 1885 — NO 25

पुस्तक १९ — अकोला सोमवार तारीख २९ माहे जून सन १८८५ इ० — अंक २५

## पक्षकार लोकास उपयोगी माहिती.

रा० रा० रामचंद्र दाजी नगरकर बी.ए एल. एल. बी. मुंबई हायकोर्टाचे वकील, हे सध्यां वऱ्हाडांत आले आहेत. हे मोठ्या वराण्यांतील असून हुषार, व अनुभवशीर आहेत. यांचे हातीस वऱ्हाडसमाचार छापखान्याशेजारी काळे मारुती जवळ आहे. वऱ्हाडांतील लोकांनीं हाडें अवश्य कष्ट घ्यावें अशी आमची त्यांस सूचना आहे.

तारीख ९ माहे दिसेंबर सन १८८४ } पत्रकर्ते

DR. G. V. KHOT'S SPECIALITIES.

1. SYRUP of ROSES 2. SYRUP of LEMONS SYRUP of POMEGRANATES 4. SYRUP of ORANGES 5. SYRUP of GRAPES

All the above Syrups, being of the finest quality, and containing only the extracts of the juice of the respective flowers, and fruits may be confidently relied on so possessing all the cooling properties for which these syrups are so justly appreciated in tropical climate. The proprietor, aware of the many objections persons have to inferior specimens of these syrups sold in the market consequent on their bad smell and taste, begs to state that every pain and precaution is taken to make the above syrups as palatable and agreeable as syrups ought to be. These syrups form a light, agreeable, highly cooling, as well as delicious drinks in warm weather whilst the entire absence of any heating or stimulating properties so much complained of in other kinds of drinks renders them for general use very preferable.

Dose —2 to 3 table spoonfuls of any kind of syrups in a cup full of water makes a delicious cooling draught.

The Proprietor also states that he has opened in this town a manufactory on a large scale for the preparation of these syrups and traders are requested to send in their orders.

Prices.

Syrup of Roses...Rs. 9 per Dozen Quarts.
" Lemons .........Rs. 9 "
" Pomegranates Rs. 9 12 "
" Oranges ...... Rs. 10 8 "
" Grapes......... Rs. 12 "

Commission Rs. 8 per cent for cash remitted with order.

Annas four for box and packing per dozen extra.

Amraoti, March 1st, 1885

Address

To

G. V. Khote Amraoti.

## रेलवे संबंधीं अगत्याच्या सूचना.

(लिहून आलेला मजकूर)

आज आमच्या देशांत रेलवे होऊन बरींच वर्षें झालीं. इतक्या अवकाशांत व्यापारांत विलक्षण तेजी येऊन चोहोंकडचा पाहिजे तो माल व माणूस थोड्याखर्चानें व थोड्या श्रमानें पाहिजे तिकडे नाऊं येऊं लागला आहे. रेलवे झाल्यानें भाडेकरी वगैरे यांचें फार नुकसान होईल असा प्रथम आमच्या लोकांचा समज झाला होता; व तसा समज होणें साहजिक आहे. पूर्वी या प्रान्तांत व्यापारी लोक मुंबई व नागपुराकडून बैल गाड्यांनीं सर्व माल आणीत असत. व ते आपल्या मालाची पाहिजे तशी किंमत सांगत असत; कधीं कधीं मूळ खरेदीच्या दुप्पट देखील त्यांच्या मालाची किंमत द्यावी लागत असे. परंतु रेलवे झाल्यानें भाडेकरी लोक व व्यापारी यांची प्रथमतः अगदीं नाउमेद झाली. आतां अनुभवांतीं अगदीं उलट उलट परिणाम दृष्टीस पडत आहेत. बहुतेक सर्व मोठ मोठीं स्टेशनें आरंभी गांवांपासून दूर केलेलीं असून हल्लीं तीं स्टेशनें आणि गाव यांच्या दरम्यान भाडेकरी, हमाल, व व्यापारी यांची वस्ती होऊन तीं भरवस्तीत आहेत असें भासूं लागलें आहे. धामणगांव बडनेर, उमरावती, मूर्तिजापूर, अकोला, शेगांव इत्यादि ठिकाणची पूर्वींची व सांप्रतची स्थिति यांकडे विचार पूर्वक अवलोकन केलें असतां दिसून येतें कीं, आमचा पूर्वींचा समज खोटा होय. कारण भाडेकरी व ओझेवाले यांचा उद्योग बसला नसून तो इतका वाढला आहे कीं, किंबहुना वेळां त्यांच्यानें तो उरकत नाहींसा होतो. अलीकडे आकोल्याहून वाशिमापर्यंत रेलवे करण्याचा विचार ठरल्याचें ऐकून त्या रस्त्यानें भाडे वाहणाऱ्या लोकांस 'असें करूं काय करूं' असें झालें आहे. परंतु कालगतीनें त्यांची चिन्ता निरर्थक होय असें दिसून येईल.

रेलवेच्या योगानें जसा आम्हांस तसाच तिच्या उत्पादक कंपनीस ही पण फायदा झाला आहे. सालोसाल नवींनवीं स्टेशनें उभारणें, मुख्य रेलवेस फांटे जोडून आसपासच्या मोठमोठ्या व्यापाराच्या गांवापर्यंत ते वाढविणें, सिंगल लाईनची डबल करणें इत्यादि गोष्टी कंपनीस होत असलेल्या नफ्याच्या सूचक आहेत. असें कोण म्हणणार नाहीं? तात्पर्य सुखसोय आणि द्रव्यलाभ उभयतांस ही होत आहे. रेलवेच्या उत्पन्नाच्या बाबी मुख्य दोन आहेत, एक प्यासेंजर ट्राफिक व दुसरी गुड्स ट्राफिक म्हणजे उतारू लोक व माल. यांत मालापासून फायदा अधिक होतो हें उघडच आहे, तथापि प्यासेंजर ट्र्याफिक ही अतोनात वाढत आहे यांत संशय नको. पूर्वी अहोरात्रींत एक जाणारी व एक येणारी अशा दोन प्यासेंजर गाड्या असतां जशी गर्दी होत असे तशीच किंबहुना थोडी जास्त गर्दी हल्लीं दोन जाणाऱ्या व दोन येणाऱ्या गाड्या असतांना होते. यावरून प्यासेंजर ट्राफिक सतत वृद्धि पावत आहे हें निर्विवाद आहे. अतएव उत्पन्नाच्या मानानें प्यासेंजर व गुड्स यांजविषयीं जितक्या अधिक सोई करवतील, तितक्या करणें हें कंपनीचें मुख्य कर्तव्य होय. सांप्रत रेलवेनें जाण्या येण्याच्या किंवा माल नेण्या आणण्याच्या सर्वच गैरसोई आहेत असें आम्ही म्हणत नाहीं. तथापि अद्याप पुष्कळ गोष्टी करावयाच्या असून सहज होण्या सारख्या आहेत.

पहिल्या व दुसऱ्या क्लासच्या प्यासेंजर लोकांकरितां प्रत्येक प्यासेंजर ट्रेन बरोबर बरेच डबे असून बहुधा ते रिकामे असतात; यावरून त्या क्लासचे उतारू कमी असून उत्पन्न ही कमी होत असलें पाहिजे, हें उघड आहे. अतएव प्यासेंजर गाडीपासून कंपनीस जें उत्पन्न होतें, त्यां पैकीं बहुतेक तिसऱ्या क्लासच्या उतारूं पासून होतें, हें ही उघड आहे. असें असून पहिल्या व दुसऱ्या क्लासच्या उतारूं करितां डबे चांगले, स्टेशनावर उतरले नाहीं तों त्याचें सामान सुमान उचलण्या करितां हमाल तयार, सुंदर खाशी वेटिंगरूम इत्यादि अनेक गोष्टी असतात; पण तिसऱ्या क्लासच्या उतारूं करितां काय आहे? मोठमोठ्या स्टेशनावर मात्र यांच्या करितां आवडधोवड वेटिंगरूम्स आहेत. परंतु लहान लहान स्टेशनावर तिसऱ्या क्लासच्या उतारू लोकांकरितां लहान वेटिंग रूम्स कां नसाव्यात! आमचे मतें प्रत्येक स्टेशनावर तेथील प्यासेंजरांच्या संख्येच्या मानानें लहान मोठी वेटिंगरूम असणें जरूर आहे.

वेटिंगरूम प्रमाणेंच प्रत्येक स्टेशनावर गुड्स- शेड असावी मग ती किती कां लहान असेना. व्यापारास तेजी आली. म्हणजे व्यापारी लोकांची खरेदी लहान मोठ्या सर्व खेड्यापाड्यांतून देखील झपाट्यानें चालत असते. हा सर्व माल जवळच्या स्टेशनावरून रवाना होण्याकरितां जात असतो. मागें सोलापुराकडे दुष्काळ पडला, तेव्हां आमच्या वऱ्हाडांतील सर्व स्टेशनांवरून दाण्याचीं हजारों पोतीं उघड्यावर पडलीं होतीं. दुष्काळाचे प्रसंग वारंवार येत नसतात, हे जरी खरें आहे तरी पण दरसाल हंगामाच्या दिवसांत लहान स्टेशनांवरून माल अगदींच जात नसेल, असें आम्हांस वाटत नाहीं. तात्पर्य कीं, प्रत्येक स्टेशनावर तिसऱ्या क्लासच्या उतारू लोकांकरितां वेटिंगरूम आणि गुड्स शेड या दोन्ही गोष्टी अत्यावश्यक होत.

हल्लीं प्यासेंजर गाड्यांपैकीं कित्येकांत पायखान्याची सोय आहे, तशी सर्व गाड्यांतून होणें रास्त आहे. प्यासेंजर गाड्या स्टेशनावर फार थोडा वेळ उभ्या असतात. तितक्या वेळांत दीर्घशंकेविषयीं बोलूंच नका. पण लघु शंका देखील करण्यास फुरसत होत नाहीं. म्हणून प्रत्येक डब्यांत वर सांगितले प्रमाणें तजवीज पाहिजे आहे, असें आमचें मत आहे.

प्यासेंजर लोक मोठ्या आकाराच्या डब्यांत एकाशीं एक खेटून बसले असतां सरासरी १० पर्यंत मावतात. ही संख्या थंडीच्या दिवसांत योग्य आहे; परंतु वऱ्हाड प्रांता सारख्या उष्ण प्रदेशांत असें खेटून बसणें किती त्रासदायक आहे, याचें वर्णन करण्यापेक्षां कल्पनाच केलेली बरी. तरी दर डब्यांत उन्हाळ्याच्या दिवसांत चाळीसांवर मनुष्यें बसवूं नये अशी ताकीद प्रत्येक स्टेशनमास्तरास झाल्यानें फार सोय होईल, हें सांगणें नलगे.

वेटिंगरूमचा उपयोग कोणी, केव्हां आणि कोठवर घ्यावा या बद्दल कंपनीचे नियम असतीलच; परंतु प्यासेंजर लोकांस त्या नियमाची उघड रीतीनें व सहज माहिती होण्यास सांप्रत कांहीं एक तजवीज केलेली आढळत नाहीं, कां नसावी! आमचे मतें ज्या प्रमाणें टाईम टेबलावर गाड्यांचा वेळ आणि दर लिहिलेले असतात त्याच प्रमाणें वेटिंगरूम मध्यें एका नोटीस बोर्डावर तिच्या संबंधीं जे कंपनीचे ठराव असतील, ते स्पष्ट लिहिलेले असावे.

सांप्रत मोठमोठाले सरकारी कामदार व व्यापारी हे पहिल्या व दुसऱ्या क्लासचे प्यासेंजर असतात. परंतु यांची संख्या फार थोडी असल्यानें सदरील डबे बहुतेक रिकामे असतात. मिडलक्लास प्यासेंजर म्हणजे ५०-१०० रु० पगाराचे नोकर, तसेच व्यापारी व सुखवस्तु लोक हे दुसऱ्या क्लासचें भाडें देण्यास असमर्थ किंवा नाखुष असतात; तथापि कुली, मजुरदार, महार वगैरे कमी योग्यतेच्या लोकांशीं मांडी लावून बसण्यास खुष असतात असें नाहीं. परंतु इकडील रेलवे मध्ये यांच्या करितां विशेष तजवीज नसल्यानें त्यांस हलक्या प्रतीच्या लोकां बरोबर तिसऱ्या क्लासच्या डब्यांत बसणें भाग पडतें. कंपनीनें मनावर घेतल्यास कांहीं खर्च न पडतां या मिडल क्लास प्यासेंजरांची सोय कंपनीस करितां येईल. ती अशी कीं प्रत्येक प्यासेंजर गाडी बरोबर तीन इन्टरमीजिएट A यट क्लास गाड्यां जोडाव्या, एक बायकांकरितां व दोन पुरुषांकरितां. व या क्लासचा दर मैलीं पूर्ववत चार पै ठेवावा असें केल्यानें पहिल्या व दुसऱ्या क्लासचे उतारू कमी न होतां, सांप्रतच्या तिसऱ्या क्लासच्या उतारूं पैकीं बरेच उतारू इन्टरमिजिएट क्लासचे होतील; व कंपनीस बिलकूल खर्च नपड-

ला उत्पन्न मात्र वाढलें.

सन १८८३ त तिसरा व चवथा वर्ग मोडून त्याबद्दल एक तिसरा वर्ग कंपनीनें काढिला त्यावेळेस आम्ही सूचविलें होतें व आतां पुन्हां सूचना करीत आहों तर इकडे सरकारानें लक्ष देऊन योग्य विचार लवकर केल्यास लोकांस फार सुखावह होईल.

वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ट वद्य २ शके १८०७.

## डिपार्टमेंटल परीक्षा.

आमच्या वऱ्हाडप्रांतीं बरेच वर्षांपासून डिपार्टमेंटल परीक्षा म्हणून चालू कायदेकानु वहिवाटीसंबंधीं दरवर्षी परीक्षा होत असतात. ही परीक्षा चालूं सालींही होणार आहे. या परीक्षेपासून परीक्षा पास झालेल्या पुरुषांस उपयोग काय या बद्दल बरेच काळापासून आम्ही शोध करीत आहों. पण अजून चांगलासा थांग लागला नाहीं. या परीक्षेत कांहीं दरजाचे सरकारी नौकर व एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर वगैरे प्रतीचे आफिसर हे उमेदवार असतात, हें आमचे वाचकांस माहीत असेल. कोणी म्हणतात कीं या परीक्षेचा दाखला मिळाला म्हणजे क्लार्क आफ्‌कोर्ट व वरिष्ट प्रतीचे आफिसरचे हुद्दे मिळतात, बढती मिळते, व आहे ते, हुद्दे कायम होतात- क्लार्कआफ्‌कोर्टचे हुद्यापावेतों हे नियम लागूं असतील तर असोत व परीक्षा झालेली नाहीं म्हणून जागा देण्यास मार्ग नाहीं अशा प्रकारचीं उत्तरें ज्यास जागा देण्याची इच्छा नाहीं त्यांस देण्या पुरताही उपयोग होत असेल. पण त्या पलीकडे याचा कितपत उपयोग आहे हें समजत नाहीं. वरिष्ट प्रतीचे हुद्देवाल्यांस किंवा हुद्यांस हे लागूं आहेत किंवा मुळींच नाहींत याची आम्हांस शंका दिसते. कारण एक्स्ट्रा असिस्टंट, असिस्टंट कमिशनर व त्याची वगैरे हुद्दे मिळण्यास परीक्षा लागत नाहींच. या जागा मिळाल्यावर ही दोन दोन चार चार वर्षेपावेतों लोअर स्टांडर्डचीही परीक्षा न उतरलेले एक्स्ट्रा असि० कमिशनर पाहण्यांत आहेत. हायर स्टांडर्ड न उतरल्यानें असिस्टंट कमिशनरची जागा मिळते व कायम होते. असिस्टंट कमिशनरचा हुद्दा लोअर स्टांडर्डची परीक्षा पास होण्यापूर्वी मिळण्यास प्रतिबंध होत नाहीं. आमच्या समजांत चूक असल्यास आम्ही माफी मागूं. नसल्यास आम्हांस वाटतें कीं या मोठ मोठे हुद्देदारांस ह्या परीक्षेस जाण्याची तसदी अर्जीदूर केल्यास त्यांस फार सुखावह होईल.

या परीक्षेचा अर्थ आम्ही असा समजतों कीं, जें काम ज्याकडून घेण्याचें तें त्यास करण्याचे आवश्यक गुण त्याचे आंगीं आहेत कीं नाहींत हें पाहणें आहे; आणि हें आरंभीं पहाणें सयुक्तिक आहे. पण वर्षानुवर्षे लोटल्यावर पुढें पहाण्यापासून, उमेदवार जरी उतरला अशी कल्पना केली तरी, काय सिद्ध होतें? जें काम ज्यावेळेस त्याजकडे सोंपविलें त्यावेळेस तो त्या कामास लायक होता असें ठरत नाहींच. लोअर स्टांडर्डची परिक्षाही कांहीं अशा मोठ्या हुद्देदारांची दोन दोन तीन तीन वर्षे पास होत नाहीं. आणि दरम्यान त्यांचे हातीं दिवाणी, फौजदारी, मुलकी कामें दिलेलीं असतात व ते हजारों मुकदम्याचे फैसले करतात. लोअर स्टांडर्ड फार कठिण आहे असें नाहीं. नेहमींचेच वापरांतील कायदे कानू वगैरेची परीक्षा आहे. ही ज्यांची दोन वर्षे पास नाहीं त्याचे दरम्यानचे वेळांतील केलेले कामाची काय योग्यता? कितीं लोकांचें नफा नुकसान, न्याय अन्याय या गृहस्थांचे हातून झाले असतील! या बद्दल जबाबदार कोण? महापंडितांनीं केलेले पिनलकोड, क्रिमिनल प्रोसीजर कोड वगैरे कायदे अशा लोकांचे हातून कितपत खऱ्यात वानें अमलांत येत असतील या विषयीं आम्हांस थोडी शंका आहे. दोनचार वर्षे लोटल्या नंतर तरी जी म्हणून अवश्यक परीक्षा समजली जाते ती देखील टाळली तरी चालतें असें म्हणण्यास आम्हांस आधार आहे. सुमारें चार वर्षे सतत लोअर किंवा हायर परीक्षा न उतरल्या मुळें एका एक्स्ट्रा अ० कमिशनरास राजीनामा देण्यास लाविलें असें उदाहरण घडल्याचें ऐकतों. ही गोष्ट खरी असल्यास त्यानें दरम्यानचे कालांत केलेले कामास तो नालायकच होता हें सिद्ध होत आहे. पण त्यानें कामावर असत हजारों फैसले केले आहेत. त्यांजकडून पुष्कळांचे अन्यायानें किंवा अज्ञानानें नुकसान झालें असेल व शिक्षा मिळाल्या असतील त्यांची काय वाट? अशा मनुष्याची दाद कोणी घ्यावी? या गृहस्थास ज्यावेळेस दूर केलें किंवा दूर होण्यास सांगितलें त्या वेळेस तो आरंभा पेक्षां ज्यास्ती हुशार असलाच पाहिजे. पण चार वर्षांचे अनुभवा अंतीं जो नालायक ठरतो तो आरंभीं कितपत लायक असावा हे सांगण्याची तादृश जरूर दिसत नाहीं.

पण ध्यानांत ठेवण्याजोगी दुसरी गोष्ट अशी आहे कीं या वरिष्ठ प्रतीचे नेमणुकींत जसा सढीलपणा आहे. त्याचे विरुद्ध प्रमाणानें इतर बाबदींत सक्ती आहे. उदाहरणार्थही शाळा खात्यांत सहा रुपयांची जागा चौथी इयत्तापास झाल्यावांचून मिळत नाहीं. नकलनवीसास देखील परीक्षा ठेविली आहे. जज्जाची परीक्षा झालेली नसो पण त्याचे पुढें मुकदम्याचें काम चालविण्यास परीक्षा पास झालेला वकील पाहिजे, हल्लींचे नियमा प्रमाणें, वऱ्हाडांतच पास झालेला वकील पाहिजे; मुंबईचा एल्. एल्. बी. असला तरी तो चालत नाहीं. जर वकील कायदे जाणता पाहिजे तर जज्ज कायदे जाणता नको काय? अंमलदारांत मात्र हा उलटा न्याय कां हें समजत नाहीं.

याचें एकच उघड कारण दिसत आहे कीं अमलदारांच्या नेमणुका विशेषतः शिफारशीवरून होतात, त्याचे लायकी नालायकीचा त्या कामांत विशेष संबंध नसतो. आमचे बुद्धीनें या बाबदींत चालूं प्रकारा उलट प्रकार पाहिजे. म्हणजे नकलनवीस कारकून, शिरस्तेदार हे परीक्षा उतरलेले असण्यापेक्षां अधिकारी परीक्षा उतरलेले असण्याची जास्ती अवश्यकता आहे. मुळींच वकील नसला किंवा अज्ञान असला आणि जज्ज जर आपल्या स्थानास लायक असेल तर लोकांचे विशेष नुकसान नाहीं, कारण कर्तव्य अकर्तव्य त्याला समजेल. पण बाकी सर्व यथा योग्य असून जज्ज अयोग्य असल्यास काय उपयोग? पदोपदीं अन्याय होण्याचा संभव राहतो. हल्लींच्या या अव्यवस्थेस किंवा व्यवस्थेस दुसरें कारण कीं लोकांस अद्यापि आपले हक्क समजत नाहींत व आपली दाद लावविण्याची योग्य साधनें त्याजवळ नाहींत. मुंबई इलाख्यासारख्या ठिकाणीं हा प्रकार चालला नसता.

आम्ही लोकांचे तर्फे आमचे स्थानिक सरकारास विनंती करतों कीं या बाबदींत व्यवस्था व सुधारणा होणें फार जरूर आहे; व तिकडे लक्ष देण्याची वेळ आतां येऊन पोंचली आहे. ही व्यवस्था करण्याचें विशेष कठीण नाहीं. जसे ठरविलेली अमुक परीक्षा झाली असल्यावांचून सरकार कोणास वकीली करूं देत नाहीं तशाच रीतीनें दरएक हुद्यास योग्य परीक्षा ठरवून ती पास झाल्या वाचून तो हुद्दा कोणास देऊं नये. मुंबईइलाख्यांत आतां सबार्डिनेट जज्जाच्या जागा शिफारशीनें मिळत नाहींत परिक्षाच द्यावी लागते. तसा नियम येथें लागूं केल्यानें येथें ही शिफारशी सहज बंद होतील, सरकारास लायक अमलदार मिळतील, आणि वशीला असल्यामुळें त्यांचेच जोरावर बडे लोकांचे चिरंजीव हल्लीं हुद्देदाराच्या जागा मिळवितात व विद्या संपादन न करितां जसे बसतात व आळशी होतात तसे न राहतां ते अधिक शहाणें होतील व लोकांवर अधिक उपकार करूं शकतील.

The Berar Samachar

MONDAY, June, 29, 1885

### THE FALL OF THE GLADSTONE MINISTRY.

The public press in India and the people generally, who interest themselves in the political progress of this country, regret the fall of the liberal Ministry at a time which is so peculiarly critical to India. Although Indian affairs have not, generally speaking, been made mere party matters, still we had much to incline ourselves to the liberal Ministry being in power in England at this time. Whatever may have been Mr. Gladstone's intention and that of his colleagues, in throwing up the reins of Government at this time, whether it be to shield themselves against the ignomineous results of their much decried foreign policy, or whether it be to prove the incapacity of the members of the Opposition to form a Cabinet, and then come back again with redoubted advantage to govern the country, we can safely say that we are peculiarly unfortunate in the change of the Ministry just now. In the new Ministry, we are assured Lord Salisbury is the Premier and Lord Randolph Churchhill Secretary of State for India with Lord Harris as under-secretary. With two such men, the first claiming the post he now fills in the new ministry on the score of his recent tour in India, and the second by his being a very good cricket player in England, at the head of the Indian affairs, we can hardly doubt that the plant of Local Self Government will suffer from the withering influence of the Conservative party and its numerous adherents and followers, the official bureaucracy of India. So long as the new born Ministry retains office, very little hope will be entertained with regard to any salutary changes in the management of Indian affairs, necessary for the progress of enlightenment of the people in India. With a decided minority in the House of Commons the retention of office would be very difficult indeed for the leaders of the Conservative party, but supposing they do, the time during which they retain office will be a time of considerable anxiety to the people of this country.

In the Hyderabad Assigned Districts, of course the change would not matter much; but we suppose that the young gentlemen of 'light and leading' who have come to Berar of late from Bombay side, would regard the change with some importance. It is the views of these men that we happen to represent here.

### THE BERRAR ADMINISTRATION.

(continued from our issue of 15th) June 1885.

By the celebrated treaty of 1853, the Nizam ceded in trust, districts yielding a gross revenue of fifty lacks of Rs. to the British Government. Thus the province of Berar is a trust property, committed to the charge of the British Government, to be managed in the beneficial interest of the Nizam. From the very nature of the charge entrusted to their care it may appear to unthinking minds, and to a certain extent, justly so, from the capricious proceedings of the Local Government, that there does not exist any reason why the British Government should feel a permanent interest, in the discharge of their trust. But considerable care and wisdom, which seem to characterrize the whole administration, may in themselves prove the futility of this objection likely to be raised against the British management. Though there are several defects and short-comings in the mode of administration, such as it is at present, it can be asserted without any fear of contradiction, that it has, on the whole, proved prosperous and beneficial to the subject population.

When the British Government assumed the administration of the province, it was in a state of considerable mis-management. The finances were in an embarrassed condition; people were sunk in nitter ignorance; means of communication were very defective: security of life and property was rather precarious. These evils were, to a great extent, heightened by the political agitation of 1857. In those troubled times it was imperatively necessary for the preservation of peace and order, taht the province should be officered by

men of military experience and strategic talents. Hence the necessity and propriety of appointing military officers in the management of the province. But those circumstances are now quite changed. The light of western civilization has spread even to the remotest corners of the province. ducation has made, and is makir rapid progress. Commercial and in strial activity has considerably in ased.

'In sh t, the aterial and intellectual in rovement of the province, since t introduction of the British rule has been most striking. This vast change in the past circumstances necessitates, as a matter of course, a corresponding change in the system of administration. The appointments of colonels and majors to those high and responsible posts, which require a degree of intelligence and extensive information, which was once a bare necessity; now mars the usefulness of those posts, enfeebles the efficiency of the administration, and creates a stagnation in it. Hence it naturally follows, that all such important offices in the judicial and revenue branches should be bestowed upon men of culture and learning; but the two highest offices at the head of these two branches of the administration, ie of judicial and revenue Commissioners, must, at least, be specially reserved for civilians of Conspicuous abilities and talents. The legitimate duties of these high officers in the Commission are really very important. (1) efficient control over, and proper examination, of the work of deputy Commissioners and their subordinates; (11) conception and execusion of new schemes and reforms; organizations of new systems of government; construction of works of public utility (111) Veting the high handed policy of the Local Government. These and other functions of high importance constitute the proper sphere of their duties.

From the nature of these multifarious duties of high order which these functionaries are required to perform, it can readily be perceived, what an amount of mental and moral strength is necessary for the due discharge of these duties.

The successful and vigorous administrations of distinguished civilians like messers A.C. Lyall, A.P. Howell, and W.B. Jones, clearly illustrate the truth and importance of the above mentioned observations. Several reforms and changes initiated by them, and carried out by their successors, bear a strong testimony to their high administrative capacities, and intellectual eminence.

(to be continued.)

## THE GRAIN MARKET AT ...RAOTI.

The Amraoti Municipality lately decided to build a Grain ket. For the past few years, has been a Cotton Market at Amr. and it was supposed that it would be convenient for those dealing in grain to have all the grain coming to the city for sale, concentrated at one place. The proposal first came, very naturally from some European gentlemen, dealing in the grain trade and as it was considered by the members as not only unobjectionable but as a highly expedient one, it was decided to erect buildings for the Grain Market. The object of the Market is no doubt a very good one; and it is as much in the interest of the sellers, as in that of the buyers to have it; but we hope that in the end it may not prove to be a source of trouble and distress to those that come to sell their goods there. If we have to state the plain facts in connection with the Cotton Market at Amraoti, we know we shall have to bring to light many facts unpleasant to those concerned in that trade; but we are not this day prepared to support all those statements by facts which we can put before any Court as reliable evidence, but we can safely say this much that these are reports from those that sell cotton, that the dealings on the part of the buyers are more or less unfair. The cotton is not weighed at the Cotton Market and this lies at the bottom of all the mis-chief. There are weighing 'tucks' in every compound, owned by a European firm; and when the rate is settled in the Market, the cart loads of cotton are taken to the 'tuck' of the buyer. In the Cotton Market itself the poor Kunbi is not fleeced much beyond a quantity of cotton which is intended as sample but which is in fact enough to form three samples. This is, of course, a privileged gain of the buyers; but the greatest mischief is when the sellers get their cotton weighed at the 'tucks.' How so ever carefully the cotton may have been weighed by the Kunbi ryot at his villages, still he wonders to find that somehow or other his 15 maunds come to 14 maunds at the 'tucks.' Whosoever may be responsible for these tricks, it is certain that those who are so responsible are never taken to task and thus matters go on with impunity. We have heard of half a dozen more ways in which the Kunbi finds himself a loser, and as many counter-ways that the Kunbi is compelled to resort to, in order to counterbalance the loss they suffer. But we have nothing to do with tnese minor details, our point is, that as their is ground for complaint to people that come to sell cotton in the Market at Amraoti, on account of the measuring 'tucks' not being in the compound, so also the people that may here after come to sell grain at the Grain Market, may also have some ground of complaint on account of the evil mentioned above. And what we think is very likely to happen, supposing the present grievance with regard to the Cotton Market is not simply an imaginary thing, but an actual fact, is that the same grievance will there be with regard to the Grain Market business. And the reason is this: there is a rule in the proposed byelaws with regard to the Grain Market, that any too members of the Grain Market Committee might go and detect any false weights &c. in the compound of the Grain Market; curiously enough, however, there is no byelaw as to the place where the grain should be measured. If there is no mention in the rules as to the necessity or otherwise of all the grain at the Market being measured there and then, of course it is left to the option of the buyers where they should weigh grains; and evidently if they find they have this much liberty, they would take the grain 'to their respective shops' or godowns; and in that case it would become impossible to find out any sort of cunning or underhand dealing on the part of the buyers or the measures. How are the members to detect any evil ways, if there be any, of those whom the byelaw is inteuded to keep in awe? Thus unless, any such rule of the grain being weighed at the Market itself, be put in, we think that it will not at all be feasible to detect and punish the offenders; in which case the Grain Market will be as much feared as its opprobrious cousin. the Cotton Market at Amraoti. We are aware that the very proposal of the insertion of any such rule would ruffle many vested interests; and great opposition might be counted upon even, from some of the members of the Municipality itself, with regard to the final adoption of the rule. The one great objection the buyers can raise is, that it would be inconvenient for them to have all the grain measured at the Market and that they would have to carry the grain to their godowns at their own expense; but all this might be avoided by contracting with the sellers that they must put the grain at the go downs after being measured. This will occasion a reloading of the carts no doubt; but then the advantage to the seller will be so great. We have therefore to suggest to the Municipality of Amraoti that they should think of an insertion of a byelaw as regard the measurement of the grain at the Market, in the new Code that is being framed. We believe there are hardly any amongst the municipal members who know the possibility of the mischief that may be caused by the omission of any such rule; & being afraid lest the Kunbis might be left entirely unrepresented, we have sketched, for due consideration in time, the outlines of the evils to which they would be liable by the omission of the desired byelaw.

## वऱ्हाड.

हवामान—ह्या आठवड्यांत मुळींच पाऊस आला नाहीं एक दोन वेळां थोडीथोडी बुरबुर आली होती. शेतकरी लोकांचे मेघ राजाकडे डोळे लागले आहेत. पेरण्या सुरूं आहेत. रोगराई म्हणण्यासारखी नाहीं.

ता. १ माहे जून सन १८८५ इ. चे रेसिडेन्सी ऑरडरवरून झालेल्या वऱ्हाडांतील नेमणूका:—

मि. सय्यद अमजुद्दिन स्पेशल माजिस्टेट थर्ड क्लास यांस एलिचपूर तालुक्याचा अधिकार मिळाला.

पोलिस आफिसरांच्या बदल्या. मि. एच. एफ् कॉट ग्रेव्ह डिस्ट्रिक्ट पोलिस सुपरिन्टेन्डट थर्ड ग्रेड यांस एलिचपूरांस व मि. इ. ए. हॉबसन आ० डिस्ट्रिक्ट सुपरिन्टेन्डट फोर्थ ग्रेड यांस वणीस आणि मि. ए. फ्रेझर आ. डिस्ट्रिक्ट सुपरिन्टेन्डन्ट यास बुलडाण्यास नेमिले.

निजाम स्टेटरेलवेकडील इंजिनिअर व लोकोमोटिव्हसुपरिन्टेन्डेट मि. ए. मॉरटन् यांस ते घेतलि त्या तारखे पासून एक मार्हन्याची प्रिव्हिलेज लीव्ह मिळाली.

मि. एम. जे. स्कोबी एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर फोर्थ ग्रेड यांची बदली पूर्व हाडांतून पश्चिमवऱ्हाडांत झाली.

गेल्या शनिवारी संगीत नाटककार मंडळीनें संगीत शाकुंतल नाटकाचा प्रयोग करून दाखविला. या प्रसंगीं गांवोगांवची मंडळी बरीच आली होती. व गर्दी फार झाल्यामुळें नाटककारांस चांगली व्यवस्था ठेवता आली नाहीं. शाकुंतलेनें आपला भाग फार चांगला बजाविला. त्याच प्रमाणें दुष्यंतानें ही आपलें काम बरेंच बजाविलें बाकीचीं पात्रें साधारण आहेत. सारांश नाटकाचा प्रयोग बराच साधला होता.

आजरात्री मेहरबान डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रकशन यांचे बंगल्यांत सदर्हू मंडळीचा संगीत सौभद्राचा प्रयोग होणार आहे. या प्रसंगीं मोठ मोठाले यूरोपियन व नेटिव्ह कामदार येणार आहेत.

गेल्या आठवड्यात मेहरबान सानीटरी कमिशनर साहेब यांची स्वारी उमरावतीहून अकोल्यास येऊन परत गेली.

खून—तामगांव मुक्कामीं एक तेली विहिरींत मेलेला सापडला. त्याजबद्दल पोलिसाचीं तपास होऊन सदर्हू तेल्यानें हातपाय बाधून आत्महत्या करून घेतली म्हणून डेप्युटी कमिशनर यांज कडे रिपोर्ट केला. त्याजवरून डेप्युटी कमिशनर साहेब यांस संशय येऊन साहेब बाहादुरांनीं मे. नाहादर अली यांस चौकशी करितां पाठविलें होतें; परंतु चौकशी अंतीं विशेष संशयात्मक गोष्टी निघतात सबब आज रोजीं मे. डेव्हिस साहेब असिस्टंट कॉमिशनर हे जास्त चौकशी करतां जाणार असें कळतें.


## जाहिरात.

## ग्रेट इंडियन पेनिन सुला रेलवे.

जाहिर खबर

खामगांव स्टेट रेलवेवरील उतारूंच्या गाड्या.

बुधवार तारीख १ जुलईपासून पुढें दुसरी जाहिरात देण्यांत येईपर्यंत खामगांव स्टेट रेलवे वर हल्लीं दोन गाड्या जातात त्या बदल फक्त एक गाडी खाली लिहिल्या प्रमाणें दररोज जाईल.

| सकाळीं | सकाळीं |
|---|---|
| खामगांवांहून निघेल ८.४५ | जलमांहून निघून १०.१५ |
| जलम येथें पोचेल ९.३० | खामगांवास पोचेल ११.० |

हेनरी कांडर.
जनरल ट्राफिक म्यानेजर.
मुंबई तारीख २७ जून १८८५इ.


## वर्तमानसार

गाईनें वाघास पळविलें—

एका खेडेगांवांतल्या एका मनुष्याची गाय हरवल्यामुळें तो तिच्या शोधार्थ जंगलांत गेला. तेथें त्यास ती गाय बरीच लांबवर दृष्टीस पडली म्हणून तो पुढें तिला धरण्यास जाऊं लागला, इतक्यांत मागून एक काळरूपी व्याघ्र त्या मनुष्याचा पाठलाग करीत आला, व त्या मनुष्यावर झडप घालून एक दोन पंजे लगावलेंच, हें प्रकरण त्या गाईनें पहातांच आपल्या जिवाची आशा सोडून धन्याच्या संरक्षणार्थ धावली व एकाएकी पेऊन तिनें त्या व्याघ्राचे पोटांत आपलीं शिंगें खुपसलीं. त्या योगानें त्या वाघास कांहीं भीती वाटून त्या मनुष्यास सोडून गर्जना करीत पलाय न केलें! असा येथें रिपोर्ट आला आहे. हल्लीं गाय व तो मनुष्य दोघे ही सुखरूप आहेत.

चीनवाल्यांनी १९ लक्ष रु० व्याजानें काढून लढाईची तजवीज त्यारी ठेविली आहे.

हैदराबादचे निजामसरकारचा मतात हत्तीवर बसून बाहेर पडला होता, तो आकाशातील गडगडणें ऐकतांच तुफान आहला आणि महातास सोंडेंत धरून जमिनीवर आपटून चिंधड्या केल्या.

वर्धा व चंद्रपूर या दोन ठिकाणांमध्यें निजामसरकार तर्फे जी रेल्वे होत आहे तिजपैकीं बराच भाग तयार झाला असून येत्या फेब्रुवारी महिन्यांत बंगळ पर्यंत गाडीची सुरवात करणार म्हणून समजतें.

कळिंबाग—तारीख १९. येथील भंडारी लोकांनीं तीन हजार सह्यांचा अर्ज जुलमी अबकारी मक्ता संबंधानें केलेला आहे. या मक्टामुळें आम्ही फारच दरिद्री दशेला पोहोंचलों आहोत. दारूचा, ताडीचा मक्ता बंद करावा असें ही मागणी सरकारांत लिहिलें आहे.

इराण देशांत अति पर्जन्यवृष्टि होऊन फार नुकसान झाल्याची खबर आहे. तेथील ६ जिल्हे तर तमाम वाहून गेले लोकांनीं डोंगरावर पर्वतावर जाऊन आपले प्राण वांचविलें. पण घरें, दारें, जनावरें व माल मत्ता सर्फई वाहून गेली. लोकास आपलें राहण्याचें गांव कोणतें हेंच जाणण्याची मुष्किल झाली आहे. ज्ञा० सिं०

अंधत्व परिहार—वैदिक चमत्कारानें मुकास वाचा फुटते, अंधास डोळे येतात. पंगूस पाय फुटतात, अशा विषयीं पुराणांतरी असलेलीं वर्णनें वाचकास अवगत असतीलच. त्यांच्या सत्यासत्यतेविषयीं आम्हास वाद करावयाचा नाहीं. आमच्या या हिंदुस्थानांत अशा प्रकारच्या साक्षात्कार देणारीं पुष्कळ स्थळें आहेत असें भाविक लोक समजतात. व त्यांची भाव शून्य लोक थट्टा करीत असतात. सांप्रत एक कथॉलिक पत्रामध्यें आमच्या असें वाचण्यात आलें आहे कीं, मिसेस मेरी आन्डय नांवाची कोणी एक स्त्री अंध झाली होती तिच्या डोळ्यावर कोणाचाही उपाय चालेना. पुढें ही बाई एके दिवशीं एका ख्रिस्त मंदिराच्या दाराजवळ जाऊन तिनें या मंदिराच्या दरवाज्यावर ख्रिस्ताचे प्रमाणें थाप मारली. तेणेंकरून तिजकरिता या मंदिराचे दार उघडलें एवढेंच नव्हे, तर भाववश ख्रिस्तानें या सरसें तिचे डोळे ही खाडकन उघडले!!! शु० सु०

नवा शोध:—अमेरिकेंत न्यूलंदन येथें एका पारशी एक मांजर आहे. त्याच्या डोळ्यावरून भरती, ओहोटी समजतात. ओहोट वाढत चालली म्हणजे याचे डोळे बारीक होत जातात. भरती येऊं लागली म्हणजे मोठे होतात. उंदीर घुशी मारण्यापेक्षां हा नवाच उपयोग झाला.

भिवंडी येथील रहिवाशी अबदुल हक्क हे आज सुमारें ४ वर्षें निजाम हैदराबाद येथें पोलिस कमिशनर आहेत. यांचे तीर्थरूप सजे साहेब पिरजादे हेही त्यांजपाशीं राहण्यास गेले होते. त्यांची प्रकृति बिघडल्यामुळें ते मुंबईस आले होते ते बरे न होता २४ व्या तारखेस मरण पावले. त्यांनीं मरणापूर्वीं 'मला भिवंडीस नेऊन दिवाण साहेबांच्या दरग्यांत पुरावें' म्हणून सांगितलें म्हणून त्यांचे प्रेत भिवंडीस आणिलें. तेथें वरील दरगा खणूं लागले तों मागें तेथें पुरलेले कुतुबुद्दीन साहेबांचे थडग्याची माती निघून एक भोंक पडलें. तेथें पहातात तों आज १०० वर्षांपासून पुरलेला कुतुबुद्दीन साहेबांचा मुर्दा जशाचा तसा नजरेस पडला त्याचे अंगावर घातलेला पांढरास्वच्छ कपडा जसा काय नवाच बाजारांतून आणिला आहे असा होता! ही गोष्ट पुष्कळांनीं पाहिली.

निझामाच्या पदरच्या एका गोऱ्या साहेबावर लग्नाचा करार मोडल्याबद्दल एका गोऱ्या मुलीनें १०,००० रुपयांचा दावा केला आहे.

अद्भुत चमत्कार:—खानदेश जिल्ह्यापैकीं देसगांवबरडी या गावीं एका कुळमाळ्याची गाय ता० १४ माहे जून रोजीं मयत झाली असतां चालीप्रमाणें तिला महार लोकांनीं व्यवस्था करण्याकरितां महार वाड्यांत नेली होती. या रात्रीं असा चमत्कार झाला कीं, या गाईचे मांसामधून दिवे लागल्याप्रमाणें प्रकाश पडला. तो पाहून महार लोक मिळून गांवांत सांगतांच सुमारें २०० मंडळी चमत्कार पाहण्याकरितां महारवाड्यांत जमा झाली. या गाईच्या मांसामधून व हाडामधून दिव्या सारिखा प्रकाश दिसत असलेला सर्व लोकांनीं पाहून फार आश्चर्य केलें व असा चमत्कार पूर्वीं कधीं कोणी पाहिला नाहीं असे उद्गार काढले! ही बातमी आम्हास एका विश्वासू मनुष्यानें कळविली आहे. खरोखरच चमत्कार म्हटला पाहिजे. दी० बं०

दक्षिण अमेरिकेच्या पेरू प्रदेशांतील मयोबम्बा शहराजवळ एक प्रकारचें झाड उत्पन्न होत असतें. याला च "वर्षण वृक्ष" असें म्हणतात. हें झाड हवापाणी आणि वाफेस आकर्षण करून सभयास पाणी देतें. उष्ण काळा मध्यें जेव्हां नदीचें पाणी आटतें तेव्हा तर या झाडातून अधिक जोरानें पाणी इतकें वाहतें कीं, आसपासची जमीन सुद्धां ओली होऊन थबथबली जाते. हें झाड पन्नास फूट उंचीचें असून खालील बुंधाचा व्यास तीन फूट आणि परिघ आठ फूट असतो. जेथें पाण्याची दुर्मिळता असते तेथें जर हें झाड नेऊन लावलें तर विशेष फायदा होईल! प्र० चं०

द्रव्यलोभ:—पुणें येथें एक ब्राह्मण अतिरिक्त शाल्योदन भोजन करून घरीं येत असतां एका गृहस्थाचे घरांतील विहिरींत पडलेली घागर काढण्यासाठीं ८ आण्याच्या करारानें उतरला, पण बुडी मारून तळाची घागर वर आणी तोंपर्यंत दम न छाटल्यामुळें बिचारा प्राणास मुकला! अरेरे!! षड्रिपूंतील 'लोभ' हा रिपु बलवत्तर खराच, पण त्यांतही द्रव्यलोभ हा सर्वांत श्रेष्ठ होय. याचे पुढें इतर पांच रिपू हात जोडावे!

तालुके बहगांव इलाखा कुरुंदवाड पैकीं जुनवळगांव येथें कोणी रयत आपले परसांत विहिर खणीत असतां दहा पंधरा हातांवर एक शिळेची मुर्ती सांपडली आहे. मूर्ति अदमास दीड फूट उंचीची आहे; तिचे हातांत रुद्राक्षाच्या लोळंब्या आहेत. मूर्ति बरोबर मुर्तिच्या पुढें आडवी टाकलेली एक पहार व एक लहानशी दीपमाळही आहे. व अदमास दोन तीन कुडव (पल्ला) तांदुळही आहेत असें समजतें. पु० वै०

गीतेचें भाषांतर.—मि. आर्नोल्ड नांवाचा युरोपियन गृहस्थ श्रीमद्भगवद्गीतेचें इंग्रेजीत पद्यरूप भाषांतर करीत असून तें लवकरच छापून बाहेर पडणार आहे.

कोल्हापुर हायस्कुलांतील नारायण नांवाच्या मुलास घटसर्प होऊन त्याचा श्वास कोंडला होता आणि तो मुलगा मरणोन्मुख झाला होता त्यास रा. सा. डा. आपटे यांनीं घशास भोंक पाडून व त्या वाटे श्वासोच्छ्वास सोडून आणि रोग नाहींसा करून, बराच गुण आणला आहे. तिनचार दिवसांनीं घशास पाडलेलें भोंक बरें होऊन मुलगा साफ बरा होईल.

महाराणीसाहेबांनीं देऊं केलेली अर्लची पदवी ग्लाडस्टन साहेबांनीं नाकारली. सु० प०

नेपाळवाल्यांनीं नानासाहेबांच्या कुटुंबाची बरदास्त 'दकनकी रानी' या नावानुरूप बरीच ठेविली आहे. दोन हात दाखविणारी झांशीची राणी कट्टी दुस्मान पण शूर म्हणून इंग्रजांनीं तिच्या मुलास १५० पासून २०० रुपयांचे वेतन दरमहा बांधून दिलें आहे. नानासाहेब बंडवाल्यांचे बंडवाले पुतणे रावसाहेब यांच्या कुटुंबास होळकर सरकारांतून मरे तोंवर नेमणूक सुरू होती. कारण कसें झालें तरी होळकरशाही पेशवे सरकारच्या जिवावर उदयास आली. तसें हैदराबादवाले हे दिल्लीच्या दरबारचे सुभे. देवाच्या दयेनें त्यांस सांप्रत वैभव सुरक्षित आहे. यास्तव बेगम साहेबांचा त्यांनीं थोडा बहुत तरी परामर्ष घ्यावा. मागच्या सालरजंगांनीं नाना फडणीसांचें नांव चिरकाल चालावें म्हणून त्यांचे दत्तक चिरंजीव रावसाहेब मेणवलीकर यास गांव सोडला. तर विद्यमान बेगम साहेब ताजमहाल तर सार्वभौम बादशाहाच्या संबंधीं त्याचा विचार प्रस्तुतचे तरुण दिवाण साहेब करतील तर आम्हांस फार आनंद होईल. ठा० अ०

गाडीवाला अधिक ना!—पेरी बर येथील एका कुलवान गृहस्थाची धर्मपत्नी अलीकडे कांहीं दिवस नाहींशी झाल्याबद्दल लोक फार अचंबा करीत आहेत. ही दुर्ववेिलासिनी नाहींशी झाली त्याच्या दुसऱ्याच दिवशीं त्या गृहस्थाचा कोचमन हे कोठें गडप झाला! ही स्त्री नाहींशी झाल्याबरोबर यजमानीनबाई आणि हे घोडेवाले गृहस्थ यांचो दिशा यजमानाच्या लक्षांत यावी; तसा प्रकार झाला नाहीं. तथापि शोध अंती खरा प्रकार यास कळून आला, व ही कांहीं मंडळी घेऊन त्याचे शोधास निघाली, तेव्हां तो त्याचा इमानी कोचमन एका खाणावळींत त्याचे दृष्टीस पडला. त्या सरसी मंडळीनें त्यास खरा लंबे केले. परंतु इतक्यांतूनही तो निगरगट्ट अधमाधम निसटून गेला! इकडे ही उत्कृष्ट पतिव्रता तरुणी निर्लज्जपणानें आपल्या नवऱ्याच्या घोड्या संबंध्याकडे जाऊन राहिली आहे ही बऱ्याच लेकरांबाळांची आई आहे म्हणतात! देवाचे खेळ मोठे विचित्र आहेत, व पंचायुधप्रपंच ही अतर्क्य आहे. या हतभाग्यास्त्रीस आपला कोंगळ घोडेवाला आपल्या अनंत धोरपतीपेक्षां अधिक वाटावा ना!

मुंबई-- जैन लोकांची सभा.— येथील पायधोणी वरील जैन मंदिरांत कालरात्रीं येथील श्रावक लोकांची मोठी टोलेजंग सभा भरली होती. सभेचा उद्देश आपल्या जातीमध्ये विद्याप्रसार करावा, अनाथ व दुबळ्या लोकांचे रक्षणाचा कांहीं उपाय योजावा, धर्मसंबंधी शिक्षणाचा उपलब्धी व्हावी, व आपल्या जाती करितां एक मोठें पुस्तकसंग्रहालय स्थापावें असा आहे. जैन लोकांची स्वसुधारणा करण्याबद्दलची ही खटपट पाहून आम्हांस फार संतोष वाटतो.

थोरांचे सर्वच थोर— प्रिन्स बिस्मार्क यांच्या जन्मांदवसाचे उत्सवाप्रीत्यर्थ एकूण ७७,९०,०४९ मार्क्स जमा झाले. इंग्लंड अमेरिका, आस्ट्रिया व रशिया यांनीं अनुक्रमें २६७४६:३१२०४;१४००४;१६८१०४२ मार्क्स पाठविले. प्राशियांतून आलेल्या रकमे पैकीं ९,४९४०९ मार्क्स फक्त बर्लिन मधून आले.

वेडीआशा— जर्मनीमध्यें सांप्रत १७९७ सालच्या फार्दिंगाची मोठी चण चण उडाली आहे. याचें कारण असें कीं, तेथील बादशाह त्यावर्षी जन्मला ही गोष्ट लक्षात ठेऊन एका इसमानें ९७ वा बादशहाचा जन्मदिनोत्सवीं त्या सालचा एक फार्दिंग मोठ्या प्रेमानें नजर केला. बादशहानें या बद्दल एक पत्र लिहून त्याबरोबर २० मार्क्स त्यास परतभेट पाठविली. ही बातमी आता सर्व जर्मनीभर पसरली आहे आणि ज्याला त्याला असें वाटत आहे कीं, पुढच्या वर्षी आपण बादशहाला ही अल्प नजर पाठविली तर आपली ही याचे प्रमाणेच चंगळ उडेल. या भ्रमाणें वेड्या आशेत गुंतून ते त्या सालचे फार्दिंग जमा करण्याचे धांदलींत आहेत.

राणीचें उत्पन्न— आपल्या महाराणी सरकारचें ११,००,००० रुपयांचे उत्पन्न आहे. पैकीं ४,२०,००० रुपये तर त्यास लाकास्टरच्या डची पासून येतात.

व्हाइसराय--लार्ड रँडाल्फ चर्चिल यची इंडिया आफिसवर नेमणूक झाल्यामुळें आपले व्हाईसराय साहेब लार्ड डफरिन राजीनामा देतील, अशी जी वदंता मागें उठली होती, ती निराधार आहे असें यांनें ग्याझेट कर्त्यांचा बातमीदार कळवितो.

अभिमान.—म्यांचेस्टर येथ कोळशाचा व्यापार करणारी मेसर्स. ऐलिस लव्हर आणि कंपनी म्हणून कोणी मंडळी आहे. तिच्याकडे रशियानें २०,००० टन कोळशाबद्दल मागणें केलें होतें परंतु तिनें रशियास निस्पृहतेनें असें चरचरीत उत्तर दिलें कीं, तुम्ही कोती ही किंमत दिली त ? आमच्याकडून एक टन ही कोळसा तुम्हांस मिळणार नाहीं.

स्मेरो पर्वतामधून धोंडे व चिखल यांचा असा कहीं वर्षाव झाला कीं, तेणेंकरून तेहतीस फादम खोलीचे खड्डे भरून आले. कोठे कोठें नद्यांच्या नद्याच बुजून गेल्या. ज्वालामुखीचा काय तडाका हा! इं०

☞ हें पत्र अकोला येथें के.वा. खेडगाव दाळाजी यांचे 'वऱ्हाडसमाचार' छापखान्यांत नारायण खेंडराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.